रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ वर्ष ९०

# कृषीवल

रायगड | शनिवार । दि. १२ सप्टेंबर २०२६ । अंक ९८ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in




## शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची दुसरी यादी जाहीर

**रायगड :** 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत रायगड जिल्ह्यातील १ हजार ३७४ पात्र शेतकऱ्यांची दुसरी यादी ११ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली. यापूर्वी ७ हजार ३६७ पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी जाहीर झाली होती. पहिल्या यादीतील आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या ३ हजार ३९२ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात २०.४६ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. दुसरी यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे सहकार विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## वेधक

### टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीतील आयजीपीएल फाट्याजवळ भरधाव टँकरने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाला. मंगळवारी सकाळी पोलीस चौकीसमोर हा अपघात झाला. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी टँकरचालकाला ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात राहुल यादव याचा मृत्यू झाला. तो तोंडरे गावात राहात असून, खोणी येथील एका गोदामात पर्यवेक्षक म्हणून काम करत होता. त्याच गोदामात काम करणारा रोहन मुंबईकर याच्यासोबत राहुल दुचाकीवरून खोणीच्या दिशेने जात होता.आयजीपीएल फाट्याजवळ पोहोचले असता पाठीमागून आलेल्या भरधाव टँकरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

### वाशी येथे वृद्धाकडून गांजा जप्त

**पेण :** वाशी येथील सरपाटळ आळी परिसरात राहत्या घरातून गांजा बाळगल्याप्रकरणी वडखळ पोलिसांनी एका ८१ वर्षीय वृद्धाविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत पोलिसांनी ८,४०० रुपये किम तीचा १६८ ग्रॅम गांजा जप्त केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाऊ नारायण म्हात्रे (८१, रा. वाशी, सरपाटळ आळी, ता. पेण, जि. रायगड) यांच्या राहत्या घरात दि.१० सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ४.२० वाजता पोलिसांनी कारवाई केली. यावेळी काळपट व हिरवट रंगाची पाने, फुले व फळे असलेला, काळ्या रंगाचा ओलसर व उग्र वास असलेला वनस्पतीसदृश्य पदार्थ आढळून आला.

## अलिबाग-रोहा मार्गाची दुरुस्ती अपूर्णावस्थेत

# खड्ड्यांचे विघ्न कायम!

### पालकमंत्र्यांच्या आदेशाला प्रशासनाकडून केराची टोपली

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गणरायाच्या आगमनाला अवघे काही दिवस उरले असताना अलिबाग-रोहा मार्गावरील खड्ड्यांचे विघ्न कायम आहे. गणेशोत्सवापूर्वी रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्याचे स्पष्ट आदेश पालकमंत्री भरत गोगावले यांनी प्रशासनाला दिले होते. मात्र, आदेशाला अनेक दिवस उलटूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खड्ड्यांची दुरुस्ती पूर्ण झालेली नसल्याने पालकमंत्र्यांच्या आदेशालाच प्रशासनाकडून केराची टोपली दाखविली जात असल्याची चर्चा सुरू आहे.

रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, सोमवारी (दि. १४) घरोघरी गणरायाचे आगमन होणार आहे.





### उधारीवर काम

दरम्यान, अलिबाग-रोहा मार्ग मंजूर असतानाही त्याची जबाबदारी संबंधित कंपनीकडून घेण्यात आलेली नाही. त्यामुळे खड्डे बुजविण्यासाठी अन्य ठेकेदारही पुढे येत नसल्याची चर्चा आहे. निधी उपलब्ध नसल्याने उधारीवर काम करण्याची वेळ ठेकेदारांवर आल्याचे बोलले जात आहे.

> अलिबाग-रोहा मार्गावरील सुडकोली येथील खड्डे बुजविण्याचे काम शुक्रवारपासून सुरू केले आहे. अन्य भागातील रस्त्यांवरील खड्डेही तातडीने बुजविण्यात येतील. मात्र, खड्डे बुजविण्यासाठी ठेकेदार मिळत नसल्याची अडचण आहे.
>
> – श्री. पराते, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

जिल्ह्यात एक लाख पाच हजार ५४ खासगी आणि २९१ सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या तयारीला वेग आला असतानाच रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न मात्र कायम असल्याचे चित्र आहे. पान ५ वर

## महामार्गावर 'नो पार्किंग'

- वाहतूक कोंडीसाठी पर्यायी मार्ग
- गणेशोत्सवाच्या गर्दीला रोखण्यासाठी रायगड पोलिसांची जय्यत तयारी

प्रमोद जाधव

**। रायगड ।**

गणेशोत्सवासाठी चाकरमानी मोठ्या संख्येने तळ कोकणात दाखल होणार असल्याने मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची गर्दी वाढणार आहे. ही गर्दी आणि वाहतूक कोंडी रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील इंदापूर-माणगाव येथे चार ठिकाणी 'नो पार्किंग झोन' घोषित केले असून, वाहतूक कोंडी झाल्यास वाहनांना वळविण्यासाठी आठ ठिकाणी पर्यायी मार्गांची व्यवस्था केली आहे.

रायगड जिल्ह्यासह कोकणात १४ सप्टेंबरपासून २५ सप्टेंबरपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. कोकणात साधारणतः साडेतीन लाख गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार असून, त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील एक लाख पाच हजार ३४५ गणेशमूर्तींचा समावेश आहे. त्यात दीड दिवसांपासून सहा दिवस ते अनंत चतुर्दशीपर्यंत ९९ हजार ३६६ गणेशमूर्ती विराजमान होणार आहेत.

२५ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा होणार आहे. या काळात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर परिसरात राहणारे गणेशभक्त आपल्या मूळ गावी तळ कोकणात जाणार आहेत. मुंबई-गोवा महामार्गावरून हा प्रवास होणार आहे. जिल्ह्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ तसेच पाली फाटा (खोपोली)-वाकण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-(अ) या महत्त्वाच्या मार्गांवर वाहनांची मोठी वर्दळ राहणार आहे.

हजारो वाहने रस्त्यावर धावणार असल्याने वाहतूक कोंडीची शक्यता आहे. इंदापूर आणि माणगावमधील बाजारपेठेजवळ वाहतूक कोंडी होत असल्याने अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडविण्यासोबतच ती रोखण्यासाठी पान ५ वर

## खालापूरमधील भूमीपुत्रांना दिलासा

### खासदार तटकरेंच्या मध्यस्थीने टाटा समूहाकडून मागणीची दखल



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

टाटा स्टीलसह गोदरेज यासारख्या मोठ्या औद्योगिक कंपनीमध्ये स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार मिळावा, यासाठी भूमीपुत्रांनी एल्गार पुकारला होता. अखेर भूमीपुत्रांना दिलासा मिळाला आहे. खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि.११) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या बैठकीत टाटा समूहाने भूमीपुत्रांना रोजगार देण्याबरोबरच स्थानिक ठेकेदारांना प्राधान्यांना ठेका देईल, असे मान्य केले. तटकरे यांच्या मध्यस्थीने हे प्रश्न मार्गी लागला असून, येत्या पंधरा दिवसांमध्ये त्याची अंमलबजावणी होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र, गोरदेज समूहातील प्रशासनाने तडजोडीचा मुद्दा मान्य न केल्याने तटकरे यांनी कंपनीच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी पोलीस अधीक्षक आंचल दलाल, आ. अनिकेत तटकरे जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, सुधाकर घारे तसेच संतोष जंगम आदींसह खालापूर, कर्जतमधील भूमीपुत्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खालापूर तालुक्यातील टाटा स्टील आणि गोदरेज कंपनीविरोधातील प्रकल्पग्रस्तांसह स्थानिकांनी बुधवारी (दि.२) आंदोलन केले होते. 'आमची माती, आमचा अधिकार' या घोषणांसह सुरु झालेल्या या पान ५ वर

## 'उसने' कर्मचाऱ्यांना खुर्ची सोडवेना!



- जिल्हा परिषदेच्या ३५ कर्मचाऱ्यांनी आदेश झुगारले
- ४५ पैकी फक्त १० कर्मचारी मूळ ठिकाणी रुजू

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्य सरकार प्रतिनियुक्ती आणि उसनवारीवरील कर्मचाऱ्यांना मूळ विभागात परत पाठविण्यासाठी कडक पावले उचलत असताना रायगड जिल्हा परिषदेत मात्र प्रशासनाच्या आदेशांनाच केराची टोपली दाखविल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जिल्हा परिषदेच्या प्रतिनियुक्तीवरील ४५ कर्मचारी-अधिकाऱ्यांपैकी तब्बल ३५ जण मूळ कार्यालयात परतले नसून, केवळ १० कर्मचारीच मूळ पदावर रुजू झाल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी माहिती अधिकारातून मिळविलेल्या कागदपत्रांतून समोर आली आहे.

विशेष म्हणजे, यातील काही कर्मचारी वर्षानुवर्षे कोकण भवन तसेच इतर शासकीय कार्यालयांत प्रतिनियुक्तीवर कार्यरत असल्याचे कागदपत्रांतून दिसून येते. त्यामुळे ग्रामीण भागातील ग्रामपंचायती आणि पंचायत समित्यांमध्ये मनुष्यबळाचा तुटवडा असताना काही कर्मचारी मात्र आपल्या मूळ कार्यक्षेत्रापासून दूर ठाण मांडून बसल्याचा आरोप होत आहे.

रायगड जिल्हा परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रतिनियुक्तीवरील एकूण ४५ कर्मचारी-अधिकाऱ्यांना मूळ विभागात परतण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, त्यापैकी केवळ १० जणांनी मूळ पदावर हजेरी लावली. तब्बल ३५ कर्मचारी-अधिकारी अद्याप मूळ कार्यालयात रुजू झालेले नाहीत, असा दावा करण्यात आला आहे.

माहिती अधिकारामधून समोर आलेल्या माहितीनुसार, स्मिता चंद्रकांत गांगण, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती श्रीवर्धन, या १३ मार्च पान ५ वर

### ३५ जणांचे वेतन रोखणार का?

राज्य शासन प्रतिनियुक्ती आणि उसनवारीवर नियंत्रण आणत असताना रायगड जिल्हा परिषदेतील ३५ कर्मचारी-अधिकारी अद्याप मूळ ठिकाणी का रुजू झाले नाहीत? त्यांचे वेतन रोखून सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाणार का, असा प्रश्न संजय सावंत यांनी उपस्थित केला. दरम्यान, शासनाच्या आदेशानुसार पुढील कारवाईचा अहवाल सादर करण्याची मुदत जवळ येत असल्याने रायगड जिल्हा परिषद प्रशासन या ३५ कर्मचाऱ्यांबाबत काय निर्णय घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

## गडकरी, शिवेंद्रराजेंनी राजीनामा द्यावा

- महामार्गाच्या निकृष्ट कामावर राष्ट्रवादीचा हल्लाबोल
- नागोठणे उड्डाणपुलावर आंदोलन



● (छायाचित्र : महेश पवार)

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

सरकारमधील भ्रष्टाचारी मंत्र्यांनी व नेत्यांनी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग तयार करण्यासाठी १७ वर्ष घालूनही तो पूर्णत्वास नेला नाही. महामार्गाचे झालेले कामही निकृष्ट दर्जाचे झाले आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी 'या रस्त्याच्या उद्घाटनाला मी येणार नाही, मला लाज वाटते' असे व्यक्तव्य करतात आणि राज्यातील मंत्री शिवेंद्रराजे भोसले केवळ आश्वासन देत असल्याने या दोन्ही मंत्र्यांनी राजीनामे द्यावेत, अशी जोरदार मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केली. उड्डाण पुलावर आयोजित आंदोलनात केली.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या आणि कथित निकृष्ट कामाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिरानगर, नागोठणे येथील उड्डाणपुलाला तडे गेल्याचा आरोप करत राष्ट्रवादी पान ५ वर

## लाचखोर वायरमन एसीबीच्या जाळ्यात!

### १८ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

वीज बिलाचा भरणा करूनही वीज मीटर पुन्हा बसवून देण्यासाठी ग्राहकाकडून तब्बल २० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या महावितरणच्या वरिष्ठ तंत्रज्ञाला १८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले. उरण तालुक्यातील बोकरविरा परिसरात झालेल्या या कारवाईमुळे महावितरणच्या कारभारातील कथित लाचखोरीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ रामेश्वर निवृत्ती घनमोडे यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. तक्रारदार यांचे निर्भय वेब्रिज कार्यालयाच्या बाजूला कॅन्टीन व पार्किंगचा व्यवसाय आहे. सदर व्यवसायाकरिता त्यांनी महावितरण कंपनीकडून वीज मिटर घेतले होते. मात्र, वीज बिल थकीत राहिल्याने वीजपुरवठा खंडित करून मीटर काढण्यात आले होते. त्यानंतर थकीत बिलाचा भरणा केल्यानंतर वीज मीटर पुन्हा बसवून वीजपुरवठा सुरू करण्यासाठी तक्रारदाराने महावितरणकडे पाठपुरावा केला. या कामासाठी तक्रारदाराच्या आत्या आनंदीबाई ठाकूर यांनी अधिकारपत्र दिले होते. पान ५ वर

## एसी केबिन सोडा, ओपीडीमध्ये बसा!

- वरिष्ठ डॉक्टरांना आरोग्य विभागाचा थेट अल्टिमेटम
- आठवड्यातून तीन तास रुग्ण तपासणी अनिवार्य

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शासकीय आरोग्य व्यवस्थेत केवळ वातानुकूलित केबिनमध्ये बसून कागदी अहवालांचा खेळ चालणार नाही. आता वरिष्ठ अधिकाऱ्यांना थेट रुग्णांमध्ये उतरावे लागणार आहे. राज्यातील शासकीय रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष रुग्णसेवेत सहभागी होण्याचे आदेश दिले आहेत.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त संजय काटकर यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यासह वरिष्ठ वर्ग-१ वैद्यकीय अधिकाऱ्यांना आठवड्यातून किमान पान ५ वर




### प्रवाशांसाठी महामंडळाचे नियोजन | खारपाडा ते कशेडीपर्यंत दुरुस्ती पथके सज्ज

# कोकणात एसटीच्या हजारो फेऱ्या

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवासाठी कोकणात चाकरमानी दाखल होण्यास सुरुवात झाली असून, एसटी महामंडळानेही प्रवाशांच्या सोयीसाठी बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे. गुरुवार (दि. १०) आणि शुक्रवार (दि. ११) या दोन दिवसांत एसटीच्या तब्बल २ हजार ७७५ फेऱ्या तळ कोकणाच्या दिशेने रवाना झाल्या. रविवार (दि. १३) पर्यंत एसटीच्या हजारो फेऱ्या कोकणात जाण्याची शक्यता महामंडळाने व्यक्त केली आहे.

> गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातून मुंबई, ठाणे परिसरात गणेशभक्तांच्या सोयीसाठी अतिरिक्त बसफेऱ्या सोडल्या जाणार आहेत. या अतिरिक्त वाहतुकीचा नियमित प्रवाशांवर कोणताही परिणाम होणार नाही. जिल्ह्यातील नियमित प्रवाशांसाठी आवश्यक त्या प्रमाणात बस उपलब्ध ठेवण्यात येणार आहेत. त्यांच्या प्रवासाची गैरसोय होऊ नये, याची दक्षता घेण्यात आली आहे. महामार्गावर खारपाडा ते कशेडीपर्यंत रायगड विभागामार्फत दुरुस्ती पथके तैनात केली आहेत. त्यामुळे चाकरमान्यांचा प्रवास सुखरूप व आरामदायी करण्याचा प्रयत्न आहे.
>
> – सुहास चौरे, विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ, रायगड विभाग



बाप्पाच्या स्वागतासह सजावटीच्या तयारीसाठी मुंबई, ठाणे, पालघर, बोरीवली, नालासोपारा येथील चाकरमानी कोकणात येऊ लागले आहेत. अवघ्या दोन दिवसांवर गणरायाचे आगमन असल्याने तयारीसाठी चाकरमानी तळ कोकणाकडे रवाना होत आहेत. चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, यासाठी एसटी महामंडळाने अतिरिक्त बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे.

गणेशभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेऊन यंदाही एसटी महामंडळाने कोकण प्रवासासाठी मोठ्या प्रमाणात बसफेऱ्यांची व्यवस्था केली आहे. मुंबई, पालघर आणि ठाणे विभागातून गुरुवारपासून तळ कोकणाच्या दिशेने एसटी बसेस रवाना झाल्या. गुरुवारी पहिल्या दिवशी ४२७, तर शुक्रवारी दुसऱ्या दिवशी २ हजार ३४८, अशा दोन दिवसांत एकूण २ हजार ७७५ फेऱ्या कोकणाच्या दिशेने रवाना झाल्या.

शनिवार (दि. १२) रोजी १ हजार ८४० आणि रविवार (दि. १३) रोजी १९५, अशा एकूण २ हजार ३५ एसटी फेऱ्या कोकणाकडे जाणार आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांचा भार आणखी वाढणार आहे.

दरम्यान, एसटीचा प्रवास सुरळीत होण्यासाठी रायगड विभागाने खारपाडा ते कशेडीपर्यंत दहा ठिकाणी दुरुस्ती पथके तैनात केली आहेत.



## हेमराज म्हात्रेंची चेअरमनपदी निवड

**अलिबाग :** पडघे विभागीय शिक्षण संस्थेच्या मंजुळा त्रिंबक ठाकूर इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या प्रथम चेअरमनपदी हेमराज म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे. पडघे विभागीय शिक्षण संस्थेची स्थापना सन १९८९ मध्ये हेमराज म्हात्रे यांचे वडील तथा माजी पंचायत समिती गटनेते नाथा गोपाल म्हात्रे यांनी केली होती. हेमराज म्हात्रे यांची चेअरमनपदी निवड झाल्याने पंचक्रोशीसह तालुक्यातील नागरिकांमध्ये नवचैतन्य व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## माता पालक मेळावा

**पाली/बेणसे :** श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालय पाच्छापूर येथे माता पालक मेळावा उत्साहात पार पडला. शाळा आणि पालक यांच्यातील परस्पर सुसंवाद अधिक दृढ करणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या आरोग्याची, वैयक्तिक स्वच्छतेची आणि चांगल्या सवयींची काळजी घेण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती निर्माण करणे, हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश होता. याप्रसंगी पालकांना विद्यार्थ्यांचे उत्तम आरोग्य, पौष्टिक आहाराचे महत्त्व, दैनंदिन वैयक्तिक स्वच्छता, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, शिस्त आणि संस्कारक्षम सवयी या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे उपस्थित महिला वर्गासाठी आयोजित करण्यात आलेले विशेष मनोरंजक खेळ. महिलांनी या स्पर्धांमध्ये अतिशय उत्स्फूतपणे सहभाग नोंदवला.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ सप्टेंबर

१) श्री.गणेश महादेव आठवले अलिबाग, १२-९-१९३४
२) श्रीम.सुजाता पांडुरंग दळी अलिबाग, १२-९-१९४५
३)श्रीम.अनघा राजस लिमये अलिबाग, १२-९-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**दि.११-९-२०२६**
**मधूकर काशीनाथ पूनतांबेकर, स्मरणार्थ अलिबाग**



**कै.राधाबाई कृष्णा मढवी, स्मृतीदिन, मढवी आळी, आवास अलिबाग**

## ई-निविदा सूचना

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-१३८ (२०२४-२५) (३rd call ), टी-१४४ (२०२४-२५) (३rd call ), टी-१७० (२०२४-२५) (३rd call ), आणि टी-६९ (२०२६-२७) (२nd call ) अशा एकुण **चार** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. १२.०९.२०२६ पासून ते दि. २१.०९.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. २१.०९.२०२६** ला **१५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

## AMENDEMENT-1

MAHAGENCO — Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**Tender Specification No.** CE(C)-III/ KGSC Pophali/ Rfx. No. 3000071603, 3000071605, 3000071606, 3000071607, 3000071608/2026-27.

| Sr. No. | Name of Work | Estimated cost In Lakhs (Without GST) |
|---|---|---|
| 1 | Upgradation work of store room at S.Y. Stage III, KGSC, Pophali. | 18.48 |
| 2 | Construction of parking shed at S.Y. Stage III, KGSC, Pophali. | 25.75 |
| 3 | Construction of parking shed at Power House entrance Stage III KGSC Pophali. | 15.69 |
| 4 | Construction of parking shed at T.Y. Allore Stage III, KGSC, Pophali. | 14.38 |
| 5 | Construction of Testing section room at T.Y. Stage-III, KGSC Pophali. | 8.76 |

**Sale Date:-** 04.09.2026 at 11:00 Hrs to 24.09.2026 up to 17:00 Hrs. | **Date of Submission:-** 25.09.2026 up to 15:00 Hrs.

**Contact person:-** Executive Engineer (C)(Mob-8879485202), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai. **Fax :**(022)26581469 **Tel.No.** 022-69853619, E-MAIL ID:- **cgmcivil3@mahagenco.in**

**For further details visit our Website** https://eprocurement.mahagenco.in
**Agencies are requested to register themselves for this and future E-Tenders.**

## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण रायगड

**(सिलबंद कोटेशन मागवीत आहोत)**

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण संस्थेच्या माणगांव, पनवेल, कर्जत, महाड व पेण मुख्य कार्यालयातील संगणक व सॉफ्टवेअरचे सिस्टीम ऑडीट करणे बाबत सिलबंद कोटेशन मागवीत आहोत.
१) पेण कार्यालय व ४ शाखांसह सॉफ्टवेअर व कॉम्प्युटर सह सिस्टीम ऑडीट करणे.

निविदा दिनांक २२/०९/२०२६ पर्यत पेण कार्यालयात दुपारी ३ वाजेपर्यंत पोहचतील आशा बेताने पाठवाव्यात कोटेशन मंजूर नामंजूर करण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवलेला आहे तसेच कोटेशन मंजूर धारकांना कोणत्याही प्रकारे ॲडव्हान्स दिले जाणार नाही.

**श्री.विज्ञान भास्कर पाटील (चेअरमन)** — **श्री.विष्णू राघो सफरा (व्हा.चेअरमन )** — **श्री.नितीन वसंत वर्तक (सेक्रेटरी)** — **श्री.मोहन बाळाराम भोईर (मानद सचिव)**

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण रायगड**

## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण

नोंदणी क्रमांक ४४४९/४.८.१९२४

जावक क्र. २५५

### फक्त सभासदांसाठी सभेची नोटीस

१०२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा
सन २०२५-२०२६

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण, या संस्थेची सन २०२५-२०२६ सालची १०२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७/०९/२०२६ रोजी डॉ. सी.डी. देशमुख शहर सभागृह, रोहा ता. रोहा, जि. रायगड येथे सकाळी ११:०० वाजता श्री. विज्ञान भास्कर पाटील, चेअरमन- पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण, यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे, तरी सदर सभेस सर्व सन्माननीय सभासदांनी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**सभेपुढील कामे**

१) मागील दि. २८/०९/२०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२०२६ सालात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
३) सन २०२५-२०२६ सालचा व्यवस्थापक मंडळाने शिफारस केलेला अहवाल, तेरीज, ताळेबंद, नफा तोटा पत्रके वाचून मंजूर करणे.
४) सन २०२५-२०२६ सालचा हिशेब तपासणी अहवालचे वाचन करुन नोंद घेणे.
५) सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.
६) सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अंतर्गत लेखा परिक्षकाची नेमणूक करणे व मानधन ठरवणे.
७) सन २०२५-२०२६ या सालातील नफा वाटणीस मंजुरी देणे.
८) सन २०२६-२०२७ या सालातील अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
९) पगारदार नोकरांची सुधारित आदर्श उपविधी २०२६ स्विकारणे बाबत. (आदर्श उपविधी मसुदा संस्थेच्या सर्व कार्यालयात पहावयास मिळेल.)
१०) नवीन पोटनियम दुरूस्तीत मंजूरी देणे बाबत (पोटनियमांची शब्द योजना अहवालात समाविष्ट आहे.)
११) सन २०२५-२६ सालांत झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.
१२) संस्थेच्या सन २०२६-२०२७ सालांतील पेण कार्यालय व शाखांसह इतर खर्चाच्या पुढील वर्षासाठीच्या अर्थसंकल्पास मंजूरी देणे.
१३ मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**विशेष सूचना**

१) सभेस आवश्यक ती गणपूर्ती न झाल्यास अर्धा तास सभा तहकूब ठेवण्यात येईल व त्या नंतर उपस्थितांच्या हजेरीतच त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल, त्यावेळी गणपूर्तिची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना काही माहिती हवी असेल अगर काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्या लेखी स्वरुपात दि.२०/०९/२०२६ पर्यंत संस्थेच्या पेण येथील मुख्य कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात. त्यानंतर येणाऱ्या सूचना स्विकारल्या जाणार नाहीत.
३) संस्थेच्या या सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासदांना प्रवास खर्च, अल्पोपहार व चहापाना करीता रोख रक्कम १५००/- रु. देण्यात येईल
४) दिनांक २६/२७/२८ सप्टेंबर २०२६ या दिवशी शाखांसह कार्यालयीन कामकाज बंद राहील.
५) ज्या शिक्षण सेवक सभासदांचा कायमनिधी पगारातून येत नाही त्यांना उपस्थिती भत्ता दिला जाणार नाही.
६) ओळखपत्राशिवाय उपस्थिती भत्ता दिला जाणार नाही. (फोटो असणारे कोणतेही ओळखपत्र आवश्यक)
७)आदर्श उपविधी संस्थेच्या कार्यालयात पाहावयास मिळेल.

दिनांक: १२/०९/२०२६

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**

**श्री.विज्ञान भास्कर पाटील (चेअरमन)** — **श्री.विष्णू राघो सफरा (व्हा.चेअरमन )** — **श्री.नितीन वसंत वर्तक (सेक्रेटरी)** — **श्री.मोहन बाळाराम भोईर (मानद सचिव)**

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण रायगड**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे मांगरुळ, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक निर्मला अनंत पाटील, रत्नमाला भानुदास तांडेल यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| मांगरुळ | १४४/२ | ०.३३.००<br>वरकस ०.४७.००<br>एकुण क्षेत्र ०.८०.०० | ८.४५ |

वरील संपुर्ण क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत दयावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही
ठिकाण: पेण
दि. १२/०९/२०२६
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस आवारात, कोटआळी पेण, ता.पेण जि.रायगड -४०२१०७
मो. नं.९८२२०३०३८९,

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दर्शन दिलीप धुमाळ यांच्या मालकीची आहे. मिळकतीचे वर्णन-मौजे नागझरी, ता.अलिबाग, जि.रायगड, भुमापन क्रंमाक व उपविभाग २, क्षेत्र ०-५४-८० हे. आर, आकार ८.१० रू. पैसे सदर मिळकत जमिन मालक यांच्याकडून माझ्या अशिलाने कायम विकत घेण्याबाबत ठरविले आहे. तसा ठराव उभयपक्षांत झाला आहे.

सदर वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा विरहीत असल्याची व संबंधीत त्या मालकाला ती मिळकत आमचे अशिलास कायम विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतींचे विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकित अन्नवस्त्र, जप्ती, लिज, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालंकी, एम.ओ.यु. करार ताबे कब्जा वहीवाटी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही. तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार रजिस्टर खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. ११/०९/२०२६
**श्री. गणेश कृष्णा पाटील**
ॲडव्होकेट ''शिवम को. ऑप. हौ.सो. तळ मजला, शॉप नं. ३, ब्राम्हण आळी, ता.अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटिस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

मौजे रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथिल भुमापन क्र व उप विभाग १४२/२/ब, क्षेत्र ००-३४-३० हे. आर. आकार रू. १७.८७ पैसे ही बागायत मिळकत आजमितिस श्री सुधिर भालचंद्र परकर, मनिषा श्रीकांत वैद्य उर्फ मनिषा केसरीनाथ चव्हाण, समिधा सुबोध भोसले, प्रथमेश परशुराम बाजी रा रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे नावे ७/१२ सदरी नोंदविलेली आहे.

सदर मिळकतीमध्ये आमचे अशिल श्री मंगेश सुरेश जाधव, श्री कृष्णा सुरेश जाधव, श्रीमती अनुजा अनुप नागवेकर, श्री जगदीश सुरेश जाधव, श्रीमती सिमा सुरेश जाधव यांचा कै. सुनिता सुरेश जाधव हिचे मुत्युपश्चात कायदेशीर वारसाहक्क आहे. परंतु सुरेश भालचंद्र परकर व सुधिर भालचंद्र परकर यांनी त्यांचा हक्क डावलल्यामुळे आमचे अशिलांनी त्यांचे न्यायहक्काकरीता उप विभागिय अधिकारी अलिबाग, रायगड येथे अपिल अर्ज १३५/२०२५ दाखल केले आहे. सदरचे काम न्यायप्रविष्ठ आहे. सदर मिळकतीवर सुरेश भालचंद्र परकर व सुधिर भालचंद्र परकर यांची नावें ७/१२ वर नमुद असल्याचा गैरफायदा घेवुन यापुर्वी देखील सदर मिळकतींमधील काही भाग त्यांनी विक्री केला आहे. त्यांचे विरुद्ध देखील आमचे अशिलांनी योग्य ती दाद मागितली आहे.

सदर वर नमुद मिळकतीचे उताऱ्यावर सुधिर भालचंद्र परकर यांचे नाव नमुद असल्याचा गैरफायदा घेवून तसेच सदर मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा असलेला हिस्सा डावलुन सुधिर भालचंद्र परकर हे सदर वर नमुद मिळकत त्रयस्थ ईसमांस विक्री करण्याच्या तयारीत असल्याचे आमचे अशिलांस खात्रीपुर्वक समजले आहे. श्री सुधिर भालचंद्र परकर हे सदर मिळकती संदर्भात करीत असलेल्या विक्री व्यवहारास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. सबब सदर जाहीर नोटिसद्वारे समस्त जनतेस कळविण्यात येते की,

वर नमुद मिळकतीबाबत आमचे अशिलांचा हक्क डावलून श्री सुधिर भालचंद्र परकर यांचेबरोबर कोणीही कोणताही खरेदिचा, साठेकराराचा अथवा दान, गहाण तसेच अन्य कोणत्याही मार्गाने मिळकत हस्तांतरणाचा करण्याचा व्यवहार करू नये. याउपर आमचे अशिलांचा सदर मिळकतीमध्ये असलेला हक्क डावलुन असा कोणताही व्यवहार श्री सुधिर भालचंद्र परकर यांचेबरोबर केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. सबब सदर इसमांविरूद्ध आमचे अशिलांचे न्यायहक्काकरीता दावा दाखल करण्याचा अधिकार आमचे अशिलांस प्राप्त होईल. याची कृपया नोंद घ्यावी.
हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक : ११/०९/२०२६
स्वाक्षरीत /-
**ॲड. सविता शं.पिंगळे**
२०१, सृष्टी बिल्डींग, दुसरा मजला, वेध शाळेसमोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

## सावधान नोटीस

१. मौजे तळवली, तालुका मुरूड, जिल्हा रायगड येथील परिशिष्ट - १ मध्ये वर्णन केलेल्या गट क्रमांक व उपविभाग १२५ या मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. सेबास्टीअन मिंगेल वेगस यांनी दिलेल्या माहीतीवरून जाहीर नोटीस देणेत येते की, २. सदरहू गट क्रमांक १२५ व अन्य मिळकती (१) श्री. सेबास्टीअन मिंगेल वेगस, (२) श्री. कुस्ताद मिंगेल वेगस, (३) श्री.जोकी मिंगेल वेगस, (४) श्री.नेस्टर मिंगेल वेगस व (५) श्रीम.लिबान मिंगेल वेगस यांचे वडीलोपार्जीत मालकीच्या व सामाईक ताबेकब्जा वहीवाटीच्या आहेत.
३. श्री. कुस्ताद मिंगेल वेगस यांनी महसुल अधिकाऱ्यांची दिशाभुल करून सदर मिळकतीस त्यांचे एकटयाचे नावाची नोंद करून घेतलेली आहे. परंतु सदर मिळकत श्री. कुस्ताद मिंगेल वेगस यांचे एकटयाचे मालकीची नसून त्यामध्ये आमचे अशिल श्री.सेबास्टीअन मिंगेल वेगस, व श्री.जोकी मिंगेल वेगस, श्री.नेस्टर मिंगेल वेगस व श्रीम.लिबान मिंगेल वेगस यांचासुध्दा कायदेशीर हक्क व हितसंबंध आहे. सदर मिळकतीसंदर्भात हक्कप्रस्थापनेकरीता आमचे अशिलांनी न्यायालयीन कारवाई सुरू केलेली आहे.
४. अशी वस्तुस्थिती असताना श्री. कुस्ताद मिंगेल वेगस हे सदर मिळकत अन्य त्रयस्थ व्यक्तींना विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीलायक माहीती आमचे अशिलांना प्राप्त झालेली आहे. सदर मिळकतींमधे आमचे अशिलांचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. त्यामुळे आमचे अशिलांची प्रस्तावित विक्री व्यवहाराला सक्त हरकत आहे.
५. तरी परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये. त्यास आमचे अशिलांची कडक हरकत आहे. याउप्परही आमचे अशिलांची हरकत डावलून बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून जर कोणी वर नमुद केलेल्या मिळकतीसंदर्भात विक्री अथवा तत्सम प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याबाबत अलहिदा संबंधीतांवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कोर्ट कारवाई करण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**परिशिष्ट-१**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| तळवली | १२५ | ०-४५-७०<br>०-०४-३०<br>०-५०-०० | ४.७१/- |

अलिबाग
दिनांक : १२/०९/२०२६
सही /
**ॲड.आकांक्षा किशोर दांडेकर**
पत्ता : रेवदंडा, नारायण आळी, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०३
फोन नं. : ९७६३७५०४६८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे कि, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत ही खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे.गिरवले, ता.पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं | खाता नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| २६/२/२ | ३१९ | ०-१८-२०<br>पो.ख ०-०१-८०<br>खरेदी क्षेत्र ०-२०-०० | ३.७४ |
| | | एकुण क्षेत्र ०-२०-०० | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कात श्री. सुनिलकुमार रामस्वरूप सोनी यांच्या नावाची नोंद आहे, त्यांनी सदर मिळकत ही आमचे अशिलाना खरेदी देण्याची ठरली असुन सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे गहाणखत,दानपत्र, बक्षीसपत्र, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगीहक्क, विकसनकरार, समजोताकरार, अल्प किंवा दिर्घमुदतीचा भाडेपट्टा करार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने तिच्या असलेल्या हक्कांबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांपर्यत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नाही आली तर वर नमुद केलेली शेतजमिन मिळकतीचे खरेदी करण्याकरीता आमचे अशिल यांना कोणतीही बाधा नसेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ११.०९.२०२६
ठिकाण : पनवेल
**ॲड. प्रविणकुमार पांडुरंग मोरे**
पत्ता : ऑफीस नं. ०३, आशा हॉमोनी को ऑप हौ. सो प्लॉट नं. १४, सेक्टर १७, खांदा कॉलनी, पनवेल ४१०२०६ मो.नं. ९०२९५८९९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे-राठीचीवाडी, ता.पेण, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जा, वहिवाटीतील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सदरहू शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|
| राठीचीवाडी | २४/१ | जिरायत २.६८.९०<br>पो.ख. ०.५१.१०<br>एकूण क्षेत्र ३.२०.०० | १७.७९ |

वरील शेत जमीन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ३.२०.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र (३२०.०० गुंठे ) या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीचे जमीन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ३.२०.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र हे पूर्णत: हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू शेत जमीन मिळकतीचे विद्यमान जमीन मालक यांचा मालकीची संपूर्ण शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे वरील शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालकांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्राच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीच्या संपूर्ण क्षेत्राचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड
दिनांक १२/०९/२०२६
अशिलांचे वकील
**ॲड. श्री.जयंत घ.वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'', पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण, चिंचपाडा रोड, पेण, ता.पेण, जि.रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## सिडको — शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र/ करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनिशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा १०३७ | पेंधर १/२००८ | २३२/२ +३ब | १-०५-० | ९०० चौ.मी. | भुखंड क्र. १५, सेक्टर-८, क्षेत्र-९०० चौ.मी. | **१.कै.सिताराम काळू पाटील (मयत) व कै.कृष्णा सिताराम पाटील (मयत) यांचे वारस-**<br>१.१ शांताबाई कृष्णा पाटील<br>१.२ गजानन कृष्णा पाटील<br>१.३ बाळाराम कृष्णा पाटील<br>१.४ सत्यवान कृष्णा पाटील<br>१.५ सुनिता राजेन्द्र पाटील<br>१.६ इंदुबाई नारायण भोईर<br>१.७ कुंदा देवदास पाटील<br>**२. कै.मारूती सिताराम पाटील (मयत) यांचे वारस:-**<br>२.१.निराबाई मारूती पाटील २.२.बुधाजी मारूती पाटील<br>२.३.भगवान मारूती पाटील २.३.पांडुरंग मारूती पाटील<br>२.४. रेखा मारूती पाटील उर्फ रेखा अंकूश पाटील<br>**३.तुळसाबाई मनोहर खानावकर (मयत) यांचे वारस**<br>३.१. दिलीप मनोहर खानावकर<br>३.२. किशोर मनोहर खानावकर<br>३.३. विजय मनोहर खानावकर<br>४.यशोदाबाई लक्ष्मण खानावकर<br>५.हिराबाई मंगळराव गोंधळी<br>६.गुणाबाई हरिश्चंद्र पाटील | -- |
| | | | **एकुण क्षेत्र** | **१-०५-०** | | | | |
| २ | तळोजा ४७२ | पेंधर १७२+६१ | २३५/३B | ०-१५-५ | ८८८.५ पूर्णांकात ९०० चौ.मी. पैकी २५० चौ.मी | भुखंड क्र. ९८A, सेक्टर-१४, क्षेत्र-२५० चौ.मी. | **श्री. वसंत महादू पाटील** | -- |
| | | पेंधर १७२(१) | १३८/७<br>१३८/१७<br>२४३/१ | ०-१७-० | | | | |
| | | पेंधर १७२ | २४२/१B | ०-२६-७ | | | | |
| | | पेंधर १७३ | १३६/३ | ०-७५-६<br>०-४२-०<br>(प्रस्तावित) | | | | |
| | | | एकुण क्षेत्र | १-०१-२ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, १२.५% टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२२४/२०२६-२७

## निवडक



### शेकाप-एकतातर्फे आभाकार्ड नोंदणी

**पनवेल :** शेतकरी कामगार पक्ष आणि एकता एज्युकेशनल ॲण्ड वेलफेअर असोसिएशन, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पटेल मोहल्ला येथील आरिफ पटेल जनसंपर्क कार्यालयात मोफत आयुष्मान भारतकार्ड व आभाकार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल २५० नागरिकांनी नोंदणी करून लाभ घेतला. माजी उपनगराध्यक्ष आरिफ पटेल, यासीन आरिफ पटेल, शेकाप कार्यकर्ते मझहर पठाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातून हे शिबीर घेण्यात आले होते. सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ सहज उपलब्ध करून देणे तसेच वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक संरक्षण मिळावे, हा शिबिराचा उद्देश होता. यावेळी माजी आ. बाळाराम पाटील, पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, केतन भगत, लतीफ शेख, मनीषा म्हात्रे, आर्या जाधव, प्रवीण जाधव, अनंत म्हात्रे, दत्तात्रेय कडू, सागर पाटील यांच्यासह परिसरातील नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

### कोलाडच्या सुपाला जिल्ह्यात मागणी



**कोलाड :** रायगड जिल्ह्यासह संपूर्ण कोकणात गणेशोत्सवाच्या काळात गौरी पूजनाचा सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. या निमित्ताने महिलांकडून 'ओवसा' पूजन केले जाते. या पूजनासाठी सुपाचा वापर केला जात असल्याने कोलाड परिसरातील पारंपरिक सुपाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कोलाड परिसरात तयार होणारे पारंपरिक सुप हे स्थानिक कारागिरांच्या कौशल्याचे प्रतीक मानले जाते. गणेशोत्सव व गौरी पूजनाच्या काळात या सुपाला रायगड जिल्ह्यात मोठी मागणी असते. मात्र, या पारंपरिक सुपाला जिल्हास्तरीय ओळख व बाजारपेठ मिळावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. आंबेवाडी येथील प्रकाश सोनावले हे गेल्या ७० वर्षांपासून सुप तयार करण्याचा पारंपरिक व्यवसाय करीत असून, याच व्यवसायातून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. पिढ्यापिंढ्या चालत आलेल्या या व्यवसायातून पारंपरिक सुप तयार करण्याचे कौशल्य त्यांनी जपले आहे. गणेशोत्सव आणि गौरी पूजनाच्या काळात त्यांच्या तयार केलेल्या सुपांना विशेष मागणी असल्याचे सांगण्यात येते. कोलाडच्या सुपाला रायगड जिल्ह्याची पारंपरिक ओळख मिळाल्यास स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन मिळेल, तसेच या व्यवसायाला चालना मिळून रोजगाराच्या संधीही वाढतील. त्यामुळे कोलाडच्या सुपाला जिल्ह्याचे पारंपरिक उत्पादन म्हणून मान्यता देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### बाप्पांच्या मूर्तींचे काम अंतिम टप्प्यात

**तळा :** अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणेशाच्या आगमनाला अवघे काही दिवस शिल्लक राहिले असून तळा तालुक्यातील गणेश मूर्ती कारखान्यांमध्ये मूर्तींचे काम



अंतिम टप्प्यात आले आहे. यंदा १४ सप्टेंबरला बाप्पाचे आगमन होत असल्याने रंगकाम पूर्ण झालेल्या मूर्तींना हिरे, मोती, झिलर लावून आकर्षक साज चढविण्याची लगबग कारागिरांमध्ये सुरू आहे. पूर्वी रंगकाम झाले की मूर्ती विक्रीसाठी सज्ज होत असे, मात्र गेल्या काही वर्षांपासून ग्राहकांकडून हिरे-मोती लावलेल्या मूर्तींना अधिक मागणी वाढली आहे. त्यासाठी कारखानदार ५०० ते ७०० रुपये मजुरी देऊन कारागिरांकडून मूर्ती अधिक आकर्षक बनवून घेत आहेत. तसेच सध्या बाप्पाला विविध रुपात आणण्याचे फॅड आले असून श्रीराम, जय मल्हार, विठ्ठल, शिवशंकर रुपातील गणेश मूर्तींना मोठी मागणी आहे. त्या रुपाला साजेशी कलाकुसर करावी लागत असल्याने वेळ अधिक लागतो. कारागिरांची कमतरता आणि वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा यामुळे अडचणी येत असल्या तरी गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेले मूर्ती बनविण्याचे काम पूर्ण करण्यासाठी कारखान्यांमध्ये दिवस-रात्र काम सुरू असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

# महिनाभरानंतरही कामाला मुहूर्त नाही

- स्लॅब कोसळून आठ वाहने नाल्यात
- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिक त्रस्त

**| चणेरा | प्रतिनिधी |**

**रोहा शहरातील दमखाडी नाक्याजवळील जयराम अपार्टमेंट परिसरातील नाल्यावरील स्लॅब ३० जुलै रोजी रात्री अचानक कोसळून तब्बल आठ वाहने नाल्यात कोसळल्याची धक्कादायक घटना घडली होती. या दुर्घटनेत अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेनंतर प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली होती. मात्र, दुर्घटनेला महिना उलटत आला तरी नाल्याच्या दुरुस्तीच्या प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**



> नाल्याच्या कामासंदर्भात ठेकेदार आणि अधिकाऱ्यांची वरिष्ठ पातळीवर बैठक झाली आहे. गणेशोत्सव काही दिवसांवर आला असून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दोन ते तीन दिवसांत काम सुरू करण्याचे आदेश ठेकेदाराला देण्यात आले आहेत.
>
> -सुनील पवार
> सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता

घटना घडल्यानंतर रोहा नगराध्यक्षा वनश्री शेंडगे आणि मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली होती. नगरसेवक रवी चाळके, महेंद्र गुजर, अजित मोरे, रोशन चाफेकर, अहमद दर्जी, संजना शिंदे, अरबाज मनीयार यांच्यासह नागरिकही यावेळी उपस्थित होते. दरम्यान, पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आल्या होत्या.

मात्र, घटना घडली, पाहणी झाली, आश्वासने मिळाली; पण प्रत्यक्ष काम कुठे आहे? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

वाहनचालकांसाठी हा परिसर डोकेदुखी ठरत असून, दमखाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर गाळे, दुकाने तसेच नागरिकांची वस्ती असल्याने नाल्याच्या दुरवस्थेचा थेट परिणाम स्थानिकांच्या दैनंदिन व्यवहारावर होत आहे. दुर्घटनेमुळे अनेक दुकानदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, गणेशोत्सव तोंडावर आलेला असताना परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक ९ मधील नगरसेवकांच्या भूमिकेबाबतही नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. दुर्घटनेनंतर एवढा कालावधी उलटूनही नाल्याच्या दुरुस्तीच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नसल्याने स्थानिक नागरिक आणि दुकानदारांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी, दुकानदारांचे नुकसान आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणारी संभाव्य वाहतूक समस्या लक्षात घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे कामाचा पाठपुरावा करणे अपेक्षित होते. दोन-तीन दिवसांत काम सुरू होईल या आश्वासनानंतर प्रत्यक्षात कामाची सुरुवात नेमकी कधी होणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. गणेशोत्सवाच्या काळात या परिसरात नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. त्यातच काम सुरू झाल्यास किंवा सध्याची परिस्थिती कायम राहिल्यास वाहतुकीचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

सदर नाला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत असल्याने त्याची दुरुस्ती, आवश्यक उपाययोजना करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची आहे. त्यामुळे आता केवळ आश्वासने न देता तातडीने प्रत्यक्ष काम सुरू करून ते दर्जेदार आणि सुरक्षित पद्धतीने पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. ३० जुलैच्या दुर्घटनेत सुदैवाने जीवितहानी टळली; मात्र आता प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागरिकांचा संयम सुटण्याची वेळ आली आहे.

## चाकरमान्यांसाठी एसटी सज्ज



**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवासाठी कोकणाकडे रवाना होणाऱ्या चाकरमान्यांची संख्या वाढत असताना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची सेवा सज्ज झाली आहे. चाकरमान्यांना त्यांच्या गावाकडे पोहोचविण्यासाठी मोठ्या संख्येने एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील पार्किंगमध्ये मोठ्या प्रमाणावर एसटी बस व इतर वाहने तैनात करण्यात आली आहेत. पश्चिम महाराष्ट्रातून आलेले वाहनचालकही चाकरमान्यांना कोकणात घेऊन जाण्यासाठी सज्ज झाले आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरातून कोकणाकडे जाणाऱ्या मार्गांवर वाहनांची वर्दळ वाढली आहे. बाप्पाच्या आगमनासाठी गावाकडे निघालेल्या चाकरमान्यांच्या चेहऱ्यावर उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

## ढोल-ताशांच्या तालमींना वेग

**| पनवेल | प्रतिनिधी |**

मंगल कार्य असो, उत्सव असो की सणसमारंभ महाराष्ट्रात ढोल ताशा वाजला नाही तर तो साजरा झाला असं वाटतंच नाही. मांगल्याचं प्रतिक असणारे हे ढोल ताशा वादन प्रत्येक ऐकणाऱ्याचे पाय थिरकायला लावले नाही तर नवलंच. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीला सगळीकडे ढोल ताशांचा गरज दिसून येतो.

पुरातन काळाशी नाते सांगणाऱ्या ढोल-ताशा, शंख-झांजा आणि ध्वजाशी घट्ट नाळ असणाऱ्या ढोल-ताशा पथकांनी आपल्या वादनातून एका अर्थाने आपली सांस्कृतिक ओळख निर्माण केली आहे. अशा पथकांचे गणेशोत्सवाला तीन दिवस शिल्लक असतानाच पनवेल शहरात उत्सवाची लगबग सुरू झाली आहे. गणेश मंडळांकडून सजावट, विद्युत



रोषणाई, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मिरवणुकीच्या नियोजनाला वेग आला असून, ढोल-ताशा पथकांच्या तालिमांनाही जोर आला आहे.

पनवेल शहरातील विविध परिसरांत तरुण-तरुणींचे गट दररोज ढोल-ताशांच्या तालावर सराव करताना दिसत आहेत. मोकळी मैदाने, उड्डाणपुलांखालील जागा तसेच परिसरातील उपलब्ध मैदानांमध्ये ढोल, ताशा आणि झांजांच्या तालमी सुरू आहेत.

गणेशोत्सवातील आगमन आणि विसर्जन मिरवणुकीत उत्कृष्ट सादरीकरण करण्यासाठी पथकांकडून विशेष मेहनत घेतली जात आहे. यंदा काही मंडळांनी नवीन वाद्यसामग्रीही घेतली असून, पारंपरिक ढोल-ताशांच्या तालासोबत विविध तालांचा मेळ साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. ताल, लय, वेग आणि एकसंघ वादन यावर विशेष भर दिला जात आहे. गणेश मंडळांकडून मिरवणुकीचे मार्ग, वाहनांची सजावट, विद्युत रोषणाई आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन सुरू झाले आहे. त्याचबरोबर ढोल-ताशा पथकांकडून अंतिम सादरीकरण अधिक प्रभावी करण्यासाठी नियमित सराव केला जात आहे. पनवेल शहरातील विविध भागांत ढोल-ताशांचा निनाद ऐकू येत आहे.

## एकदरा पुलावर मोकाट गुरे

**| मुरुड | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील एकदरा गावाजवळील मुख्य पुलावर मोकाट जनावरे तळ ठोकत आहेत. या पुलावरून मुरुड-रोहा अशी मुख्य वाहतूक चालते. पुलाच्या अरुंद जागेत १० ते १५ गायी-बैल रस्त्याच्या मधोमध बसून असल्याने मोठी वाहतूक कोंडी होत आहे. तसेच अनेकांना जीव मुठीत धरून वाट काढावी लागत आहे. जनावरांचे मालक सकाळी जनावरे मोकळी सोडतात आणि ती दिवसभर पुलावर बसून राहतात. रात्रीच्या वेळी अंधारात जनावरे दिसत नसल्याने मोठा अपघात होण्याची भीती आहे.

## रेल्वे स्थानक गजबजले

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**



गणेशोत्सवासाठी आपल्या लाडक्या गणरायाच्या भेटीला जाण्यासाठी कोकणातील चाकरमान्यांनी गावची वाट धरली आहे. त्यामुळे पनवेल रेल्वे स्थानकावर प्रवाशांची गर्दी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकण मार्गावर रेल्वे प्रशासनाकडून अनेक विशेष गाड्या सोडण्यात आल्या आहेत. मात्र, विशेष गाड्यांची संख्या वाढवूनही कोकणाकडे जाणाऱ्या चाकरमान्यांची गर्दी कमी होताना दिसत नाही. गावी जाऊन गणपती बाप्पाचे स्वागत करण्यासाठी कुटुंबासह प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांची संख्या मोठी आहे. स्थानकातील फलाटांवर सकाळपासूनच प्रवाशांची लगबग सुरू असून, रेल्वे येताच गावी जाण्यासाठी प्रवाशांची धावपळ होत आहे. अनेक कुटुंबांनी आधीच आरक्षण केले असले, तरी तातडीच्या प्रवासासाठीही नागरिक स्थानकात गर्दी करत आहेत. गणरायाच्या आगमनाची उत्सुकता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे जाणवत आहे.

## बचाव समितिची ट्राफिक समस्याबाबत चर्चा

**| कर्जत | प्रतिनिधी |**



● (छायाचित्र -संजय गायकवाड)

कर्जत शहर बचाव समितीची ट्राफिक समस्येबाबतची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या दालनात गुरुवारी (दि.१०) सप्टेंबर रोजी घेण्यात आली. या बैठकीत चार फाटा येथील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यात वाहतूक कोंडीच्या ठिकाणांवर लक्ष ठेवून आवश्यक त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त देण्याचे नियोजन, चार फाटा हा वाहतूक कोंडीचा प्रमुख केंद्रबिंदू असल्याने छोट्या बायपास मार्गांवर कर्मचारी नियुक्त करून वाहतूक नियंत्रणात ठेवण्याचे नियोजन, मुख्य बाजारपेठेतील दररोजची वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांवर चर्चा, गर्दीच्या वेळेत मुख्य बाजारपेठेत येणाऱ्या मोठ्या वाहनांना बाजारपेठेबाहेर थांबविण्याबाबत उपाययोजना करण्याची सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या (दि.१२) मार्च २०२६ रोजीच्या अवजड वाहनांसाठी लागू असलेली बंदीची वेळ तातडीने अंमलात आणून कारवाई सुरू करण्याची मागणी करण्यात आली. कर्जत शहर बचाव समितीचे समन्वयक ॲड. कैलास मोरे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी गायकवाड यांचे आभार मानले.

## मोदकांच्या तयारीसाठी महिलांची तारांबळ

### काळ बदलला तरी गावाकडची परंपरा कायम

**| कापोली | प्रतिनिधी |**

लाडक्या गणपती बाप्पाच्या आगमनाला अवघे काही दिवस उरले असून, गावागावांत बाप्पाच्या स्वागताचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. आपल्या संस्कृतीत पारंपरिक पद्धतीने उकडीचे मोदक आणि खमंग लाडू बनवण्याची पूर्वतयारी सध्या वेगाने सुरू आहे. आजच्या आधुनिक युगात बाजारात रेडीमेड मोदक पिठाचे ढीग साचले असले, तरी जी चव गावच्या अंगणात सुकवलेल्या तांदळाच्या पिठाच्या मोदकांना येते, ती दुकानातल्या पाकिटात बंद असलेल्या पिठाला कधीच येऊ शकत नाही, अशी ठाम भावना ग्रामीण भागातील गृहिणी व्यक्त करत आहेत.

सप्टेंबर महिन्यात खरतर ऊन-पावसाचा खेळ सुरु असतो. त्यामुळे इतर कामे बाजूला ठेवून गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खेडेगावांमध्ये महिलांची मोठी धावपळ सुरू असते. सध्या ऊन-पावसाचा लपंडाव सुरू असल्याने मोदकाच्या पिठासाठी तांदूळ सुकवताना महिलांची चांगलीच तारांबळ उडते. अचानक काळे ढग दाटून आले आणि पाऊस सुरू झाला की अंगणात वाळत टाकलेले तांदूळ घाईघाईने गोळा करून घरात भरून ठेवायचे, आणि पुन्हा कडक ऊन पडले की पावसाला दोष देत ते तांदूळ पुन्हा अंगणात वाळत टाकायचे, अशी लगबग घराघरांत पाहायला मिळत आहे. ग्रामीण भागात आणि जुन्या पाड्यांवर अजूनही मोदकांचे पीठ घरच्या घरी तयार करण्याची परंपरा जपली जात आहे. बाप्पाच्या मोदकांसाठी सुवासिक बासमती तांदूळ आणून ते स्वच्छ धुणे, त्यानंतर सुती कापडावर सावलीत सुकवणे आणि मग ते गिरणीतून अगदी बारीक दळून आणणे, अशी महिलांची लगबग सध्या पाहायला मिळत आहे. या घरगुती पिठामुळे मोदकांना एक वेगळीच चव आणि सुगंध येतो, अशी गृहिणींची भावना आहे.

दुसरीकडे, नोकरदार महिला आणि बदलत्या जीवनशैलीमुळे आधुनिक काळात रेडीमेड मोदक पिठाची मागणी प्रचंड वाढली आहे. बाजारात मिळणारे नामांकित ब्रँड्सचे मोदक पीठ खरेदी करण्याकडे अनेकांचा कल आहे. यामुळे वेळ आणि कष्ट दोन्ही वाचत असल्याने, ऐन सणावारी कामाचा ताण कमी करण्यासाठी हा पर्याय सोयीचा ठरत आहे. बाजारात मिळणाऱ्या या पिठामुळे मोदक अगदी मऊ आणि कळीदार बनत असल्याने नवीन पिढीतील महिला या पर्यायाला पसंती देत आहेत. पारंपारिक पद्धत असो वा आधुनिक, बाप्पाच्या नैवेद्याची तयारी तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने सुरू आहे. काळ बदलला सोयी वाढल्या तरी गावाकडची परंपरा, आजही तितक्याच श्रद्धेने जपले जात आहे.




**विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाऐवजी थकवा | प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित**

## गुणगौरव सोहळ्यात सावळा गोंधळ

**| पेण | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचा प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे अक्षरशः सावळा गोंधळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. सकाळी १० वाजता सुरू होणारा कार्यक्रम तब्बल अडीच तास उशिराने, दुपारी १२.३० वाजता सुरू झाला. परिणामी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून सकाळी ९ वाजल्यापासून महाडमध्ये दाखल



झालेल्या विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.

कौतुकाच्या क्षणाची वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा मोठा हिरमोड झाला. एकीकडे कार्यक्रमाला प्रचंड विलंब आणि दुसरीकडे नाट्यगृहातील एसी व्यवस्था बंद असल्याने विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक व नातेवाईक उकाड्याने अक्षरशः हैराण झाले. दुपारी अडीच वाजेपर्यंत अनेक विद्यार्थी एका पाण्याच्या बाटलीवर तग धरून बसल्याचे चित्र होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाऐवजी थकवा आणि नाराजी स्पष्टपणे दिसून येत होती. कार्यक्रमाला झालेल्या विलंबामागे लोकप्रतिनिधींच्या आगमनाची प्रतीक्षा असल्याची चर्चा उपस्थितांमध्ये होती. विशेष म्हणजे उशिरा येणाऱ्या मान्यवरांसाठी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना तासन्तास ताटकळत ठेवणे योग्य आहे का, असा सवाल उपस्थित केला जात होता. कार्यक्रम सुरू झाल्यानंतरही काही लोकप्रतिनिधींनी घाईघाईने कार्यक्रम आटोपून निघण्याला प्राधान्य दिल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

### दहा मिनिटांत उरकला सोहळा

पालकमंत्री कार्यक्रमस्थळी उशिरा दाखल झाल्यानंतर भाषण आणि आदर्श शिक्षकांचा पुरस्कार वितरण सोहळा अवघ्या काही मिनिटांत आटोपण्यात आल्याची चर्चा उपस्थितांमध्ये होती. ज्यांच्या कष्टांचा गौरव करण्यासाठी संपूर्ण सोहळा आयोजित करण्यात आला, त्यांच्याच सन्मानाला वेळेची मर्यादा लावावी लागणे ही शिक्षण विभागाच्या नियोजनाची गंभीर बाब असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# मतदारांचा छळ, अंक दुसरा

मतदार सखोल तपासणी अर्थात एसआयआरच्या नावाने गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांचा छळ चालू आहे. त्याचा दुसरा टप्पा आता सुरू होईल. निवडणूक आयोगाने मागितल्यानुसार मतदारांनी कागदपत्रांसहित पहिले अर्ज भरले व ते बीएलओकडे दिले. पण, आता असंख्य नागरिकांना मॅपिंग झालेले नाही अशा यादीत टाकण्यात आलेले आहे. म्हणजेच त्यांना आता नोटिसा मिळणार आहेत. त्यांना पुन्हा एकवार आपल्या नागरिकत्वाचे पुरावे द्यावे लागणार आहेत. यापूर्वी अगदी पासपोर्ट किंवा जन्म प्रमाणपत्राचे पुरावे देऊनदेखील काहीतरी खुसपटे काढून मतदारांना तूर्तास तरी संशयास्पद ठरवले गेले आहे. याबाबत महाराष्ट्रातील नामांकितांची उदाहरणे अजून बाहेर आलेली नाहीत. पण, कर्नाटकातील बातम्या चीड आणणाऱ्या आहेत. तेथे भारतरत्न मिळालेले वैज्ञानिक सीएनआर राव यांचे नाव मतदारयादीतून वगळले आहे. राव यांचे नाव प्रोफेसर किंवा प्रोफ. सीएनआर राव अशा रीतीने जुन्या यादीत होते. त्यात प्रोफेसर या उपाधीच्या स्पेलिंगमध्ये एकच एफ हे अक्षर होते. नवीन नोंदणी करताना डबल एफ असा उल्लेख आहे. निव्वळ एवढ्यावरून ९२ वर्षांच्या या महान वैज्ञानिकाला आता कोणा सरकारी कर्मचाऱ्यापुढे जाबजबाब आणि साक्षीपुरावे करीत राहावे लागणार आहे. हे तर काहीच नाही. भारतात आधारकार्ड ही कल्पना ज्यांनी प्रत्यक्ष साकारली त्या उद्योगपती नंदन निलेकणी यांचे नावही यादीतून बाहेर आहे. महाराष्ट्रातही हे घडणार आहे. राज्यातील एक कोटी ६२ लाख मतदारांची नावे संशयास्पद या रकान्यात टाकण्यात आली आहेत. मतदार तपासणी सुरू होण्यापूर्वी राज्यात ९ कोटी ७८ लाख मतदार होते. त्यातल्या २२ टक्के मतदारांची नावे पहिल्या फेरीतच काढून टाकण्यात आली. दुबार नावे किंवा मृत पावलेल्या लोकांची नावे यात बहुसंख्येने असावीत. मात्र, आता दुसऱ्या टप्प्यात १ कोटी ६२ लाख मतदारांचे पुरावे नीट नाहीत म्हणून त्यांना नोटिसा दिल्या जायच्या आहेत. या महिन्याच्या सुरुवातीला प्रारुप मतदारयादी आली तेव्हा त्यात अनेकांनी आपले नाव पाहिले असेल. ते आहे हे पाहून त्यांना आनंद झाला असेल. पण, आता त्यांच्यापैकी बहुसंख्य जणांना नोटिसा दिल्या जाणार आहेत.

## नागरिक नव्हे, आरोपी

पहिल्या टप्प्यात लोकांकडून अर्ज भरून घेताना बीएलओनी वाट्टेल तशी मनमानी केली आहे. या अर्जामध्ये तीन रकाने होते. पहिला अर्जदाराची माहिती. दुसरा अर्जदाराच्या अशा नातेवाईकाची माहिती ज्याचे नाव २००२ च्या मतदारयादीत आहे. तिसरा अर्जदाराचा आधारकार्ड वगैरेंचा तपशील. अनेक भागात बीएलओनी अर्जदारांचा केवळ तिसराच भाग भरून घेतला. त्यांना आता नोटिसा आल्या आहेत. अनेकांनी अर्ज नीट भरून दिला, आधारकार्ड, पासपोर्ट वगैरे पुरावे दिले तरीही त्यांना नोटिसा आल्या आहेत. २००२ मध्ये तुम्ही वेगळ्या मतदारसंघामध्ये मतदार होतात, त्यामुळे सध्याच्या मतदारसंघाच्या यादीत तुमचे नाव दिसत नाही असे कारण काही ठिकाणी दिले जात आहे. हे तर सर्वात अजब आहे. माणसे शिकण्यासाठी वा नोकरीधंद्यासाठी सतत फिरत वा जागा बदलत असतात. आजच्या काळात हे अपरिहार्य झाले आहे. अशा वेळी केवळ त्याचे नाव २५ वर्षे एकाच मतदारसंघात नाही या कारणास्तव नोटिसा काढणे हा क्रूर प्रकार आहे. आता या नोटिसा आल्यानंतर जन्मतारखेचा दाखला किंवा तत्सम कागदपत्रे घेऊन निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यापुढे हजर व्हावे लागले आहे. या प्रक्रियेला सुनावणी असा शब्दप्रयोग आहे. म्हणजे अर्जदार हे जणू आरोपी आहेत. किंवा गुन्हेगारच, पण गुन्हा सिध्द न झालेले संशयित. हा अत्यंत आक्षेपार्ह प्रकार आहे. इतके करूनही समजा त्या कर्मचाऱ्याचे समाधान झाले नाही किंवा त्याची काही खुन्नस असेल तर तो संबंधित अर्जदाराचे नाव बाद यादीतच ठेवू शकतो. त्यानंतर हे प्रकरण अपिलात जाईल. बंगालमध्ये अशी तीस-चाळीस लाख प्रकरणे आहेत. त्यांची तथाकथित सुनावणी करायला अपिलातील न्यायाधीशांना दहा-वीस वर्षे लागू शकतील. महाराष्ट्रात बहुदा असे होणार नाही. किमान होऊ नये अशी अपेक्षा आहे. पण नोटिसा आणि सुनावणी हा छळ आहेच. याविरुध्द खरे तर विरोधी पक्षांनी मोठे आंदोलन संघटित करण्याची गरज आहे.

## आंदोलनच हवे

याबाबत न्यायालयांनी सर्वात मोठी निराशा केली आहे. बंगालचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असता त्यांनी हा सर्व तमाशा थांबवायला हवा होता. २७ लाख मतदार विनाकारण संशयित या रकान्यात ढकलले जाऊन मतदान करू शकणार नाहीत हे न्यायालयाला दिसत होते. त्यावर पुढच्या वेळी तुम्हाला मिळेल की मतदान करायला असे वक्तव्य सन्माननीय न्यायाधीशांनी केले. त्यामुळे न्यायालये ही संवेदनशील राहिलेली नाहीत असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. या स्थितीत केवळ विरोधी पक्षांकडेच आशेने पाहता येऊ शकते. आता ज्यांना नोटिसा निघतील त्यातले अनेक मतदार बाहेरगावी असू शकतील. त्यांना पैसे खर्च करून व नोकरीधंद्याची खोटी करून सुनावणी नावाच्या भानगडीला उपस्थित राहावे लागेल. देशासाठी सैन्यातून लढलेले अधिकारी, न्यायाधीश, सरकारी कर्मचारी यांनाही नोटिसा आल्याची उदाहरणे आहेत. खरोखर या मतदार तपासणीइतकी बेअक्कल व क्रूर मोहीम अन्य कोणती नसावी. आधारकार्ड हा ओळखीचा पुरावा म्हणून आणला गेला. पण त्यावर पत्ता तसेच जन्मतारीख असते. हे कार्ड आता तुमच्या मोबाईलशी जोडणे जवळपास सक्तीचे झाले आहे. तुमचे आधार व पॅनकार्ड जोडावेच लागते. म्हणजे तुमच्या नागरिकत्वाची खात्री वेगवेगळ्या मार्गाने होत असते. पासपोर्ट देण्यासाठी पोलिस घरी येऊन तुम्ही दिलेल्या पत्त्यावर राहता आहात की नाही याची खातरजमा करून जातात. म्हणजे तोही पुरावा भक्कम असतो. पण, इतके सगळी कार्डे आणि पासपोर्ट किंवा विजेचे बिल वगैरे सादर केलेले असूनही निवडणूक आयोग तुमच्या नागरिकावर शंका घेतो. नावात फरक का आहे वगैरे खुसपटे काढतो. वर उदाहरण दिलेल्या सीएनआर राव यांचे आधार व इतर बायोमेट्रिक ओळखी असतीलच. तरीही निव्वळ स्पेलिंगच्या फरकामुळे त्यांच्याबाबत शंका घेणे हे भयंकर आहे. बीएलओ वगैरे अत्यंत कनिष्ठ दर्जाचे कर्मचारी असतात. त्यांच्यावर कामाचा ताण असतो. त्यातल्या काहींनी आत्महत्याही केल्या आहेत. असे कर्मचारीही लिहिताना चुका करू शकतात. आता अर्ज भरताना अनेकांनी २००२ च्या मतदारयादीतील नोंदींच्या रकान्यात समजा आपल्या आईचे नाव लिहिले असेल तरीही अनेक ठिकाणी या बीएलओंनी वडिलांचे नाव नाही म्हणून मतदारांना नोटिसा काढल्या आहेत. असला गावंढळ अडाणीपणा सखोल तपासणीच्या नावाखाली नागरिकांच्या माथ्यावर लादला जात असेल तर त्याला कडाडून विरोध करण्याची गरज आहे. यामध्ये अंतिमतः भाजपला नको असलेल्या मतदारांची नावे यादीतून हटवणे हाच हेतू असल्याची शंका अधिकाधिक बळकट होत चालली आहे. राज्यात पुढच्या महिनाभरात याबाबतचे चित्र स्पष्ट होईल. मात्र, विरोधकांनी जागरुक राहून भाजपचे मनसुबे हाणून पाडायला हवेत.

विचार

# शेती उद्योग आणि दासळी ग्रामीण अर्थव्यवस्था

**आपल्या या खंडप्राय अशा कृषीप्रधान देशात सुमारे ७०% लोकवस्ती ही ग्रामीण भागात वसलेली आहे. शेती हाच येथील मुख व्यवसाय चालत अढिला आहे. ''शेती हाच मानवी संस्कृतीचा पाया व मुख्य आधार'' मानला गेला आहे. पण, आज मात्र पारंपरिक पद्धतीने केल्या जाणारा शेतीला एक प्रकारे अवकळाच प्राप्त झालेली आहे.**



अशोक धुमाळ

''शेतातील पिकांवर नैसर्गिक आपत्ती, रानटी प्राण्यांचा पिकांवर हैदोस, वाढते औद्योगिकीकरण (राष्ट्र प्रगतीच्या दृष्टीने ते पोषक असले, तरी शेती व शेती उद्योगाला ते मारक आहे) याशिवाय पारंपारीक पद्धती ला कवटाळून बसल्यामुळे आधुनिक ज्ञान तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे शेती व्यवसाय डबघाईला आलेला आहे.'' आणि म्हणूनच शेत पिकांवर अवलंबून न राहता शेतीपूरक व्यवसायाकडे अधिकाधिक उत्पन्नाचा स्रोत,' व अधिक नफा मिळविण्याच्या दृष्टी शेतीवर आधारीत जोडधंद्यांची निवड अपरिहार्यच ठरते.

सर्वसामान्य शेतकऱ्याला ही शेतीपूरक अशा व्यवसायाची निवड करून निव्वळ शेतीतीतील पीक उत्पन्नापेक्षा अधिक उत्पन्न मिळविता येते. असे अनेक शेतीशी निगडीत जोडधंदे आहेत. उदा. फुलशेती, फळशेती, कुक्कुटपालन, मत्स्य व्यवसाय दुग्धव्यवसाय, शेळी पालन इत्यादि अनेक शेतीपूरक व्यवसाय अधिक फायदेशीरच आहे. फुलांची मागणी सणासुदीला, एखाद्या समारंभात जास्त असते. त्यामुळे फुलशेतीत अधिक नफा मिळतो. फळ शेतीस तर नुसती फळांची विक्री न करता फळांवर प्रक्रिया करून जॅम, फळे वाळवून त्यापासून अधिक नफा मिळतो. कुक्कुटपालनातही अंडी, मांसच्या दृष्टीने नफा देणाराच आहे. मत्स्यव्यवसायात तळ्यातील माशांची ३-४ महिन्यात चांगली पैदास होते. त्यांच्या विक्रीतून चांगला लाभच होतो. अलीकडे 'मागेल त्याला शेततळे' ही सरकारी योजना आहे. व त्याला अनुदान, सबसिडी ही असते. त्यामुळे त्याचा ही लाभ घेऊन मत्सव्यवसाय तेजीत आणून फायदा मिळविता येईल. दुग्ध व्यवसायात ही चांगला नफा मिळविता येतो. शेळी पालन तर कमी खर्चात उभारता येणारा व्यवसाय आहे. कारण शेळीला लागणारा चारा शेताच्या बांधावरच उपलब्ध असतो. विविध वनस्पती, झुडपे यातून भरपूर चार मिळतो. असे अनेक जोडधंदे जास्त नफा मिळवून देणारच आहेत.

असे शेतीपूरक व्यवसाय करण्यास भरपूर जागा व अन्य सुविधा शेतीमधूनच उपलब्ध होऊ शकतात. उदा. पर्यटकांसाठी शेतातच शेड उभारून पर्यटन व्यवसाय चालू करता येतो. अर्थात, या सर्व शेती उद्योगांचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. त्यासाठी आधुनिक तंत्राचा अवलंब केला पाहिजे. पाण्याचा योग्य वापर होण्यासाठी ठिबक सिंचनाच्या योजनेचा स्वीकार करावा. आज मजुरांची कमतरता, अशावेळी ट्रॅक्टर व त्यासंबंधी यंत्राचा वापर करावा. शेतातच एक खड्डा खणून गांडूळ खत एक रासायनिक खताला पर्याय म्हणून सेंद्रीय खत निर्माण करता येतो. आवश्यक तितके गांडूळ खत ठेवून बाकीच्याची विभागणी ही करून नफा मिळविता येतो असे इतर अनेक जोडधंदे करून नफा मिळविता येतो.

अशो अनेक शेतीपूरक व्यवसायाला ग्रामीण अर्थव्यवस्था सर्वोतोपरीने आर्थिक सहाय्य करते. तसेच ही ग्रामीण अर्थव्यवस्था गरिबी, बेरोजगारी, कृषीवरील संकटावर मात करणारी एक अत्यंत प्रभावी उपाययोजना आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था रोजगार प्राप्त करू शकते. आर्थिक नियोजन ही करते. कुटरी उद्योगात हस्तकला, शिल्पकला, इत्यादी व्यवसायाना चालना देते. पायाभूत सुविधा व गावातच रोजगार उपलब्ध करून देते. त्यामुळे गावाला आर्थिक स्थिरता, आत्मनिर्भता सामाजिक-सांस्कृतिक विकास निश्चित होतो. इतकेच नव्हे तर, ग्रामीण अर्थव्यवस्था ग्रामीण भागातील लोकांच्या उपजीविकेचे प्रश्न सोडवून त्याना गांव सोडून शहराकडे जावे लागत नाहीत. ग्रामीण विकास व समृद्धी प्राप्त करून देते. शेती उद्योगाच्या दृष्टीने ग्रामीण अर्थव्यवस्थेचे योगदान फार मोठेच आहे. आणि म्हणूनच ग्रामीण अर्थव्यवस्था आणि मजबूत, स्वयंपूर्ण व सक्षम असावी. परंतु दुर्दैवाने आज महाराष्ट्रातील ग्रामीण व्यवस्था पूर्ण ढासळली आहे. ढासळत आहे. आणि त्याचे दुष्परिणाम शेती, उद्योगावरच नव्हे तर सर्वच रोजगार दिसून येत आहेत. गरिबी दिवसेंदिवस वाढत आहे. येथील बेरोजगार युवा रस्त्यावर आलेला आहे. सर्वच क्षेत्रात अगदी औद्योगिक क्षेत्रातही ही योग्यता असताना नोकरीची संधी मिळत नाही. कृषी व्यवसायावरील नैसगिक आपत्तीची जणू मालिकाच सुरू आहे. अशा एकूण परिस्थितीत शेती व्यवसायाला आर्थिक सहाय्य वेळीच ग्रामीण अर्थव्यवस्थेकडून, शासनाकडून मिळणे क्रम प्राप्तच आहे. पण, ढासळत चाललेल्या अर्थव्यवस्थेला तेही शक्य होत नाही. खरं तर, शेती उद्योगांना वेळीच आर्थिक सहाय्य मिळणे आवश्यक आहे. विविध सरकारी योजनांचा लाभ मिळावयास हवा. पण, ग्रामीण विकासाबाबत उदासीनताच दिसून येते. वास्तविक खेडी हाच शहरांचा आत्मा आहे. येथून फळे, भाजीपाला, कच्चा माल शहराला पुरविला जातो. असे हे सर्व असताना ग्रामीण भाग दुर्लक्षित राहिलेला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था ढासळत असल्यामुळे ती वरील अनेक समस्यांचे निराकरण करून शकत नाही.

येथील शेती उद्योगाही आवश्यक सुविधा मिळत नाहीत. पाणी, रस्ते, वीज, यासारख्या मूलभूत गरजा ही भागविल्या जात नाही. अपुऱ्या किंवा अनियमित वीज पुरवठ्यामुळे अनेक शेती उद्योग ठप्प होताना दिसतात. वीज, पाणी, याची योग्य ती शाश्वती नसल्यामुळे अनेक शेती उद्योग इच्छा असून करता येत नाही. ग्रामीण भागात पाण्याचे तर प्रचंड दुर्भिक्ष्यच आहे. पिण्याचे शुद्ध पाणी न मिळाल्यामुळे डबक्यातील वा तळ्यातील पाणी येथील लोकांना प्यावे लागते व त्यामुळे ते पटकी कॉलरासारख्या महामारीला बळी पडून मृत्युमुखी पडतात. जी गोष्ट वीज, पाण्याची तीच गोष्ट खड्ड्यानी भरलेल्या रस्त्यांची! मोठ मोठ्या खड्ड्यांमुळे अनेक अपघात घडून मत्युमुखी पडावे लागते आहे. रस्त्यावरील खड्डे हे मृत्युचे सापळेच बनले आहेत. एक अनेक प्रश्न, समस्या उद्भवत आहे. आणि त्याचे एकमेव कारण म्हणते आमुची ढासळणारी ग्रामीण अर्थव्यवस्था! अशी ढासळणारी ग्रामीण अर्थव्यवस्था कां व्हावी, याची कारणे अनेक आहेत. भ्रष्टाचार, शासनाचा ग्रामीण भागाकडे पहाण्याचा उदासिन दृष्टीकोन, ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष इत्यादी अनेक कारणे असतील पण वास्तव मात्र हेच आहे, आमुची ग्रामीण अर्थव्यवस्था ढासळती आहे.

## माती

*सृष्टीमधल्या चराचराला मातीचा आधार*
*माती असते सदा उदार ।।*
*संजीवनी ती तरूवेलीना आणते बहार*
*माती असेते सदा उदार।*
*माती, पाणी, उजेड वारा, जन्म*
*लाभतो बिनांकुराला मातीतच अंकुर*
*रूजला, अंकुरातून रोप प्रकटला*
*रंग पाचूचा त्यास बिलगला।*
*गंध मातीचा घेवोनी वाऱ्या संगे डोलू*
*लागला, तोच होता मातीचा हुंकार*
*माती असते सदा उदार ।।*
*चिखल मातीची साथ*
*संगीत कृषीवलाला,*
*कष्टपूर्ती शेतकऱ्याला मातीतून तो*
*मोती पिकवी, त्या मोत्यांचे धनधन्याचे*
*उदार हस्ते दान करते भारंभार*
*माती असते सदा उदार।।*
*माती झाली.. माती झाली*
*कां ओरडता, कां रडता*
*माती नसते विनाशकारी*
*माती-माती देवतासम असती दोन्ही*
*एक असते जन्मदायी.. दुसरी*
*असते जीवनदायिनी मातीच्या*
*कणाकणातुनी हवे हवे ते सारे मिळते*
*माया तिची ही अपंपार।।*
*माती असते सदा उदार*
*माती आपुल्या रायगडाची साधूसंताच्या,*
*शूरवीरांच्या-छत्रपती शिवरायाच्या*
*पदस्पर्शने पुनीत पावन झालेली*
*इथली माती त्या मातीस वंदन*
*करूनी, टिळा लावू कपाळी*
*दिव्याचा घडतो साक्षात्कार।।*
*माती असते सदा उदार ।।*

चर्चा आजची

# गणेशोत्सवात आरोग्यम् धनसंपदा

अंतरा पारंगे

रायगड जिल्ह्यामध्ये सध्या पावसाळी हंगाम सुरू आहे. मात्र कधी पाऊस तर कधी ऊन असे वातावरण आहे. या बदलत्या वातावरणाचा परिणाम मानवी आरोग्यावर होण्याची भीती निर्माण झाली आहे. तर पावसाच्या साचलेल्या पाण्यामुळेदेखील अनेक साथीचे रोग पसरतात. नकळत दूषित पाणी पिण्यात आल्याने आजारांना सामोरे जावे लागते. या दूषित पाण्यामुळे जुलाब, उलटी, टायफॉइड, गॅस्ट्रो, विषाणू, जीवाणूंचे आजार व जंतूची वाढ यांसारखे आजार होतात. अशातच येत्या १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सव सुरु होणार आहे. गणेशोत्सवासाठी नागरिक मोठ्या संख्येने घराबाहेर पडतात. अशा वेळी नागरिकांना साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी जिल्हा परिषदेकडून धन्वंतरी आरोग्य अभियान राबविले जाणार आहे.

रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात आणि उतसाहत साजरा केला जातो. घरोघरी दीड दिवसांपासून पाच, सात ते दहा दिवसांच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. या गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने चाकरमानी, नागरिकांची ये-जा सुरू असते. एसटी स्थानकापासून बाजारपेठ व अन्य ठिकाणी नागरिकांची वर्दळ असते. या काळात पावसाळी वातावरण, ठिकठिकाणी साचलेले पाणी, अस्वच्छता, डासांची पैदास होण्यास पोषक परिस्थिती निर्माण झाल्याने डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, अतिसार, कावीळ, टायफॉईड, लेप्टोस्पायरोसिस यांयारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता असते. त्यामुळेच उत्सवाच्या काळातही नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे व तातडीने उपचार मिळावेत यासाठी, जिल्हा परिषदेच्या वतीने 'धन्वंतरी आरोग्य अभियान' राबविण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व गणेशभक्तांना याचा लाभ होणार असल्याची चर्चा आहे.

पावसाळ्यात निर्माण झालेली अस्वच्छता, दूषित अन्नपाणी, डास-कीटक आणि बदलते हवामान यामुळे नागरिक मोठ्या प्रमाणात आजारी पडत असल्याचे दिसून येत. त्यातच आलेल्या पुराच्या पाण्यामुळे अनेक गावांमध्ये दूषित पाणीपुरवठा झाल्याने प्रत्येक घरी लहान-मोठ्या व्यक्तींना ताप, सर्दी, कोरडा खोकला, डोकेदुखी, जुलाब,




उलट्या अशा साथीच्या आजाराची लागण होत सुरु असते. त्यामुळे ऐन गणेशोत्सवात जिल्ह्यात साथरोगांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे दिसून येते. या आजारपणामुळे नागरिकांच्या उत्साहावर विरजण पडू नये, तसेच उत्सवाच्या काळातही नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणार असलेल्या या धन्वंतरी आरोग्य अभियानाचा नागरिकांना निश्चितच फायदा होणार असल्याची चर्चा आहे.

नागरिकांच्या चांगल्या आरोग्यासाठी स्थानिक प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून नेहमीच प्रयन्त सुरु असल्याचे दिसून येते. घरात व आजूबाजूला स्वच्छता ठेवा. डासांची पैदास होऊ नये म्हणून पाणी साठू देऊ नका. उकळलेले पाणीच प्यावे, झाकून ठेवलेले अन्नपदार्थ वापरावे, असे आवाहन सतत नागरिकांना करण्यात येते. गाव, शहर, शाळा, बाजारपेठ येथे स्वच्छतेच्या सूचना तसेच जनजागृती केली जाते. आरोग्य कर्मचाऱ्यांकडून दररोज फवारणी व तपासणी होत असते. अशातच जिल्हा परिषदेकडून धन्वंतरी आरोग्य अभियान राबविण्यात येणार असल्याने नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

गणेशोत्सवासाठी नागरिक मोठ्या संख्येने घराबाहेर पडतात. याच पार्श्वभूमीवर नागरिकांना त्यांच्या परिसरातच आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमात ग्रामपंचायत स्तरापासून जिल्हा स्तरावर आरोग्यसेवक, अंगणवाडी सेविका, आशासेविका यांच्यामार्फत साथीच्या रोगांची लक्षणे, त्यावरील उपचार, खबरदारीच्या उपाययोजना याबबात व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. गणेश मंडळांकडूनदेखील ध्वनिक्षेपकावर साथरोगांबाबत माहिती दिली जाणार आहे. तसेच सोशल मीडियाद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच, मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांमध्ये विशेष आरोग्य पथक तैनात ठेवण्यात येणार आहे. या पथकाद्वारे प्राथमिक उपचार करण्यात येणार आहेत. एसटी डेपो, बाजारपेठा, गणेश मंडळ परिसर अशा परिसरात स्वच्छतेच्या संदर्भात पाहणी, गर्दीच्या ठिकाणी औषध फवारणी, डेंग्यू व मलेरिया निदानासाठी आवश्यक तपासणी किट उपलब्ध करून योग्य ती खबरदारी घेण्यात येणार आहे.

**गणेश मंडप परिसर व सार्वजिनक स्वच्छता :** सर्व गणेशात्सव मंडळांना त्यांच्या मंडप परिसरात पाणी साचू न देणे, कचऱ्याची नियमितपणे योग्य ती विल्हेवाट लावणे, स्वच्छता राखणे, पिण्याच्या पाण्याची शुद्धता राखणे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यासोबतच संबंधित ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपालिकांच्या सहाकार्याने स्वच्छता राखणे, पिण्याच्या पाण्याची तपासणी करून घेण्यासह मंडपांमध्ये जनजागृतीपर फलक लावले जाणार आहेत. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांना त्यांच्या घराजवळच प्राथमिक आरोग्य तपासणीची सुविधा मिळणार असल्याने आजारांचे वेळेत निदान होण्यास मदत होणार आहे. गल्लोगल्लीतली सार्वजनिक आणि नावाजलेल्या मोठमोठ्या सार्वजनिक मंडळांकडे आता गर्दीचा महापूर सुरू होईल. गर्दीत फिरणे, अवेळी जेवण, गोडाधोडाचे जेवण यांमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात. तसेच गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर फेरीवाले खाद्यपदार्थांची विक्री करतात. हे पदार्थ उघड्यावर असतात आणि त्यांच्या खाद्याच्या स्वच्छतेची अजिबात खात्री नसते. तर गणेशोत्सवाच्या काळात मावा आणि माव्याच्या पदार्थांची खरेदी केली जाते. जर हे पदार्थ शिळे असतील, तर पदार्थांच्या सेवनामुळे अनेक आजार उद्भवू शकतात. त्यामुळे या सणाचा पूर्णपणे आनंद लुटता यावा यासाठी नगरपरिषदेकडून राबविण्यात येणारे हे अभियान नक्कीच फायदेशीर ठरणार आहे.

लोकसंसद

## भारतीय रेल्वेने केलेली क्रांती

आतापर्यंत मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक करण्यासाठी एकच रेल्वे मार्ग उपलब्ध होता त्यामुळे मालवाहतुकी मध्ये पुष्कळ अडथळे निर्माण होत असत. प्राधान्य प्रवासी रेल्वे गाड्यांना असल्यामुळे मालगाड्यांना तासन्तास खोळंबून राहायला लागत असे आणि त्यामुळे माल नियोजित ठिकाणी किती वेळात पोहोचेल याचा हिशोब नव्हता. आता मालवाहतुकीसाठी नवीन रेल्वेमार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे, त्यामुळे रेल्वेत माल चढवल्यापासून नियोजित ठिकाणी किती वेळात पोहोचेल याचा अचूक वेळ सांगता येतो त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी झालेला आहे. नुकतेच वेस्टर्न डेडिकेटेड रेल्वे कॅरिडोरचे उद्घाटन मोदींच्या हस्ते झाले. सध्या २८४३ किलोमीटर लांबीचा मार्ग तयार झाला आहे, यामुळे मालवाहतुकीचा खर्च आणि वेळ या दोन्हींची बचत होणार आहे. या मालगाड्या दर ताशी शंभर किलोमीटर या वेगाने धावतील तसेच त्यांची क्षमता १३००० टन माल वाहून नेण्याची असणारआहे. या माल गाड्या डबल डेकर स्वरूपाच्या असतील आणि त्यामधून धान्य, भाज्या, फळे यंत्रे, खनिजे, इंधने रसायने अशा सर्व प्रकारच्या मालाची सुरक्षित वाहतूक होणार आहे. यामुळे कारखान्यातून तयार होणारा माल कमीत कमी वेळात निर्यातीसाठी बंदरांपर्यंत पोहोचणे आता सहज शक्य होणार आहे, यामुळे वाहतुकीचा खर्च कमी होऊन निर्यात क्षमता वाढणार आहे, या मार्गावरून धावणाऱ्या सर्व मालगाड्या विजेवर चालणाऱ्या आहेत, हे त्यांचे आणखी वैशिष्ट्य आहे. नव्या प्रकल्पामुळे भारताचा व्यापार आणि अर्थव्यवस्था यांच्यामध्ये मोठी वाढ होणार आहे रेल्वेने केलेली ही मोठी क्रांतीच आहे. मेक इन इंडिया आणि मेड इन इंडिया या नव्या धोरणांना याचा मोठा लाभ होणार आहे.

**– श्रीमती संध्या काटदरे**

दिनविशेष

# आग्र्याहून सुटका, छ. शिवाजी महाराज राजगड येथे सुखरूप पोहोचले

छत्रपती शिवाजी महाराज हे एक महान योद्धा होते. त्यांची आग्र्याहून सुटका ही एक अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक घटना आहे, ज्यामुळे त्यांचा धैर्य, बुद्धिमत्ता आणि धूर्तपणा अधोरेखित होतो. मिर्झाराजे जयसिंगच्या आश्वासनावरून छत्रपती शिवराय हे औरंगजेबाला भेटण्यासाठी आग्रा येथे आले होते, परंतु योग्य सन्मान न मिळाल्यामुळे औरंगजेबाला पाठ दाखवून शिवरायांनी दरबार सोडला. यामुळे अपमानित झालेल्या औरंगजेबाने छत्रपतींना कैद केले.

त्यांना या कैदेतून सुटण्यासाठी त्यांनी एक युक्तीपूर्ण योजना आखली. त्यांनी आपल्या विश्वासू सेवकांच्या मदतीने आग्र्याहून सुटण्याचा प्रयत्न केला. या योजनेत त्यांनी स्वतः ला मृत्यूच्या भासाने दाखवून, एक मृतदेह तयार केला आणि त्याला आग्र्याहून बाहेर नेण्याचा प्रयत्न केला. श्रीकृष्ण जन्मोस्तवानिम्मीत मिठाई वाटण्याचे महाराजांनी ठरवले. बादशहाकडे अर्ज करून हे आमचे पूर्वापार व्रत असून ते करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली. बादशाहनेदेखील लगेच परवनागी दिली. मिठाई भरलेले पेठारे आग्र्यातील प्रतिष्टीत मंडळी, सरदार, बादशाही वजीर, फकीर, साधू आणि गरीब जनतेकडे जाऊ लागले. मिठाई वाटपावेळी शिवाजी महाराजांच्या निवासस्थानी गर्दी होऊ लागली. पाहरेकरी पेटारे उघडून पाहणी करत असत, मगच पेटारे बाहेर जात असत. महाराजांनी मुलचंद सावकारामार्फात सर्व जडजवाहीर मोती, सोने, मोहरा दक्षिणेत पाठवून दिले. आता रोज पेठारे भरून मिठाई वाटण्यात येऊ लागली होती. त्यामुळे पहारेकरी पहिल्यासारखे कसून तपास न करताच एखाद दुसरा पेटारा तपासात व उर्वरित पेठारे तसेच जाऊ देत. हीच संधी होती शिवाजी महाराजांना तेथून सुटण्याची. १६ ऑगस्ट रोजी रामसिंग शंभूराजांसोबत औरंगजेबाच्या दरबारी मुजऱ्यास गेला असता औरंगजेबाने महाराजांनी मनसब कबुल करून त्यांच्याकडील किल्ले बादशहास सोपवून काबुलच्या स्वारीवर जावे असे आदेश दिले. परंतु,शिवाजी महाराजांनी बादशाहाचा हा आदेश नाकारला. औरंगजेबाचा हा शेवटचा इशारा शिवाजी महाराजांना समजला आणि त्यांनी आग्र्यातून निसटून स्वराज्यात परतण्याच्या मोहिमेला पूर्णस्वरूप देण्याचे ठरवले. १७ ऑगस्ट रोजी जुम्माचा दिवस असल्याने औरंगजेबाचा दरबार बंद होता. मशिदीत बादशाहसह सर्व जनता आणि दरबारी अधिकारी नमाजासाठी जाणार होते. शंभूराजे आज महाराजांसोबतच असणार होते. दुपारच्या सुमारास महाराजांचे डोके दुखू लागले. प्रकृती ठीक नसल्याने महाराज झोपी गेले आणि एक मुलगा त्यांचे पाय चेपीत तेथे बसला. मथुरेतील ब्राम्हण आणि फाकीरांना मिठाई वाटण्यासाठी पेटाऱ्यात मिठाई भरली जाऊ लागली. महाराज झोपेतून उठले आणि त्या ठिकाणी हिरोजी फर्जंद झोपी गेले. संध्याकाळच्यावेळी पेटारे मथुरेस रवाना झाले. त्यातील दोन पेटाऱ्यांत शिवाजी महराज आणि शंभूराजे बसले. पहारेकऱ्यांनी पहिले दोन पेटारे तपासले व उर्वरित पेटारे न तपासताच जाऊ दिले आणि महाराज बादशहाच्या कैदेतून निसटले. वेषांतर करून आणि विविध मुलूख पार करत महाराज सुमारे २५ ते २५ दिवसांच्या प्रवासानंतर १२ सप्टेंबर १६६६ रोजी राजगडावर सुखरूप पोहोचले. शिवाजी महाराजांनी आपल्या सूक्ष्म बुद्धिमत्तेने आणि धैर्याने या योजनेत यश मिळवले. शेवटी, छत्रपती शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका ही केवळ एक शारीरिक सुटका नव्हती, तर ती त्यांच्या स्वातंत्र्य आणि स्वाभिमानासाठी केलेल्या संघर्षाची एक महत्त्वपूर्ण घटना होती. या घटनेमुळे त्यांचा इतिहासात एक वेगळाच ठसा उमटला आणि ते आजही लोकांच्या मनात आदर्श म्हणून जिवंत आहेत.

# उल्हास नदी पुलावर सुरक्षा कठडे बसवले

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील मालेगाव दहिवली येथे उल्हास नदीवर असलेल्या पुलाचे कठडे उल्हासनदीला आलेल्या महापूरमध्ये वाहून गेले होते. त्याबाबत दोन महिने सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि स्थानिक वाहनचालकांनी आक्रमक भूमिका घेतली होती.



दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाने त्या पुलावरील सर्व संरक्षक कठडे नव्याने बसवून त्यांना रंगरंगोटी करण्याचे काम पूर्ण केले आहे.मालेगाव दहिवली येथील उल्हासनदी पुलावरून पावसाळ्यात किमान चारवेळा महापुराची पाणी वाहून गेले आहे. या महापुरात पुलाचे संरक्षक कठडे वाहून गेले होते. त्यामुळे बांधकाम खात्याने तेथे बांबूच्या काठ्या बांधून वाहनचालकांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र समाज माध्यम आणि स्थानिक वाहनचालक यांच्याकडून नाराजी व्यक्त होत होती. शेवटी महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला कडक इशारा देण्यात आला होता. वाहनचालकांच्या आक्रमक भूमिकेमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने गणेशउत्सव सुरु होण्याआधी पुलाचे संरक्षक कठडे नव्याने बसवले. संपूर्ण पुलाला नवीन लोखंडी पाईप बसवण्यात आले असून कठड्यांना रंगरंगोटीदेखील केली आहे.

## पान १ वरुन

## खड्ड्यांचे विघ्न कायम!

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली अलिबागमध्ये विविध विभागांची बैठक झाली होती. या बैठकीत गणेशोत्सवापूर्वी रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्याचे आदेश पालकमंत्र्यांनी दिले होते. मात्र, बैठक होऊन अनेक दिवस उलटूनही अलिबाग-रोहा मार्गावरील खड्ड्यांची पूर्णपणे दुरुस्ती झालेली नाही.

अलिबाग तालुक्यातील सुडकोली, नवघर, बेलकडे फाटा ते कुरुळ, वेळवली, खानाव ते एचपी कंपनीपर्यंत ठिकठिकाणी लहान-मोठे खड्डे पडले आहेत. गणेशोत्सवासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी तसेच बाप्पाच्या स्वागताच्या तयारीसाठी नागरिकांना याच खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे.

बाप्पाचे आगमन घराघरांत होणार; मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीनतेमुळे भक्तांना खड्ड्यांतूनच गणरायाला घरी आणण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालकमंत्र्यांच्या आदेशानंतरही रस्त्यांची दुरुस्ती का रखडली, असा सवाल प्रवासी वर्गातून उपस्थित होत आहे.दरम्यान, अलिबाग-रोहा मार्ग मंजूर असतानाही त्याची जबाबदारी संबंधित कंपनीकडून घेण्यात आलेली नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे खड्डे बुजविण्यासाठी अन्य ठेकेदारही पुढे येत नसल्याची चर्चा आहे. खड्डे बुजविण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याने उधारीवर काम करण्याची वेळ ठेकेदारांवर आली असल्याचे बोलले जात आहे. ठेकेदारांची मनधरणी करून खड्डे बुजविण्याचा प्रयत्न सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरू असल्याची चर्चा आहे.

## महामार्गावर ‘नो पार्किंग’

रायगड पोलिसांनी नो पार्किंग झोनची घोषणा केली आहे.

मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ वरील माणगाव येथील रेड्डीज हॉटेल ते ढालघर फाटा, निजामपूर नाका ते कालवा रोड, मोर्बा नाका ते पवार वाडा हॉटेल तसेच इंदापूर येथील माही हॉटेल ते कशेने बायपास मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा नो पार्किंग झोन घोषित करण्यात आले आहेत.

**असे असतील पर्यायी मार्ग**

पेण : तरणखोप-पेण बायपास-गागोदे-वरसई-पालीफाटा-परळी-जांभूळपाडा-पाली-वाकण.

वडखळ : वडखळ-पोयनाड-पेझारी-चेकपोस्ट-कुर्डूस-नागोठणे-वाकण.

नागोठणे : नागोठणे-वेलशेतफाटा-वरवठणे-भिसेखिंड-वाकण तसेच
नागोठणे-वेलशेतफाटा-वरवठणे-भिसेखिंड-रोहा-वाकण.

वाकण-नागोठणे : वाकण-पाली-नांदगांव-विळे-सुतारवाडी-कोलाड तसेच वाकण-पाली-नांदगांव-विळे-निजामपूर-माणगांव आणि वाकण-पाली-नांदगांव-विळे-निजामपूर-माल्याची वाडी-बोरवाडी-जांभूळवाडी-ढालघर.

कोलाड : कोलाड-सुतारवाडी-विळे-निजामपूर-माणगांव.

माणगाव : माणगांव-निजामपूर नाका-साईराम हॉटेल ब्रिज-मुगवली ब्रिज.

लोणेरे : लोणेरे-गोरेगाव-नांदवी-आंबेत-म्हाप्रळ.

राजेवाडी फाटा : पुढे पोलादपूरकडे वाहतूक कोंडी झाल्यास टोळफाटा (महाड)-आंबेत-म्हाप्रळ. या वाहतूक नियोजनाची अंमलबजावणी २६ सप्टेंबरपर्यंत राहणार असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## ‘उसने’ कर्मचाऱ्यांना खुर्ची सोडवेना!

२०११ पासून ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन येथे कार्यरत असल्याची नोंद आहे. भाग्यश्री भगवान विचारे, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती पनवेल, या २३ जानेवारी २०१५ पासून कोकण भवन येथे कार्यरत असल्याचे कागदपत्रांत नमूद आहे. तसेच प्रभा मधुकर भोये आणि श्ती दिलीप वाकडे या २०१६-१७ पासून कोकण भवन व ग्रामविकास विभागात कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

याशिवाय कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी, वरिष्ठ व कनिष्ठ सहाय्यक, शाखा अभियंता, वाहनचालक आणि परिचर यांचाही विविध ठिकाणी प्रतिनियुक्तीवर समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे.

ग्रामपंचायत अधिकारी, विस्तार अधिकारी, कनिष्ठ सहाय्यक आणि शाखा अभियंता हे ग्रामीण प्रशासनातील महत्त्वाचे दुवे मानले जातात. मात्र, हे कर्मचारी दीर्घकाळ मूळ ठिकाणी उपलब्ध नसल्यास ग्रामपंचायतींचे प्रशासकीय कामकाज, विकासकामे आणि नागरिकांची दैनंदिन कामे प्रभावित होण्याची शक्यता आहे. दाखले, पाणीपुरवठा योजना, शाळा-शिक्षण, आरोग्य आणि विविध विकासकामांशी संबंधित कामांवर याचा परिणाम होत असल्याचा दावा सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला आहे.

## एसी केबिन सोडा, ओपीडीमध्ये बसा!

तीन तास ओपीडीमध्ये रुग्ण तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासकीय खुर्चीत बसून कारभार पाहणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आता प्रत्यक्ष रुग्णसेवेत उतरावे लागणार आहे.

**डीएचओ संवर्गातील अधिकाऱ्यांना तीन प्राथमिक आरोग्य केंद्रे**

जिल्हा आरोग्य अधिकारी, अतिरिक्त व सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, माता-बाल संगोपन अधिकारी, जिल्हा क्षयरोग अधिकारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांनी जिल्ह्यातील तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट देऊन दर आठवड्याला किमान तीन तास सेवा द्यायची आहे.

**सीएस संवर्गालाही रुग्ण तपासणी बंधनकारक**

जिल्हा शल्यचिकित्सक, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक आदी अधिकाऱ्यांना जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय अथवा स्त्री रुग्णालयात जाऊन आठवड्यातून किमान तीन तास रुग्णांची तपासणी करावी लागणार आहे.

**फक्त ओपीडी नाही; फायर ऑडिटपासून व्हेंटिलेटरपर्यंत तपासणी**

वरिष्ठ अधिकाऱ्यांना रुग्णसेवेबरोबरच रुग्णालयातील सुरक्षाव्यवस्थेचीही प्रत्यक्ष पाहणी करावी लागणार आहे. फायर ऑडिट झाले आहे का, अग्निशमन यंत्रणा कार्यरत आहे का, कर्मचाऱ्यांचे मॉकड्रिल झाले आहे का, याची तपासणी करावी लागेल. आयसीयू, एनआयसीयू, प्रसूती कक्ष आणि ऑपरेशन थिएटरमधील व्हेंटिलेटर, बेबी वॉर्मर, ऑक्सिजन यंत्रणा यांसारखी जीवनरक्षक उपकरणे सुस्थितीत आहेत की नाही, यावरही लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश आहेत.

**औषधे, लसी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवरही नजर**

रुग्णालयांमधील औषधांचा तुटवडा, लसींचा पुरेसा साठा तसेच डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती याचीही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करायची आहे.

**कागदी अहवालाला फाटा; कसूर केल्यास कारवाई**

विशेष म्हणजे, केवळ कागदोपत्री अहवाल सादर करून जबाबदारी झटकता येणार नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या ओपीडी सेवा आणि क्षेत्रभेटींचा साप्ताहिक अहवाल आरोग्य सेवा आयुक्तालयाला सादर करावा लागणार आहे. क्षेत्रभेटी टाळणे, रुग्णसेवेतील त्रुटींकडे दुर्लक्ष करणे अथवा अनधिकृत गैरहजेरी आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई केली जाणार असल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

## लाचखोर वायरमन एसीबीच्या जाळ्यात!

मात्र, मीटर पुन्हा बसविण्याच्या कामासाठी अधिकृत शुल्काव्यतिरिक्त २० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप घनमोडे यांच्यावर आहे. तडजोडीनंतर ही रक्कम १८ हजार रुपये ठरल्याची माहिती समोर आली. लाचेची मागणी झाल्यानंतर तक्रारदाराने थेट एसीबीकडे धाव घेतली. याप्रकरणी तक्रारदाराने नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबधक विभागाकडे २ सप्टेंबर रोजी तक्रार दाखल केली होती.तक्रारीची पडताळणी केल्यानंतर खातरजमा करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने बुधवारी सापळा रचला होता. तक्रारीची पडताळणी करून एसीबीने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे १८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना घनमोडे यांना एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

या कारवाईनंतर उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. सरकारी यंत्रणेत सर्वसामान्य नागरिकांची कामे नियमाने आणि अधिकृत शुल्कात होणे अपेक्षित असताना त्यासाठी लाचेची मागणी होत असल्यास अशा प्रकारांना आळा घालण्याची गरज आहे. एसीबीच्या या कारवाईमुळे ‘काम हवे असेल तर पैसे द्या’ या मानसिकतेला चाप बसणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## खालापूरमधील भूमीपुत्रांना दिलासा

लढ्याला सर्वपक्षीय प्रतिसाद मिळाला. शेतकरी कामगार पक्षानेदेखील या लढ्याला पाठिंबा दर्शविला होता. स्थानिक तरुणांना उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी मिळाव्यात आणि व्यवसायाच्या प्रश्नांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन केले होते. स्थानिक भूमीपुत्र मोठ्या प्रमाणावर एकत्र आले होते. अखेर त्यांच्या या लढ्याला यश आले आहे.

गोदरेज सह टाटा समूहातील अधिकारी, स्थानिक भूमीपुत्र यांची एकत्रित बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात घेण्यात आली. या बैठकीत खासदार तटकरे यांनी दोन्ही बाजू ऐकून घेतली. अखेर त्यांनी तोडगा काढत स्थानिक भूमीपुत्रांना प्राधान्याने कंपनीत सामावून घेण्याबाबत सूचना केली. गेल्या तीन वर्षांपेक्षा अधिक कंत्राटी कामगार म्हणून असलेल्या स्थानिकांना कंपनीत सामावून घेण्याचे टाटा समुहाने मान्य केले. त्याबाबत एक ऑक्टोबरपर्यंत कार्यवाही करण्याचा इशारा दिला आहे. या सकारात्मक चर्चेला टाटा समुहाकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

त्यामुळे स्थानिकांना दिलासा मिळाला. मात्र, गोदरेज समूहाने तडजोडीचा मसुदा मान्य केला नाही. त्यामुळे तटकरेंनी या कंपनीच्या प्रशासनाबाबत नाराजी व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयाने पंधरा ते सोळा वर्षांपूर्वी गुरचरण जागेबाबत निर्णय दिला आहे. गुरुचण जमीन कोणत्याही कारणासाठी देण्यात येऊ नये. तरीदेखील गोदरेज कंपनीने गुरचरण जागेत अतिक्रमण केल्याचे तहसीलदारांनी मान्य केले आहे. आदिवासी समाजाच्या जमिनी हडप केल्या आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला न देता, जमिनी घेतल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे गोदरेज समूहाविरोधात कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असून, त्यांना याबाबत पत्र दिले आहे.

गोदरेज समूहाने अनधिकृत गौण उत्खनन केलेले आहे. सुमारे २२ कोटींची दंडात्मक कार्यवाही त्यांच्यावर करण्यात आली आहे. अनधिकृत गौण खनिजाचे उत्खनन व अतिक्रमणाची तात्काळ सखोल चौकशी करून कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून केली आहे.

## गडकरी, शिवेंद्रराजेंनी राजीनामा द्यावा

काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने थेट उड्डाणपुलावरच आंदोलन करून सरकार आणि संबंधित यंत्रणेला धारेवर धरले. शुक्रवारी (दि. ११) सकाळी ११ वाजता जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले.

या आंदोलनाला जिल्हा उपाध्यक्ष सज्जादभाई डावरे, श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष संताजी पवार, जिल्हा सरचिटणीस श्रीहर्ष कांबळे, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष समाधान म्हात्रे, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष सदानंद येळवे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष अजयशेठ महाडिक, अलिबाग विधानसभा अध्यक्ष सचिन पाटील, विधानसभा सरचिटणीस साईनाथ म्हात्रे, माणगाव तालुका अध्यक्ष राजू रोडेकर, जिल्हा महिला संघटक रिया रेडेकर, अनिता पवार व त्यांच्या महिला सहकारी, सुधागड तालुका अध्यक्ष दिनेश काटकर, गोरेगाव शहर अध्यक्ष अस्लम भऊर, पोलादपूर विभागीय अध्यक्ष भावेश सलागरे, दहिवली विभाग अध्यक्ष सलाउद्दीन सणगे, रोहा तालुका युवक अध्यक्ष मुजाहिद मुजावर, गुड्डू पानसरे, राहील कडवेकर, मिर्जा कुटकी, आलम खान, असिफ शेख, वसीम कडवेकर, शबाब पेणकर, मुशीद कुरेशी आदींसह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

**‘शंभर रुपयांचे काम दहा लाखांवर नेले!’**

यावेळी बोलताना रवींद्र चव्हाण यांनी महामार्गाच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप केला. त्यांच्या हितासाठी जवळच्या कन्स्ट्रक्शन कंपन्यांना कामे देऊन वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. शंभर रुपयांचे काम दहा लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आले, त्यामुळे नेत्यांच्या तिजोऱ्या भरत गेल्या आणि जनतेच्या पैशाचा अपव्यय झाला, असा आरोप त्यांनी केला. महामार्गाच्या कामात ठेकेदार कंपन्यांनी नियुक्त केलेल्या अभियंत्यांच्या पात्रतेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या अभियंत्यांवरही गैरप्रकाराचे आरोप करत ‘या भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची ईडीमार्फत चौकशी करा’, अशी मागणी चव्हाण यांनी केली.

**‘कोकणी माणसाला मिळतात फक्त आश्वासने!’**

गणपती आणि शिमग्याच्या सणासाठी कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना वर्षानुवर्षे केवळ आश्वासनेच मिळत असल्याची टीका चव्हाण यांनी केली. मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामामुळे अनेकांना जीव गमवावा लागला असूनही सरकार गांभीर्याने घेत नसल्याचा आरोप त्यांनी केला.


### जाहीर नोटीस

सर्व जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक श्री. मंगेश जगन्नाथ माळवी, रा. देवी मंदिराजवळ, धोकवडे नं. १, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१ यांचा अविभक्त हिस्सा खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेला आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड | ६६५ | ०-६०-२०<br>पो.ख. ०-०६-६०<br>एकूण ०-६६-८० | १६-१९ |

वर नमूद मिळकतींपैकी विकत देणार यांचे अविभक्त हिश्श्याची मिळकत.

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क,वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.१२.०९.२०२६

सही/-
**ॲड.मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक कार्यालय
अलिबागच्या समोर अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२



### निविदा सूचना

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, पिन नं-४०२१०७ यांचे कार्यालय**

ई मेल पत्ता:- eehmpd@rediffmail.com eehmpd२०२१@gmail.com,
दूरध्वनी-०२१४३-२७८०११

**ई निविदा सूचना क्र. ०९ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील वर्ग ४ अ व पुढील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून (खुला प्रवर्ग) खालील कामांकरीता प्रथम वेळेस ब-१ नमुन्यातील ई-प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय किंमत | इसारा रक्कम | काम पुर्ण करायचा कालावधी | निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वनविभाग अलिबाग रेंजमधील सांबारकुंड प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील वनक्षेत्राच्या सीमांकनासाठी वर्ग व वर्ग २ च्या कायमस्वरुपी सिमाचिन्हांचे बांधकाम करण्याचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी सादर करणेबाबत. | रु.५९,३६,५६०/- | रु.६०,०००/- | १२ महिने (पावसाळयासह) | रु.२,०००/-+ ३६०/- (१८% GST) एकुण रू.२,३६०/- | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील वर्ग ४ अ व पुढील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून (खुला प्रवर्ग) |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| अ. क्र | | सुरुवात दिनांक | सुरुवात वेळ | समाप्ती दिनांक | समाप्ती वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्रि आणि डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि. १५.०९.२०२६ | ११.०० | दि. २२.०९.२०२६ | १८.०० |
| २ | बिड सबमिशन करण्याचा कालावधी | दि. १५.०९.२०२६ | ११.०० | दि. २२.०९.२०२६ | १८.०० |
| ३ | तांत्रिक लखोटा उघडणेचा दिनांक व स्थान | दि. २३.०९.२०२६ | १८.०० | कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली ता.पेण जि.रायगड | |

खालील ठिकाणी ई- निविदा बाबत सर्व माहीती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ : http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली-पेण कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. हे प्रवि/लेशा-१/ ई-निविदा/२०३८/२०२६
हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता.पेण, जि.रायगड,
**दिनांक :- ०९/०९/२०२६**

सही/-
**(दि.क्त.राजभोज)**
**कार्यकारी अभियंता,**
**हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग,**
**कामार्ली ता.पेण जि. रायगड**

**विमाका/ कोवि/२०२६-२०२७/९३**



### श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन

रविंद्र नारायण राऊत प्रशासकीय भवन
ता. श्रीवर्धन जिल्हा-रायगड
(I.S.o. ९००१:२०१५ प्रमाणित )

दूरध्वनी क्रमांक : ०२१४७-२२२३७८ ई-मेल: shriwardhan.nagarparishad@gmail.com

क्र.श्रीनप/विद्युत/पा.पु.वि./कर्मचारी/निविदा/१०३९/२०२६ दिनांक :- ११/०९/२०२६

**जाहीर निविदा सूचना (पाणीपुरवठा / विद्युत विभाग)- क्र.पा.पु.वि.-०१/२०२६-२७**

श्रीवर्धन नगरपरिषद इच्छुक ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून खालील कामासाठी द्विलीफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा दरपत्रके मागवीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म रक्कम रु. | इसारा रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरिता श्रीवर्धन नगरपरिषद विद्युत विभागाकडील दैनंदिन विद्युत पुरवठा, देखभाल व दुरुस्ती कामाकरिता कुशल अकुशल कर्मचारी बाह्ययंत्रणेद्वारे (सेवा शुल्क पद्धतीने) पुरविणे. | १०००/- | १०,०००/- |
| २. | सन २०२६ - २०२७ या वित्तीय वर्षाकरिता श्रीवर्धन नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकडील दैनंदिन पाणीपुरवठा, देखभाल व दुरुस्ती कामाकरिता कुशल- अकुशल कर्मचारी बाह्ययंत्रणेद्वारे (सेवा शुल्क पद्धतीने) पुरविणे. | २०००/- | २५,०००/- |

**अटी व शर्ती**

१. विहित नमुन्यातील सर्व अटी व शर्तीसह निविदा पत्रे / फॉर्मची विक्री श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत दिनांक ११/०९/२०२६ ते दिनांक २१/०९/२०२६ पर्यंत कामकाजाचे दिवशी निविदा फॉर्म फी रक्कम श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयात भरणा करून निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करून घेता येतील.
२. विहित निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लिफाफ्यात दिनांक ११/०९/२०२६ ते दिनांक २१/०९/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयात दाखल करता येतील.
३. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २२/०९/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत श्रीवर्धन नगरपरिषदेच्या मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात उघडण्यात येतील.
४. तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आलेली आहेत.
५. उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
६. सही नसलेली व अटी अगर शर्तीची निविदा स्विकारली जाणार नाही.
७. निविदा सूचना व करारनामा हा निविदेचाच एक भाग असेल.
८. मंजूर झालेल्या ठेकेदारांची इसारा रक्कम ही सुरक्षा अनामत रक्कम म्हणून गृहीत धरण्यात येईल. सदर निविदेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यांनी इसारा रक्कम परत केली जाईल.
९. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे, नाकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवले आहेत.
१०. नगरपरिषदेने ज्या कंपनीला ठेका अथवा त्यांचेशी संबंधित व्यक्तींना निविदा न देण्याचा निर्णय घेतला आहे, अशा कंपनीला व त्यांचेशी संबंधित व्यक्तींना नगरपरिषदेकडे प्राप्त निविदांमध्ये कोणत्याही ठेकेदाराचे प्रतिनिधित्व करता येणार नाही.

सही /- **(अवधूत कुंभार)** **मुख्याधिकारी** **श्रीवर्धन नगरपरिषद**

सही/- **(अनंत गुरव)** **उपाध्यक्ष** **श्रीवर्धन नगरपरिषद**

सही /- **(अतुल चौगुले)** **अध्यक्ष** **श्रीवर्धन नगरपरिषद**



### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** – कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागांतर्गत कुडाळ आणि कणकवली स्थानकांवरील एफओबीसाठी प्रत्येकी 02 प्रवासी लिफ्ट्सची (मशीन रूम विरहित) रचना, पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयन करण्याचा प्रस्ताव. (20 प्रवासी लिफ्ट / 1360 किग्रॅ / 1 वेग / 2 मजले / 2 थांबे / स्टेनलेस स्टील (1.5 मिमी) कार केबिन). आरडिएसओच्या मंजुरी आणि विनिर्देशानुसार. (विनिर्देश क्र.: आरडिएसओ/2013/ईएम/एसपीइसी/0016 (रेव्ह'2')-2025 किंवा नवीनतम). **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/17सी/2026 दिनांक 12/09/2026, अंदाजित खर्च** – ₹ 1,02,23,923/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 2,04,500/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 28/09/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे महागांव, ता.सुधागड, जि.रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १)नविद महमद इस्ताकखान. २) शफी अहमद उस्मानखान. ३)नवीद इस्हाक खान. ४) परवेझ इस्हाक खान. ५)तन्वीर साजीद डोलारे. ६) खुर्शीद खालिद उकैय.७)सुरैय्या अब्दुलसत्तार खान. ८) गजनफर अब्दुलसत्तार खान. ९) समिर अब्दुलसत्तार खान. १०) फौजन अब्दुसत्तार खान.११) अबरार अब्दुलसत्तार खान. १२)सदिकाबानू काझी.१३) शेरे अंजुम काझी.१४) शमशा आलम काझी. १५) फहादअली काझी. | ३९८ | १-४०-६० | ४-३४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणातीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १२/०९/२०२६

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोडसदन ऑफिस नं. ५
पाली, ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे - बिरवाडी, ता. रोहा, जि. रायगड येथील श्री. सुनिल कृष्णा महाले व सौ. नीता सुनिल महाले, रा. नवीन पनवेल, जि.रायगड यांच्या खुद्द मालकीच्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे- बिरवाडी, ता.रोहा, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ७४, क्षेत्र ०-६८-०० हे. आर + पो.ख. ०-०४-५० हे. आर, एकूण क्षेत्र ०-७२-५० हे. आर, आर रु. १५.५६ पैसे. या भातशेती मिळकती पैकी श्री. सुनिल कृष्णा महाले यांचे मालकीचे क्षेत्र ०-५०-०० हे. आर + पो.ख.०-०४-५० हे. आर, एकूण क्षेत्र ०-५४-५० हे. आर, आकार रु. ११.४४ पैसे.

व

मौजे बिरवाडी, ता. रोहा, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ९२/ब, क्षेत्र ०-५६-०० हे.आर + पो.ख.०-०३-०० हे.आर, एकूण क्षेत्र ०-५९-०० हे. आर, आकार रु. १२.०७ पैसे. या भातशेती मिळकती पैकी श्री. सुनिल कृष्णा महाले व सौ. नीता सुनिल महाले यांचे मालकीचे क्षेत्र ०-२६-०० हे.आर, आकार रु. ५.६० पैसे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकती विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतींसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलंवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १२/०९/२०२६

सही/-
**ॲड. ऋग्वेद अविनाश ठाकूर.**
रा. ५/३, आत्माराम नगर,
अलिबाग- रायगड
मोबा. नं. ९८५००९०१०३

## आर्थिक शिक्षण कार्यक्रमाला प्रतिसाद

**तळा :** राष्ट्रीय सेवा योजना जी. एम. वेदक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, तळा यांच्या वतीने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी आर्थिक शिक्षण आणि स्मार्ट गुंतवणूक, जोखीम जागरुकता आर्थिक नियोजन आणि संपत्तीनिर्मिती या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास रेणू राहते यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक नियोजनाचे महत्त्व सांगितले.

---

अर्जदार तर्फे वकिल ॲड. मनिका मधुकर पाटील

**श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायधिश (क.स्तर) सो., यांचे कोर्टात**

दिवाणी चौ. अर्ज क्र.३८/२०२६
नि.७/ड
नेता-२७/१०/२०२६

### जाहीर नोटीस

१. श्रीम. नसरीन अमनुल्ला फणसे
वय ५५ वर्षे, धंदा - गृहिणी
२. कु. अब्दुलरेहमान अमनुल्ला फणसे — अर्जदार
वय - २४ वर्षे, धंदा - शिक्षण
३. श्रीम. आफ्रिन निहाल पेनकर
वय-३० वर्षे, धंदा - गृहिणी
अर्जदार क्र. १ ते ३
रा. साने आळी मोहोल्ला, म्हसळा
ता. म्हसळा, जि. रायगड.

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे- सानेआळी मोहल्ला, ता.म्हसळा, जि.रायगड येथील मयत कै.अमानुल्ला शमसुद्दीन फणसे यांचे दिनांक ०५/११/२०२० रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मयताचे वाली वारस अर्जदार क्र. १ ते ३ हे आहेत. मयत कै.अमानुल्ला शमसुद्दीन फणसे यांचा मु.साने आळी मोहल्ला, ता.म्हसळा, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधानानंतर त्याच्या पश्चात अर्जदार यांचे नाव शासकीय, निमशासकीय, बँका, पतपेढया, पतसंस्था दाखल करणे करिता अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशिर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक १०/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता.१०/९/२०२६

सही/- — सही/-
**क.लिपिक न्यायालय, श्रीवर्धन** — **सहाय्यक अधिक्षक, दिवाणी दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

---

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे तुडाळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकती श्री. दिपक गजानन म्हात्रे, राहणार बामणसुरे, ता. अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्यास बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतींवरील श्री. दिपक गजानन म्हात्रे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतींचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तुडाळ, ता.अलिबाग. | २५/२ | ०-२१-१० एकूण | ०-५३ |
| तुडाळ, ता.अलिबाग. | २५/१० | ०-०४-०० एकूण | ०-११ |

अलिबाग,
दिनांक ११/०९/२०२६.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल मिलींद मोरेश्वर देशमुख यांची वडीलोपार्जित मिळकत मौजे भालगांव ता.रोहा जि. रायगड. हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलनी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मालकाचे नाव : १) मिलींद मोरेश्वर देशमुख
रा. तळाशेत इंदापुर गणेश कॉलनी, ता. माणगांव, जि. रायगड
खालील वर्णनाच्या मिळकतीचे आमच्या आशिलाच्या अपरोक्ष खरेदी करण्याचा प्रयत्न तोतय्या इसम करण्याची शक्यता आहे

| अ.क्र. | मौजे | गट नं. | भो.ग.वर्ग. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|---|
| १) | भालगांव | ७३८ | १ | ०.१०.०० | ०.१६ |
| २) | भालगांव | ७४५ | १ | ०.१७.०० | ०.२० |
| ३) | भालगांव | ७३९/१ | १ | ८.०४.०० | ०.८६. |
| ४) | भालगाव | ५३८ | १ | ०.०२.३० | ०.०३ |
| ५) | भालगांव | १६ | १ | ०.०५.३० | ०.२० |
| ६) | भालगांव | ५३९ | १ | ०.००.२० | ०.०० |
| ७) | भालगांव | १२अ | १ | ०.०४.००. | ०.५७ |
| ८) | भालगांव | ५६८ | १ | ४.५४.०० | १.३५ |
| ९) | भालगाव | २७० | १ | ०.६९.०० | ०.४५ |
| १०) | भालगांव | १७४/१ | १ | ०.६७.५० | ०.४१ |
| ११) | भालगाव | १४७/२ | १ | ०.०८.५० | ०.०६ |
| १२) | भालगाव | १४५ | १ | ०.७६.०० | ०.४७ |

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसा, हक्क, लिज, चार्ज पोटगी, वहिवाट,(जाण्या-येण्याचा मार्ग),इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहार कोणी करत असल्यास आमच्या आशिलाची संमती घ्यावी अन्यथा तो व्यवहार अवैध ठरवण्यात येईल.

सदरचा मिळकती बाबतचा कोणताही प्रकार आमच्या आशिलाच्या संमती शिवाय केल्यास तो आमच्या आशिलास कायद्याने बंधनकारक राहणार नाही.

सदरची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्या सहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

माणगाव
दिनांक :- ०९-०९-२०२६ — सही/-

**Adv. P.M.JADHAV**
B.COM., LL.B
At.post:- indapur, Tal. Mangoan
Dist:-raigad, mo.no:-7219546097

---

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 11.09.2026**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - वरिष्ठ डिईएन/रत्नागिरी विभागांतर्गत बोगद्यांच्या नावाच्या फलकांचे रंगकाम. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-31, अंदाजित खर्च:** ₹ 13,76,550/-, **ईएमडी**- ₹ 27,500/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 05.10.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

---

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे कोपरी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकत श्री. श्रीनिवास पांडुरंग पाटील, श्रीमती गीता पांडूरंग म्हात्रे, श्री. विश्वास पांडूरंग पाटील, श्रीमती हिराबाई विश्वास पाटील, श्री.सवाई विश्वास पाटील, श्री. आदित्य विश्वास पाटील सर्व राहणार कोपरी, ता.अलिबाग, यांच्या हिश्याची व निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. श्रीनिवास पांडुरंग पाटील, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| कोपरी ता.अलिबाग, | १२३ | ०-२१-०० एकूण | २-५० |

अलिबाग,
दिनांक : ११/०९/२०२६.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड,
खरेदीदारांचे वकील

---

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. शुभम रविकांत रत्नपारखे, पत्ता- रूम नं.-ए-२१७, सिडको कॉलनी, सेक्टर-२, ऐरोली, नवी मुंबई ४००७०८ यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| रईस साबीर कोईलकर, वसीम अनिस डोंगरे. | १२२/९ | खाता क्र. २१९९ मधील लिहुन देणार यांचे मालकीची विकत देत असलेले क्षेत्र-००- ३०-०० हे.आर.पॉ. | ०-३३ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १२/०९/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की खालील वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल भरत गणपत म्हात्रे यांनी त्या मिळकतीचे मालक श्री.रोहन सुरेश मोरे व श्री.सुरेश बामा मोरे यांचे कडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे आंबेगाव, ता.मुरबाड, जि.ठाणे**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| २७६ | १ | ०.८१.८० | ३.५२ |

तंदगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबाकबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून येणाऱ्या तक्रारी/ हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - १२-०९-२०२६

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल. एल. बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं-९५६१७१९४९४
९०११७१६००१

---

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
### जाहीर नोटीस

दि.११/०९/२०२६
जा.क्र.२१४/२०२६

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | २२२/१७ | तेजस सोसायटी | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५६० चौ.फूट | उद्धव वामन पाटील | भाग्यश्री नयन थळे |
| २ | ३ | ८४८/४ | प्रभातनगर सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळ मजला ६७६ चौ.फुट | प्रतिभा जनार्दन बारस्कर | सपना सुरेश पवार |
| ३ | १ | ३६/२/१/२ | रोहिदासनगर | पक्के सिमेंट बांधकाम घर | मोहन मोरेश्वर नागावकर | छाया मोहन नागावकर व इतर |
| ४ | २ | २२४/७ | वैदेही सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५१७ चौ.फुट | सुनिता यशवंत पाटील | जयश्री जगदीश कवळे |
| ५ | ४ | २१०४/६ | अलिबाग निरवाना | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ५९३ चौ.फुट | जय चांमुण्डा डेव्हलपर्स तर्फे भागीदार फेनिल रतिलाल पटेल | ओमकार विजय थळे |
| ६ | २ | १६१/५ | आत्माराम सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट | दिपक हरिभाऊ निरुळकर | कल्याणी दिपक निरुळकर, सौ.तृषिता अंकित अरण्य |
| ७ | १ | ८२२/३ | श्री मंगलमुर्ती निवास | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ५६३ चौ.फुट | मनोज जयराम भगत | राजेश आत्माराम राऊळ, रचना राजेश राऊळ |
| ८ | २ | १०९८/१० | शिवनेरी सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम दुकानगाळा २५० चौ.फुट | रमेश लक्ष्मण भिलारे | प्रथमेश परशुराम बाजी |
| ९ | १ | ६६/५ | सत्यम अपार्ट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ५१३.५० चौ.फुट | भानुदास महादेव पाटील, निशीकांत भानुदास पाटील, सुधीर भानुदास पाटील, हर्षला राजेंद्र शेळके | निशिकांत भानुदास पाटील |
| १० | ४ | १६१९/५ | ए एम्स अश्विनी सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ४१३ चौ. फुट | भानुदास महादेव पाटील, निशीकांत भानुदास पाटील, सुधीर भानुदास पाटील, हर्षला राजेंद्र शेळके | हर्षला राजेंद्र शेळके |
| ११ | १ | ३४/७ | विश्वास सह.गृह संस्था | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ४३७ चौ.फुट | राअना सजाऊद्दीन मुकादम | मनाम जुवेर कादिरी |
| १२ | ४ | १३६०/१, १३६०/२, | गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ७२२, १ मजला ७२२, २ रा मजला ७२२ चौ.फुट | शिवाजी कृष्णा पाटील सचिन शिवाजी पाटील | सचिन शिवाजी पाटील |
| १३ | ४ | १३६०/३, | गोंधळपाडा | २ मजला ७२२ चौ.फुट | शिवाजी कृष्णा पाटील संदीप शिवाजी पाटील | संदीप शिवाजी पाटील |
| १४ | २ | ७९९/१ | विद्यानगर विठ्ठल मंदिर रस्ता | आर.सी.सी.पक्के सिमेंट घर | वामन दामोदर पाटील माधवी वामन पाटील मेहुल वामन पाटील | माधवी वामन पाटील मेहुल वामन पाटील कौस्तुभ मेहुल पाटील |
| १५ | २ | ७९९/२ | विद्यानगर विठ्ठल मंदिर रस्ता | आर.सी.सी.पक्के सिमेंट घर | वामन दामोदर पाटील माधवी वामन पाटील मेहुल वामन पाटील | माधवी वामन पाटील मेहुल वामन पाटील पालवी शैलेश पाटील |
| १६ | २ | २१७२/१ | ॲकॉन्स प्रिव | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला चौ.फुट | अक्षय अरुण गुलाटी | किशोर राजाराम गुरव |
| १७ | ६ | २१११/८ | ओबीएम रेसि. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ मजला चौ.फुट | भगवान रघुनाथ मालपाणी | प्रविण शेषरावजी तिमांडे |
| १८ | २ | २१७२/२० | ॲकॉन्स प्रिव | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ५ मजला ५०४ चौ.फुट | अजित जयराम जाधव | शमिम लियाकत शेख |
| १९ | ५ | २१५३/६ | सद्गुरु कबीर सागर भवन सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ५४२ चौ.फुट | संजय वैजनाथ मेहता, रंजितकुमार वैजनाथ मेहता | अभंग जयंत रुमडे भारती जयंत रुमडे |

**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग**

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सांगण्यावरून व सुचनेवरून आम्ही मौजे काळोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथीन सरोज श्रीवल्लभ दमाणी यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| काळोशी | ६/४ | ०-३२-९० पो.ख.०-०३-०० ०-३५-९० | ६.५६ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे मालकी हक्कांविषयी व हद्दींविषयी हरकत अथवा तक्रार असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरण्यात येईल व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : १२/०९/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

### रायगड बाजार
### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेची ४१वी वार्षिक सर्वसाधारण सभा खालील कामांचा विचार करणेसाठी सोमवार दिनांक २८-०९-२०२६ रोजी सकाळी ९-३० वाजता पी.एन.पी एज्युकेशन सोसायटी, मध्यवर्ती कार्यालय, राऊतवाडी, वेश्वी, अलिबाग येथे मा.चेअरमन नृपाल जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेत उपस्थित रहावे, ही विनंती.

**: सभेपुढील कामे :**

१) मागील दिनांक २६-९-२०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेची इतिवृत्त वाचून कायम करणे.
२)३१ मार्च २०२६ अखेर संपणाऱ्या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्वीकारणे.
३)३१ मार्च २०२६ अखेरची जमाखर्च पत्रके (ताळेबंद, नफा-तोटा)अवलोकनी घेऊन त्यास मंजुरी देणे.
४) २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५) सन २०२६-२०२७ सालाकरीता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०२५-२०२६ चा शासकीय हिशेब तपासणीसांचा तपासणी अहवाल अवलोकनी घेणे.
७) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता संस्थेचे सभासदांना पर्चेस रिबेट कुपन्स बाबत विचार करणे.
८) सन २०२६-२०२७ या वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी सहकार खाते पॅनलवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणे.
९) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

अलिबाग
दि.१२-९-२०२६

**संचालक मंडळाच्या अनुज्ञेने**
**प्रमोद ना.घासे**
**उपाध्यक्ष**

**सूचना** -१) गणसंख्येच्या (कोरमच्या) अभावी सभा तहकूब राहिल्यास सदर सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरेल व त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.

---


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture Workshop office Education - Graduation Experience - 2 years Location - Bamansure, chondhi Contact - 9823585321
- फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे ठिकाण-झिराड, पात्रता -MBA अनुभव -३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना Contact- 9823585321
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे व ड्रायव्हर पाहिजे. 9763006555
- अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.
- जन्नावार हॉस्पीटल चेंढरे अलिबाग मध्ये कामासाठी मावशी स्टाफ नर्स साठी जागा आहे. संपर्क - ७७९८० ३४५०९

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**



## राशीभविष्य

- **मेष** : जुनी येणी वसुल होतील. गृहोपयोगी वस्तुंची खरेदी होतील. कार्यक्षमता वाढ्वण्यासाठी प्रयत्न होतील.
- **वृषभ** : कौटुंबिक समस्या भेडसावतील. प्रेम प्रकरणात मतभेदाची शक्यता आहे. स्पर्धामध्ये यश मिळेल.
- **मिथुन** : आश्चर्याची सुखद अनुभूती येईल. उत्सवी वातावरणात समाधान लाभेल. बाकी चिंता करू नये.
- **कर्क** : आजचा दिवस धावपळीचा राहील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. अनपेक्षित धनलाभ संभवतो.
- **सिंह** : नवीन ओळखी होतील. कामानिमित्त प्रवास फायदेशीर ठरेल. स्थावर प्रश्न पुन्हा प्रलंबित राहतील.
- **कन्या** : गुंतवणूक विचारानं करावी. वाद–विवादात अकारण मध्यस्थी नको. वैवाहिक नात्यात सुख लाभेल.
- **तूळ** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कौटुंबिक कामं प्रलंबित राहतील. नोकरीत प्रगतीला वाव मिळेल.
- **वृश्चिक** : नवीन संकल्पनांना चालना मिळेल. प्रिय व्यक्तिंचा सहवास लाभेल. ग्रहमानाची अनुकूलता राहील.
- **धनु** : आध्यात्मिक प्रगती होईल. दूरच्या नातेवाईकांच्या भेटी होतील. बोलताना शब्दांचा वापर जपून करा.
- **मकर** : घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. वाहन चालवताना काळजी घ्या. विचारानं रहा.
- **कुंभ** : वैवाहिक जीवनात मतभेद संभवतात. मुलांचे प्रश्न चिंता वाढवतील. जुनी दुखणी पुन्हा उद्‌भवतील.
- **मीन** : आर्थिक अडचणींवर मात करता येईल. विवाहविषयक प्रयत्नांना अनुकूलता राहील. चिंता नसावी.

## १२ सप्टेंबर

दिन विशेष

**१९१२ :** इंदिरा गांधी यांचे पती फिरोज गांधी यांचा जन्म.
**१९९६ :** नाट्य, चित्रपट अभिनेत्री श्रीमती पद्मा चव्हाण यांचा मृत्यू.
**२००२ :** 'मेटसॅट' या भारताच्या उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण.
**२०१३ :** केवळ १५ राज्यांमध्ये स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन दल असल्याची माहिती.
**२०१४ :** आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेती धावपटू पिंकी प्रामाणिकवरील गुन्हे मागे घेतले.

अजब गजब

## चित्रविचित्र प्राणी

छोट्या दोस्तांनो, या पृथ्वीवर विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, किटक आहेत. कोणाचा आकार वेगळा तर कोणाची रचना वेगळी. काही सजीवांचं रक्त पिवळ्या, हिरव्या रंगाचं असतं तर काही सजीवांना पायच नसतात. पृथ्वीवर सजीवांच्या ८७ लाख प्रजाती अस्तित्त्वात असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या प्रजातींमधले काही सजीव चित्र–विचित्र आहेत. त्यांचा विचारही आपण करू शकत नाही. त्यांचं असे सजीव अस्तित्त्वात आहेत यावरही आपला विश्वास बसू शकणार नाही, अशाच काही सजीवांविषयी...

* स्टोव्ह पाईप स्पंज नावाचा सजीव समुद्रात आढळतो. या सजीवाचा आकार ट्यूबलाईटसारखा होतो. तसंच तो पाच फूट तीन इंचांपर्यंत उंच होऊ शकतो. हा सजीव शेकडो वर्षं जगू शकतो.

* ब्लॉब फिश हा समुद्रात तब्बल २४०० फूट खोल राहणारा मासा आहे. समुद्राच्या पाण्यापेक्षा कमी वजन असल्याने तो पाण्यात अगदी सहज तरंगू शकतो.

(क्रमश:)

आरोग्यमंत्र

## काय खावं पावसाळ्यात?

सर्वदूर पावसाचा जोर दिसत असताना वाढत्या आजारांचा धोका दुर्लक्षित करुन चालणार नाही. म्हणूनच सध्याच्या वातावरणात आहाराची विशेष काळजी घ्यायला हवी. याविषयी...

* या दिवसात पाण्याचं प्रमाण जास्त असणाऱ्या काकडी, भोपळा, दुधी यासारख्या भाज्या खाऊनये. * पावसाळ्यात दही टाळावं पण ताक पिता येईल. * या दिवसांमध्ये दूषित पाण्यामुळे साथीचे रोग पसरण्याची शक्यता असते. या रोगांविरोधात प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी मीरपूड आणि हळद घातलेलं दूध प्यावं.



* रात्रीच्या वेळी हिरव्या पालेभाज्या खाणं टाळावं. * आहारात मसालेदार पदार्थांसोबत काही कडवट पदार्थांचाही समावेश करावा. * या दिवसांमध्ये अतिगोड पदार्थ टाळणं चांगलं. उकळलेलं पाणी प्यावं. * रस्त्यावरचे, उघड्यावरचे पदार्थ खाणं टाळावं. उघड्यावरच्या पदार्थांवर बसलेल्या माश्यांमुळे विविध विकार होण्याची शक्यता वाढते. रस्त्यावरचे पदार्थ तयार करण्यासाठी दुषित पाण्याचा वापर केलेला असू शकतो. यामुळे साथीचे रोग पसरण्याची शक्यता वाढते.* या दिवसात कच्चं सॅलड खाऊ नका. पदार्थ शिजवूनच खावे. * या काळात उकडलेल्या भाज्या, हातसडीचा तांदूळ, बार्ली, ओट्स अशा पदार्थांचं सेवन आरोग्यदायी ठरतं. * जीरं, मीरपूड, आलं, लसूण, कोथिंबीर, हिंग यासारख्या सहज पचन होणाऱ्या मसाल्यांचा वापर करावा. यामुळे आरोग्यरक्षण होतं.

स्टाईल स्टेटमेंट

## अनोख्या रंगसंगती

* ग्रीन–रेड किंवा ग्रीन–मरून असं कॉम्बिनेशन केलं जातं. पण हिरव्या रंगासोबत पिवळा रंगही शोभून दिसतो. भारतीय पारंपरिक पेहरावासोबतच वेस्टर्न कपड्यांमध्येही तुम्ही हे कॉम्बिनेशन करू शकता. हिरव्या आणि पिवळ्या रंगाच्या विविध छटांमध्ये खेळू शकता. या रंगांमध्ये काही प्रयोग नक्कीच करता येतील.
* पांढरा आणि केशरी हे कॉम्बिनेशनही छान दिसतं. पांढरा आणि केशरी या कॉम्बिनेशनचा टॉप घालता येईल. तसंच व्हाईट टॉप आणि केशरी बॉटम असं कॉम्बिनेशनही करता येईल.
* ब्लॅक अँड व्हाईट हे कॉम्बिनेशन नेहमीच केलं जातं. पण तुम्ही ब्लॅक अँड पिंक हे कॉम्बिनेशन करू शकता. गुलाबी रंगासोबत काळा रंग शोभून दिसतो.
* पांढऱ्या आणि पिवळ्या रंगाची नजाकत वेगळीच. हे दोन्ही रंग एकत्रितपणे खूप सुंदर दिसतात. जीन्स आणि टॉपच नाही तर सलवार कमीझ, कुर्ता लेगिंग्जपासून या रंगसंगतीची साडी तुम्ही कॅरी करू शकता.

### पंचांग

**शनिवार, १२ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
भाद्रपद शु. १, चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : उ. फाल्गुनी, योग : शुभ,
सूर्योदय ६.२८, सूर्यास्त ६.४२

### फॉरवर्ड्स

**यारों क़ा साथ रहा तो पार क़र लेंगें समंदर भीं...**

**ग़र हक़ीक़त बयां करें तों हमें तैरना नहीं आता...!**

### भटकंती

या धबधब्यांच्या आसपास गर्द झाडी असल्यामुळे वेगळाच फील येतो. इथलं 'जय विलास पॅलेस'ही खूप प्रसिद्ध आहे. या महालाचं बांधकाम खूप आकर्षक पद्धतीने करण्यात आलं आहे. इथल्या सनसेट पॉईंटवरून सूर्यास्ताचं विहंगम दृश्य दिसतं. हा पॉईंट इथलं खास आकर्षण आहे. शिरपामाळ ही शिवाजी महाराजांच्या काळातली वास्तू आहे. उंच टेकडीवर वसलेल्या या ठिकाणाहून जव्हारचा संपूर्ण परिसर न्याहाळता येतो. मुंबई, पुणे, नाशिकहून जव्हारला जाता येईल.

करिअरवाटा

## विक्रीशास्त्राचा अभ्यास करताना...

सध्या सुपर मार्केट तसंच मॉल्सची संख्या वाढत असताना अशा ठिकाणी सर्व विभागांच्या कामांसाठी त्या त्या कामाचं कौशल्य असणाऱ्या आणि पुरेसं प्रशिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांची गरज भासत असते. मॉलमध्ये ग्राहकांच्या मानसशास्त्राचा बारकाईने विचार केलेला असतो. मॉलमधला माल कसा मांडला आहे यावर विक्री अवलंबून असते. त्यादृष्टीने मांडणीचा विचार करणाऱ्या व्हिज्युअल मर्चंटायझिंग या शास्त्राचा किंवा कौशल्याचा उदय झाला. या शास्त्रात कोणत्या वस्तू किती उंचीवर ठेवाव्या याचाही सूक्ष्म विचार केला जातो. अधिक खपणाऱ्या, अधिक प्रमाणात खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तू प्रथदर्शनी असतात आणि कमी विकल्या जाणाऱ्या वस्तू मागे ठेवल्या जातात. मॉलच्या दर्शनी भागातील वस्तूंच्या मांडणीतून होणारी सजावट आकर्षक नसेल तर विक्रीवर परिणाम होतो. खेरीज मॉल कोणत्या प्रकारचा आहे, त्याचा प्रमुख ग्राहक कोणत्या वर्गातला आहे याचा विचार करूनही वस्तू मांडाव्या लागतात. मॉलचा ग्राहक मध्यमवर्गीय असेल तर उच्चवर्गीयांनाच परवडतील अशा वस्तू समोर ठेवून चालत नाही. त्याशिवाय त्याची मांडणीही लोकांना त्या हाताळता याव्या अशी करावी लागते. तुम्हीही हे शास्त्र अभ्यासू शकता.



खेचाखेची

### बंधूप्रेम

**शिक्षक** : मुलांनो, निष्पाप आणि मुक्या प्राण्यांवर आपण प्रेम करायला हवे. एखादा माणूस एका निष्पाप गाढवाला मारताना दिसला तर मी काय करायला हवे?
**वर्ग** : त्याला थांबवायला हवे .
**शिक्षक** : बरं, मी त्याला थांबवले तर हे काय दाखवते?
.
.
.
**वर्ग एका स्वरात** : बंधूप्रेम !!!

### वेगळं काही

इंग्लंडमध्ये एका माशाच्या पोटातून ट्यूमर काढून टाकण्यात आला. अवघं एक ग्रॅम वजन असणाऱ्या या गोल्ड फिशचं पोट फाडून ट्यूमर काढणं, हे मोठं आव्हान होतं. पण डॉक्टरांनी ते लीलया पेललं. ४० मिनिटात ही शस्त्रक्रिया पार पडली. हा गोल्ड फिश ब्रिटनमधला सर्वात लहान आकाराचा रुग्ण ठरला. गोल्ड फिशवर शस्त्रक्रिया होण्याची ही पहिलीच घटना असावी. या माश्याच्या मालकाला शेजाऱ्याने हा मासा भेट दिला होता. काही दिवसांनंतर त्याच्या शरीराचा खालचा भाग फुगीर दिसू लागला. मालकाने त्याला रुग्णालयात नेलं. इथे ट्यूमरचं निदान झालं आणि माशावर शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला. काही काळानंतर त्याला घरीही सोडण्यात आलं.

फिटनेस मंत्रा

## नको अतिरेकी व्यायाम

सध्या युवकांप्रमाणेच युवतीदेखील लग्नाचा निर्णय घेण्यास विलंब करतात. उच्च शिक्षण आणि कारकिर्दीत स्थिरस्थावर झाल्यानंतर लग्नाचा विचार करेपर्यंत तिशी उलटलेली असते. मात्र या दरम्यान व्यस्त दिनचर्या, कामाचा ताण, खाण्याच्या अयोग्य सवयी यामुळे अनेकांचा देह स्थूलतेकडे झुकलेला असतो. त्यामुळे नंतर व्यायाम आणि डाएट पाळलं तरी लग्न करुन मातृत्व स्वीकारणाऱ्यांना युवतींवर मानसिक ताण येऊ शकतो. वजन कमी करण्यासाठी व्यायामाचा सल्ला दिला तरी काहींना व्यायामानंतर खूप थकवा जाणवतोय. मासिक पाळीच्या तक्रारीदेखील वाढतात. अशा वेळी व्यायाम किती आणि कसा करावा, पूरक आहार कोणता घ्यावा यासंबंधी तज्ज्ञांकडून माहिती घेणं गरजेचं ठरतं. प्रमाणापेक्षा अधिक व्यायाम केल्यामुळे थकवा जाणवू शकतो. याला अमेनोरिया अथवा रजोरोध म्हणतात. भरपूर व्यायाम पण योग्य प्रमाणात कॅलरींचा अभाव यामुळे हा त्रास होतो. वजन कमी करण्यासाठी फॅट कटरचा आधार घेतल्यास धोका संभवतो. त्यामुळेच आधी आहार आणि व्यायामाविषयी जाणकारांचा सल्ला घ्यावा. अतिरेकी व्यायाम टाळावा.



## सुडोकू १४८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | | | | ८ | | १ | ७ |
| | | ३ | | | ५ | | ४ | |
| ६ | | | | १ | | | ५ | ३ |
| | | | ६ | ८ | | | | ४ |
| ५ | ६ | | | | | | २ | ८ |
| ४ | | | | ७ | ९ | | | |
| १ | ७ | | | ३ | | | | ५ |
| | ८ | | ९ | | | ४ | | |
| ९ | ५ | | ८ | | | | ३ | ६ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १४७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ३ | ७ | ६ | २ | ८ | ४ | ९ | १ |
| १ | ८ | ४ | ९ | ७ | ३ | २ | ६ | ५ |
| ६ | ९ | २ | १ | ४ | ५ | ८ | ७ | ३ |
| ८ | २ | ३ | ४ | १ | ७ | ६ | ५ | ९ |
| ९ | १ | ६ | ५ | ३ | २ | ७ | ४ | ८ |
| ७ | ४ | ५ | ८ | ६ | ९ | ३ | १ | २ |
| ३ | ६ | ९ | ७ | ८ | १ | ५ | २ | ४ |
| ४ | ५ | ८ | २ | ९ | ६ | १ | ३ | ७ |
| २ | ७ | १ | ३ | ५ | ४ | ९ | ८ | ६ |

# शब्दकोडे क्रमांक १४८



**आडवे शब्द :-**
१) कारखान्याचा मालक
६) ** ** **** तया यातना कठिण
११) गोळा झालेले, हिशोबातील एक बाजू
१२) काडीमोड
१४) मला
१५) शेत, जाणेयेणे
१७) बाळाचा जन्मजात गुटगुटीपणा
१९) यमाने दिलेल्या वेदना
२३) कुळावरील सरकारी कर, प्रजा
२५) ताजा, नव्या दमाचा
२८) अजागळ, अव्यवस्थित राहणारा
२९) समशेर
३२) चक्र
३३) पाण्याचे हवेत झालेले रुपांतर
३४) जसे काही
३५) गाडीचे छ्त
३७) अरण्यवास
३८) त्रासदायक बडबड
४०) दहाचा समूह
४१) जाड, मोठा हातोडा
४२) चप्पल
४४) रांग, ओख(हिं)
४६) चेह–यावरील तेज
४७) अवधान, चित्त
४८) एक द्विदल धान्य
५१) संसद सदस्य
५३) दावानल
५५) भांबावलेला
५७) गाडीचे छत
५८) दारूचा एक प्रकार
६०) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
६२) वाहणारी हवा
६४) शंभर घोडेस्वारांची टोळी, तुकडी
६६) कप्पा, खण
६७) दृष्टीभेट
६९) पडसे
७२) पूजा साहित्याचे ताट
७३) युवक–युवती
७५) कापडी बंद
७६) गमन करणे
७७) चुलीत, शेगडीत जाळण्याचे इंधन

**उभे शब्द :-**
१) रात्री चमकणारा किडा
२) रमापती
३) व्यापारी फायदा
४) दरवाजा
५) गावाखालची जमीन
७) प्रहर
८) काजळ, सुरमा इ प्रकार
९) आकर्षक
१०) पुन्हा
१३) शिव्याशाप
१६) प्रजा
१८) चाकरी, शुश्रूषा
२०) रसाळ
२१) जत्रा
२२) बारसे, नाव ठेवण्याचा विधि
२४) वर्तन
२६) आजोबा म्हणून हाक मारणारी
२७) अवाजवी
३०) तात्काळ
३१) कणीदार
३४) जाड झालेली केसांची बट
३६) पालव
३८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
३९) एकाग्र नजर
४१) निबिड, गर्द (अरण्य)
४३) घोडीला किंवा गाढवीला येणारा माज
४५) ताऱ्यांचा स्वामी असलेला चंद्र
४७) भ्रम
४९) वल्लरी
५०) लाज
५१) किंचित खाली
५२) चापट, मऊ पदार्थाचा आघात
५३) समुद्रातील अग्नी
५४) प्रहार, घाव, दिवस
५६) वन, रान
५९) कामदेव
६१) दरवडेखोर
६३) गवंडी
६४) माघारी येणे
६५) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६८) गावठी दंतमंजन
७०) सूर्याचे एक नाव
७१) जल
७३) बारा वर्षाचा काळ
७४) सौंदर्य

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टो | ण | गा | | ध | न्य | वा | द | | आ | पा | द | म | स्त | क |
| क | | ज | मी | न | | ता | म | सी | | र | स्ता | | व | |
| दा | द | र | | वा | स | व | | ता | री | ख | | मा | न | व |
| र | | पा | व | न | | र | मा | | स | | म | त | | न |
| | पा | र | | | अ | ण | ग | ट | | म | | क | ड | वा |
| पा | ल | खी | प | द | स्थ | | मू | | मि | ला | व | ट | | स |
| चा | क | | स | | मा | न | स | पु | त्र | | न | | वि | |
| मु | | न | र | म | | र | | ण्य | | दे | वा | स | मा | न |
| खी | र | | ट | म | ट | म | | | सा | ह | स | | न | र |
| प | सा | रा | | ता | र | | क | स | म | | वा | र्ता | | क |
| र | | ग | वा | | फ | रा | स | खा | ना | | डी | | छा | या |
| मे | थी | | क | मा | ल | | क | | वी | ज | | खि | | त |
| क्ष | | ज | डा | व | | ब | स | क | र | | आ | रा | ध | ना |
| र | ज | त | | स | क | ल | | र | | को | रा | | ड | |
| | म | न | न | | र | क | म | पा | त | | म | ळ | क | ट |

# कलासक्त

**सोलापुरात जन्मलेल्या पेशवेकालीन शाहीर रामचंद्र जगन्नाथ जोशी अर्थात राम जोशी हे ब्राह्मण कुलांत जन्मलेले असूनही त्यांनी शाहिरी लावणी, काव्य व कीर्तन या क्षेत्रात पारंगत होऊन, पुण्यातील दुसऱ्या बाजीरावांच्या दरबारापर्यंत त्यांची लोकप्रियता पोहोचली व ज्यांना साक्षात पेशव्यांच्या दरबारात आपला कार्यक्रम सादर करण्यास संधी मिळाली होती व पेशवाईच्या शाबासकीची थाप ज्यांच्या पाठीवर पडली, त्या राम जोशींच्या देदीप्यमान कारकीर्दीवर सिनेमा काढावा अशी ज्येष्ठ निर्माता दिग्दर्शक व अभिनेते असलेल्या व्ही. शांताराम यांची प्रबळ इच्छा होती. स्वतःच्या राजकमल कलामंदिर या संस्थेमार्फत या चित्रपटाची निर्मिती करण्याचे शांताराम बापूंनी ठरविले. त्यावेळी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी त्यांचे आद्य गुरु बाबुराव पेंटर यांच्यावर सोपविण्याचे त्यांनी ठरवले व आपल्या गुरूंच्या ऋणातून अंशतः मुक्त व्हावे असे त्यांना वाटले.**

रंगबहार

शरद कोरडे

## लोकशाहीर राम जोशी



शांताराम बापूंचे मावस भाऊ बाबुराव पेंढारकर हे बाबुराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीत व्यवस्थापक मंडळात होते. ते या कंपनीत अभिनेते म्हणूनही काम करत होते. घरच्या गरिबीमुळे ते बाबुरावांबरोबर वयाच्या साधारणतः १५ व्या वर्षी महाराष्ट्र फिल्म कंपनींत हरकामी कामगार म्हणून रुजू झाले. प्रथम त्यांना सुतार खात्यात साफसफाई व सामान, हत्यारे व्यवस्थित लावण्याच्या कामावर ठेवण्यात आले. पुढे खाते बदलून त्यांची रंगकाम खात्यात बदली करण्यात आली. तेथे बाबुराव पेंटर स्वतः चित्रे काढीत व मोठ मोठे पडदे रंगवीत असत. त्यांना रंगकामाचे साहित्य आणून देणे, काम झाल्यावर ते डबे व्यवस्थित लावणे, ब्रश धुवून ठेवणे आदी कामे करत करत शांतारामबापूंना डायरेक्शन डिपार्टमेंटमध्ये बदली मिळाली. तेथे त्यांना बाबुराव पेंटर यांच्याकडून दिग्दर्शनाचे धडे मिळाले व चित्रपटांतून छोटी-छोटी कामे करण्याची संधी मिळत गेली. १९२० सालच्या 'वत्सलाहरण' या चित्रपटात त्यांना कृष्णाची भूमिका करण्याची प्रथम संधी मिळाली. दरम्यान, ९ जून १९२२ ला त्यांचे कोल्हापूरच्या अंबु मुगळखोड या मुलीशी लग्न लावून देण्यात आले. त्यावेळी शांताराम बापूंचे वय २१ वर्षाचे होते. त्यानंतर १९२३ सालच्या 'सिंहगड' व 'श्रीकृष्णअवतार' या मूकपटात त्यांनी भूमिका केल्या, ज्यांचे दिग्दर्शन बाबुराव पेंटर यांनीच केले होते. त्यानंतर महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या 'सती पद्मिनी', 'शहाला शह', 'राणा हमीर', 'माया मच्छिंद्र', 'गजगौरी', 'भक्त प्रल्हाद' या मूकपटांत त्यांनी बाबुराव पेंटर यांच्यासोबत सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले. त्यानंतर १९२७ च्या 'नेताजी पालकर' या चित्रपटाचे स्वतंत्रपणे दिग्दर्शन करण्याची संधी त्यांना पेंटरांनी दिली. या चित्रपटाला शासनाचे पारितोषिकही मिळाले होते . त्यानंतर बाबुराव पेंटर यांच्याशी काही मंडळींचे मतभेद झाल्यानंतर बाबुराव पेंढारकर, विष्णुपंत दामले, फत्तेलाल मामा यांच्यासह शांताराम बापूंनी एक जून १९३० ला बाबूराव पेंटर यांची महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडून, त्याच वेळी कोल्हापूर येथे ''प्रभात'' कंपनीची स्थापना केली. 'गोपाळकृष्ण' हा प्रभातचा पहिला मुकपट. त्याचे दिग्दर्शन व्ही. शांताराम यांनी केले होते. त्यानंतर 'राणीसाहेब अर्थात बजरबट्टू' हा प्रभातचा पहिला बोलपट, व्ही. शांताराम यांनी दिग्दर्शित केला होता. पुढे व्ही. शांताराम यांनी आपली ''राजकमल कला मंदिर'' ही चित्र संस्था १९४३ साली स्थापन केली. या संस्थेतर्फे पहिला चित्रपट 'शकुंतला' हा १९४३ मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटात जयश्री, चंद्रमोहन, अमिना, व्ही. शांताराम, जोहरा व नाना पळशीकर यांनी कामे केली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन व्ही. शांताराम यांनीच केले होते व संगीत वसंत देसाई यांनी दिले होते. अमेरिकेमध्ये प्रदर्शित झालेला हा पहिला भारतीय चित्रपट मानला जातो. त्यानंतर राजकमलने 'डॉक्टर कोटणीस की अमर कहानी' हा चित्रपट १९४६ मध्ये प्रदर्शित केला. वरील दोन्ही चित्रपट व्ही. शांताराम यांनीच दिग्दर्शित केले असल्याने त्यांनी राजकमलच्या तिसऱ्या 'लोकशाहीर रामजोशी' या चित्रपटाच्या दिग्दर्शनासाठी आपले गुरु बाबुराव पेंटर यांना आदरपूर्वक पाचारण केले. त्यांची प्रकृती स्थिर नसल्याने त्यांनी प्रथम नकार दिला होता, पण शांताराम बापूंनी खूपच आग्रह केल्यामुळे व आपण स्वतः त्यांच्या मदतीसाठी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करणार असल्याचे सांगून त्यांना राजी केले. मराठी संगीत रंगभूमीवरील खड्या व भरदार आवाजाचे गायक नट जयराम शिलेदार यांना नायक राम जोशी म्हणून व सुप्रसिद्ध अभिनेत्री हंसा वाडकर यांना नायिका बया म्हणून करारबद्ध केले होते.

सुप्रसिद्ध गीतकार ग.दि. माडगूळकर यांनी कथा, पटकथा व संवाद लिहिले होते, तसेच चित्रपटांतील तीन गाणी ही त्यांनी लिहिली होती. इतर शाहिरी गीते व लावण्या राम जोशींनी लिहिलेल्याच घेतल्या होत्या. शास्त्रीय संगीताचे व लोकगीतांचे ज्ञान असलेले संगीतकार वसंत देसाई यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. यापूर्वीच्या राजकमलच्या दोन्ही चित्रपटांना त्यांनीच संगीत दिले होते. या चित्रपटाचे काही चित्रीकरण झाल्यावर बाबुराव पेंटर यांची प्रकृती बिघडली व त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आले, पण तब्येत खूपच खालावल्यामुळे त्यांनी दिग्दर्शन सोडले व पुढे शांताराम बापूंनीच अगोदरच्या चित्रीकरणात काही फेरफार करून व त्यांचे पुन्हा चित्रीकरण करून, पुढील चित्रपट त्यांच्या दिग्दर्शनाखाली पूर्ण करण्यात आला. मात्र, श्रेयनामावलीत दिग्दर्शक म्हणून बाबुराव पेंटर व व्ही. शांताराम अशी दोघांचीही नावे देण्यात आली होती. राम जोशी यांचा जन्म सोलापूर येथे १७६२ साली झाला होता. मात्र, अधिकृत नोंद नाही. काहींच्या मते त्यांचा जन्म १७५८ त १७६२ या कालावधीत झाल्याचे नोंदले आहे. एका प्रतिष्ठित व वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यामुळे घरातील वातावरण शुद्ध सांस्कृतिक होते. व्रतवैकल्ये, उपासतापास, सण व अध्यात्मिक ग्रंथ वाचन असे घरातील वातावरण होते. राम जोशींचे आई-वडील लवकरच स्वर्गवासी झाल्याने घरची सर्व जबाबदारी वडील बंधू मुदगुलशास्त्री यांच्यावर होती, ते वेदशास्त्र जाणकार, संस्कृतचे ज्ञान असणारे, कर्मठ, परंपराप्रिय होते. त्यांच्या उलट राम, जोशी हे अत्यंत हजरजबाबी, हौसमौज करणारे पण संस्कृतचे अभ्यासक होते. त्यांनी लावणी हा शृंगारप्रधान काव्यप्रकारास मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळवून दिले. धोंडी नावाच्या तमासगीर शाहिराशी त्यांची दोस्ती होती. त्याच्या फडावर राम जोशी संध्याकाळी जायचे व तेथेच ते रमत. मध्यरात्री घराकडे येतात, हे मोठ्या भावास समजले. राम संध्याकाळी घरी राहावा म्हणून मुदगुलशास्त्री यांनी त्यांचा व्रतबंध विधी केला, पण त्यामुळे राम रागावतो व धोंडीच्या फडात सामील होतो. मुदगुल शास्त्री यांना रामचे वर्तन कळत होते, त्यामुळे त्यांनी रामपासून फारकत घेतली व त्याला घरापासून दूर राहण्याचे आदेश दिले. दोघे विभक्त झाले; पण पुढे गावातील ज्येष्ठांनी दोघांमध्ये समझोता घडवून आणला. खूप वादावादी झाली. राम घरी राहावा म्हणून पुढे त्याचे लग्न करण्याचे ठरले. रमा नावाच्या तरुणीशी त्याचा विवाह करण्यात आला. ती धर्मपरायण होती, मुदगुलशास्त्रींची पत्नी गंगाबाई यांच्या मार्गदर्शनाखाली रमाने संसाराचा श्रीगणेशा केला. राम आता मार्गाला लागला असे वाटत असताना मुदगलशास्त्रींनी एक दिवस त्याला समोर बसून सर्वांच्या समक्ष त्याच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचला व त्याला आपले घर सोडण्याचा हुकूम दिला. त्यानंतर रामने धोंडीच्या फडात प्रवेश केला. धोंडीचा फड हा त्याच्या दृष्टीने मुक्त विद्यापीठ होते. येथे बंधन नसलेने तमाशाची कवने रचने, गाणे व धुंद जगणे याचे रामला खूप आकर्षण होते. धोंडी स्वतः कवने करायचा. लावण्या लिहायचा, त्याचे पाहून राम जोशीही लावण्या रचू लागला. या क्षेत्रातील धोंडी हा रामचा पहिला गुरु होता. धोंडीने फडांतील कलंगी व तुरा यातील भेद रामला शिकवला. त्याला 'तुरा' या प्रकाराची दीक्षा दिली. तुरा म्हणजे







साक्षात आदीदेव महादेव समजले जायचे. धोंडी मध्यरात्री नदीकिनारी जाऊन शंकराची साधना करायचा. हीच आपली ओळख आहे, असे तो रामला सांगायचा. कलगी म्हणजे साक्षात आदिशक्ती दुर्गामाता, पण तुरा ही मूळ देवता महादेव. त्यांचीच आपण साधना करायची, असे धोंडीने रामला शिकवले. धोंडीच्या फडांत शंकर नावाचा ढोलकी वाजवणारा अवलिया होता. रामने त्याच्याकडून तालवाद्यांचे शिक्षण घेतले. त्याची शागिर्दी स्वीकारली. साथसंगत कशी करायची, वादनांत माधुरी कशी आणायची, रंजकता कशी आणायची, ही कला रामने शंकरकडून घेतली होती. धोंडीच्या तमाशांत बया व चिमा या नृत्यांगना होत्या, त्या गणिता असून, नृत्यासोबत गायिका अभिनेत्री ही होत्या व मुख्य म्हणजे त्या सौंदर्यवती होत्या. बांधेसूद व देखण्या होत्या. त्यांच्यामुळे धोंडीच्या फडाला ठिकठिकाणी मागणी होती. धोंडी सोबत राम जोशी महाराष्ट्रभर फिरला.

स्वतः शृंगारिक लावण्या व कवने रचू लागला. जनमानसांत त्याला मोठी प्रसिद्धी मिळाली. राम मधला कवी व शाहीर आकार घेऊ लागला .फडावरच त्याला लवकर मग आपल्या प्रतिभेचा परिचय झाला. त्याची काव्य प्रतिभा बहराला आली. स्वर, ताल, काव्य अंगात भिडलेल्या रामने लावण्या व अध्यात्माच्या गवळणी लिहिल्या व त्या प्रेक्षकांना खूप आवडल्या, त्यानंतर आपला स्वतःचा फड असावा, अशी रामला इच्छा झाली. त्याने स्वतःचा फड काढला व तो गावोगावी कार्यक्रम करू लागला. त्याचा पहाडी आवाज आणि मधुरता यांच्या संगम होता. तालशास्त्राचा अभ्यास केल्याने डफ, हालगी, तबला व ढोलकी ही वाद्ये तो अप्रतिम कौशल्याने वाजवीत असे. त्याच्या फडात बया आणि चिमा या दोघीही आल्यामुळे फड प्रसिद्धीच्या झोकात आला. बया ही रामच्या लावण्यांना सुंदर चाली लावून आपल्या सुरेल आवाजात गात असे. आपल्या सौंदर्याने समोरच्यांना घायाळ करणारी बया ही सुरेख, कोकीळकंठी होती. बया आणि राम परस्परांवर अनुरक्त होऊन इश्काच्या रंगपंचमीत रंगून शृंगाराची मुक्त उधळण करू लागले. राम जोशींची लोकप्रियता वाढली. बयाची पडलेली गाठ हा एक दैवयोग आहे असा तो समजू लागला. पुढे पुणे या मराठ्यांच्या राजधानीच्या शहरात दुसरे बाजीराव पेशवे कलाप्रेमी होते, ते नृत्याधिकांना राजाश्रय देत. कलावंत पुण्यात येऊन आपली कला प्रकट करीत. पुण्यात रागदारीवर आधारित गाणी व नृत्य यांना प्रतिष्ठा मिळू लागली होती. एक दिवस पेशव्यांकडून रामला कार्यक्रमासाठी आमंत्रण आले. रामच्या प्रसिद्धीमुळे पुण्यात खूप मोठा जनसमुदाय पेशव्यांच्या वाड्यासमोर जमला होता. स्वतः पेशव्यांनी कार्यक्रमात हजेरी लावली व रामचे जाहीर कौतुक करून त्याचा सन्मान केला व मानाचा शिरपेच देऊन बक्षिसी दिली.

राम जोशींचा फड महाराष्ट्रभर गाजत असल्याने त्यांना मिळकती चांगली येत होती व प्रसिद्धी होत होती. त्यामुळे राम जोशींच्या मुळाच्या उधळ्या स्वभावामुळे व आयुष्यभर आराम व चैनीच्या राहणीमानामुळे पैसा खर्च होऊ लागला व फडाला कर्ज होऊ लागले. काही सावकारांकडूनही कर्ज घेण्यात आले होते व सोबत दारूचे व्यसनी लागले होते शिवाय त्यानंतर बया व चिमा यांच्या सोबतचे रंगेल वागण्यामुळे समाजातही बदनामी होऊ लागली. त्यानंतर त्यांना शाक्त पंथाचे काही जोगी भेटले, त्यामुळे राम जोशी यांना मांसाहार व मदिरा मदिराक्षी यांचे व्यसन वाढले, पुढे त्यांना नाथ संप्रदायातील एक बैरागी भेटले, त्यांच्या सहवासामुळे राम जोशी ताळ्यावर आले. आपण गैरमार्गावर आहोत याचे त्यांना भान आले. काही काळाने त्यांनी आपला फड तसाच ठेवून ते बाहेर पडले व सरळ पंढरपूरचा रस्ता धरला. तेथे बाबा पाध्ये नावाचे संस्कृत पंडित होते. वेदशास्त्र संपन्न असे त्यांचे घराणे होते. त्यांना भेटून त्यांनी त्यांच्या पायावर डोके ठेवले. त्यांची गौरकाया, भव्य मुद्रा पाहून ते प्रभावित झाले. त्यांची करुणा भाकून राम जोशी यांनी आपल्या स्वैर जीवनशैलीची कथा सांगितली व आपण मला पदरी घेऊन मला सत्कर्माची दीक्षा द्यावी व आपणासोबत राहण्याची अनुज्ञा द्यावी, अशी विनंती केली. पाध्ये बुवांनी त्यांना आश्रय दिला. रामने काव्यशास्त्र वेदाभ्यास व कीर्तनकला यांची दीक्षा पाध्ये बुवांकडून घेतली.काही काळानंतर त्यांनी सोलापूरकडे प्रयाण केले . यावेळी त्यांचा पेहराव बदललेला होता. मस्तकावर चित्रकुटी गंध, पांढरा शुभ्र धोतर व बाराबंदी असा पेहराव करून ते सोलापूरला आपल्या घरी आले. त्याच दिवशी सोलापूरच्या विठ्ठल मंदिरात राम जोशींनी कीर्तन केले. त्याला खूप गर्दी झाली होती. आपल्या रसाळ भाषेत प्रभावीपणे त्यांनी भारतकथा सांगितली.वक्ता व श्रोते यांची समाधी लागली. सर्वांनी पुराणिकबुवांना दाद दिली. रामचे पूर्वायुष्य विसरून सर्वांनी कीर्तनकार म्हणून त्यांची स्तुती केली हे पाहून त्यांचे मोठे बंधू मुदगुलशास्त्री ही आनंदीत झाले, त्यांनी रामला स्वतःच्या घरात सन्मानाने बोलावून आणले आणि सर्व कुटुंबासहित राम आपल्या रमा या पत्नीला व गंगाबाई वहिनींना भेटले. घरांत आनंदी आनंद झाला. पुढे राम जोशी महाराष्ट्रभर कीर्तन करीत फिरले. संस्कृत अध्ययन यमक, अनुप्रासाची लय लूट, प्राकृत शब्दांच्या मिश्रणाने घडविलेली भाषेची सजावट, शीघ्रकवित्व, समयसूचकता व प्रभावी वक्तृत्व या गुणांमुळे राम जोशींचे कीर्तने अतिशय लोकप्रिय झाली. ज्या पुण्याच्या पेशव्यांच्या दरबारात राम जोशींनी लावणीचा फड रंगवला होता त्याच ठिकाणी यावेळी राम जोशींनी कीर्तन करून सर्वांना अध्यात्माची वाट दाखवली. ज्या पुण्यामध्ये सनातन्यांनी राम जोशींना धर्मांतून बहिष्कृत करा अशी मागणी शंकराचार्यांकडे केली होती त्याच पुण्यातील धर्ममार्तंडांनी राम जोशींचे कीर्तन ऐकून त्यांची वारेमाप स्तुती केली. त्यानंतर राम जोशींना काशीविश्वेश्वराचे दर्शन काशी येथून घ्यावे, अशी जिज्ञासा निर्माण झाली. परंतु गाठीला पैसा नसल्यामुळे अनेक श्रोत्यांनी वर्गणी काढून त्यांना काशी यात्रेला जाण्यासाठी पैसा मिळवून दिला. पुढे प्रवासात त्यांचे आजाराने निधन झाल्यामुळे त्यांची काशीयात्रा पूर्ण झाली नाही.

## पारंपरिक गणेशोत्सवावर आधुनिकतेचं विकृत सावट



### कोकणी माणसाच्या काळजातला सात्त्विक उत्सव भंपकपणात हरवला

मिलिंद मधुकर जाधव

गणपती बाप्पा! भक्तांच्या घरी पाहुणा म्हणून येणारा तू एकमेव देव. तुझा उत्सव अर्थात गणेशोत्सव साजरा करण्याच्या पद्धतीत प्रांतानुसार थोडा फार फरक असला, तरी त्यामागचा भाव मात्र एकच असतो. हा उत्सव म्हणजे कोकणी माणसाच्या आनंदाचा परमोच्च बिंदू. समस्त कोकणी मन या उत्सवात तुझ्या भक्तीरसाने नखशिखांत न्हाऊन निघतं. आरती, जाखडी नृत्याची जुगलबंदी, भजनाच्या मैफिली आणि पारंपरिक गाण्यांनी कोकणचा आसमंत गजबजून जातो. इथला निसर्गसुद्धा तुझ्या येण्याची आतुरतेने वाट पाहतो.

माळरानावरचा तेरडा, झुडपांवर पांघरलेल्या हिरव्यागार चादरीवरची रानशिराळ्याच्या पिवळ्या धम्मक फुलांची तोरणं, सड्यावरची गवतफुलं, रानभेंडीची पिवळी फुलं, डोंगरउतारावरची सोनसळ, झुडपातून मान उंचावून पाहणारी लाल-पिवळी गौरीची फुलं आपापल्या रंगांची मुक्त उधळण करत तुझ्या स्वागताला सज्ज असतात.

भाताची हिरवीगार खाचरं उत्साहाने सळसळतात. शिवारातल्या पडसळीतून खळाळणारं पाणी तुझ्या स्वागताची मंजुळ गाणी गात असतं. तुझ्या येण्याच्या नुसत्या कल्पनेने आनंदून गेलेला कोकणी माणूस कित्येक दिवस आधीपासूनच तुझ्या स्वागताच्या तयारीला लागतो. या तयारीत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून घरातील बुजुर्ग व्यक्ती बारकाईने लक्ष ठेवून असते. रोजगाराच्या निमित्ताने मुंबईसह वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्य करणारा कोकणी माणूस तुझ्या उत्सवासाठी जास्तीत जास्त सुट्टी मिळावी म्हणून अगोदरच आपल्या कामाच्या वेळापत्रकाचं नियोजन करतो. कोकणातल्या घरच्या ज्येष्ठ महिला कपडे, भांड्याकुंड्यांसह संपूर्ण घर धुवून स्वच्छ करण्यात गुंतून जातात. श्रावण महिन्याच्या उत्तरार्धात कोकणात फेरफटका मारला तर प्रत्येक घरासमोर धुवून वाळत टाकलेले कपडे आणि स्वच्छ केलेल्या भांड्यांचे चकाकणारे ढीग कोकणी माणसाची गणेशोत्सवाप्रती असलेली पराकोटीची ओढ व्यक्त करत असतात. या लगबगीत समस्त कोकणी मन अहोरात्र तुझ्याच विचारात बुडून गेलेलं असतं. तू घरी आल्यावर अखंड सेवेची ओंजळ तुझ्या चरणी अर्पण करून कृतार्थ होणारं मन तुझ्या जाण्याने मात्र तेवढच व्याकूळ होतं. अबालवृद्ध तुला पुढच्या वर्षी लवकर येण्याचं निमंत्रण देतात ते तुझ्याप्रती असलेल्या कमालीच्या श्रद्धेपोटीच. रोजच्या धकाधकीच्या जीवनाला कंटाळलेलं समाजमन अशा सण-उत्सवांच्या माध्यमातून एक वेगळी ऊर्जा, आत्मिक समाधान आणि वैचारिक देवाणघेवाणीची सुखद अनुभूती घेत असतं. गावाकडे आलेला कोकणी माणूस हा उत्सव सहकुटुंब, नातेवाईक आणि मित्रपरिवारासोबत परस्परांमधला स्नेहभाव वृद्धिंगत करुन साजरा करत असतो. म्हणूनच आपल्या संस्कृतीत सण-उत्सवांना मानाचं स्थान आहे.

पण बाप्पा! गेल्या काही वर्षात आधुनिकतेच्या किंवा पुढारलेपणाच्या नावाखाली या उत्सवाचा माणसाने बाजार मांडला आहे. सात्विकता, भक्तीभाव आणि निखळ आनंदाची जागा हुल्लडबाजी, दिखावा, बीभत्सपणा आणि भंपकपणाने घेतली आहे. छातीत धडकी भरवणाऱ्या आणि कानठळ्या बसवणाऱ्या डीजेमुळे अबालवृद्धांसह समस्त सजीव मेटाकुटीला येत आहेत. मातीऐवजी प्लास्टरच्या मूर्ती आणून पर्यावरणाचा ऱ्हास केला जात आहे. एकाने चार फुटांची मूर्ती आणली की दुसरा पाच फुटांची आणतो. मुळात, भक्तीभाव हा मूर्तीच्या आकारानुसार लहान, मोठा किंवा आवाढव्य ठरत नसतो, हे तुझ्या भक्ताला कधी कळणार? रूढी-परंपरेनुसार दीड दिवस ते जास्तीत जास्त दहा दिवसांचा हा उत्सव सर्व संकेत पायदळी तुडवून अनेक ठिकाणी पाच-पाच आठवडे चालू लागला.

थर्माकोलची सजावट आणि तुझ्या उत्सवादरम्यान उठलेल्या जेवणाच्या असंख्य पंगतीनंतर जागोजागी पडलेल्या प्लास्टीक, थर्माकोलच्या ढिगाऱ्यांमुळे दुर्गंधी पसरून तूच निर्माण केलेल्या सुंदर सृष्टीचा श्वास घुसमटत असेल तर तुझे भक्त म्हणवून घेण्याची आमची पात्रता तरी काय? बाप्पा! चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा तू अधिपती. पाच-दहा दिवस तुझी मनोभावे पूजा केल्यावर तुझ्या मूर्तीच्या विसर्जन मिरवणुकीत अश्लील हावभावांना प्रवृत्त करणाऱ्या गाण्यांवर शांताबाई आणि बाबुरावच्या नामस्मरणात तल्लीन होऊन नाचणारा भक्त काय साध्य करतो? तुझ्या मूर्तीचं विसर्जनसुद्धा सन्मानाने अपेक्षित असताना अवाढव्य मूर्ती आणून त्या बेधडकपणे ढकलून विसर्जित करण्यात कुठला भक्तीभाव आहे? आपल्या प्रत्येक सण-उत्सवांचं वैज्ञानिक आणि आध्यात्मिक महत्त्व जपणाऱ्या हिंदू संस्कृतीकडे जगाने कौतुकाने पाहिलं. मात्र, सार्वजनिकतेच्या नावावर आज आपणच आपल्या उत्सवांचं मूळ मंगलमय स्वरूप हरवत चाललो आहोत. तुझ्या रूपाने आपल्या घरी आलेला देव आणि सार्वजनिकतेच्या नावाखाली रस्त्यावर मांडलेला देव हे दोन्ही एकच असले तरी त्यामागची भावना सारखी राहिली आहे का? मग तुझ्या उत्सवाचा सार्वजनिक दिखावा कशासाठी? तुझ्यासह इतर देवदेवतांच्या उत्सवाला दारोदार फिरून महागाईने त्रस्त झालेल्या सामान्य जनांकडून जबरदस्तीने पैसे उकळण्यात कोणत्या प्रकारचा भक्तीभाव दडला आहे?

बाप्पा! अमुक नगरचा, अमुक गल्लीचा राजा अशी विशेषणं लावून तुझं विश्वव्यापी रूप या लोकांनी संकुचित केलं आहे. तुला तुझ्या मंदिरात, घरच्या देव्हाऱ्यात आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मनाच्या गाभाऱ्यात मनोभावे पूजणं अपेक्षित असताना भक्तीचा खोटा टिळा लावून तुला तुझ्या नावाचा बाजार मांडण्यातच भक्तीचा अर्थ शोधायचा का?

बाप्पा! तुझ्या उत्सवाचं हे विकृत स्वरूप पाहिलं की १९७२ च्या दुष्काळाला तोंड देणाऱ्या तुझ्या गरीब आणि निस्सीम भक्तांची आठवण येते. घरात लेकराबाळांना खायला अन्न नसताना परदेशातून आलेल्या सुमार दर्जाच्या लाल गव्हाचे मोदक तुला श्रद्धापूर्वक खाऊ घालताना 'नाव काढू नको तांदुळाचे, केले मोदक लाल गव्हाचे. हाल ओळख साऱ्या घराचे, दिन येतील का रे सुखाचे?' अशा आदरयुक्त अधिकारवाणीने तुझ्याविषयीच्या अपार जिव्हाळ्यातून तुझ्याशी आर्त मनाने संवाद साधणारा गरीब, निस्सीम भक्त कुठे? आणि प्रतिष्ठेचा आव आणत सण-उत्सवांचं विकृतीकरण करणारा स्वयंघोषित भक्त कुठे? हा प्रश्न पडतो.

समाजकार्य किंवा सार्वजनिकतेचा मुखवटा लावून देवदेवतांना रस्त्यावर मांडलं जात असेल आणि शेळ्यामेंढ्यांप्रमाणे मान खाली घालून त्याचं मुकाट्याने अनुकरण होत असेल, तर एकविसाव्या शतकाचं हे दुर्दैवच म्हणावं लागेल.

बाप्पा! तुझ्या उत्सवाला धांगडधिंगा नको, भक्तीचा नाद हवा. दिखावा नको, श्रद्धेची ओढ हवी. स्पर्धा नको, आत्मीयतेची भावना हवी. बीभत्सपणा नको, संस्कृतीचा सन्मान हवा. प्लास्टिक-थर्माकोलचा विनाशकारी कचरा नको, तूच निर्माण केलेल्या निसर्गातल्या सुंदर पानाफुलांची आरास हवी. अवाढव्य मूर्ती नको, मनातली भक्ती मात्र मोठी हवी. तुझ्या नावाचा बाजार मांडणाऱ्यांना आणि तो मुकाट्याने स्वीकारणाऱ्यांना सुबुद्धी दे.

तुझा उत्सव पुन्हा एकदा सात्विकतेचा, भक्तीभावाचा, पारंपरिक आनंदाचा आणि मंगलमय वातावरणाचा होऊ दे. तरच समस्त कोकणी माणसाच्या घरात पाहुणा म्हणून आल्यावर त्याच्या मनातसुद्धा तू स्थान मिळवशील आणि निरोप घेताना त्याच्यासह तुझ्या डोळ्यातसुद्धा आनंदाश्रू येतील त्यावेळेला अंतःकरण हेच सांगेल. भ्रंश जाहला जरी उत्सव धर्म, आता न होईल अधर्म. हाच माझा मोरयास प्रणाम.

**गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया!!**

# बालांगण

जिज्ञासा

## कृष्णविवर म्हणजे नेमकं काय?



हे विश्व निर्माण झालं तेव्हा केवळ हायड्रोजन आणि हेलियम ही दोनच मूलद्रव्ये प्रचंड प्रमाणात अवकाशातत तयार झाली असं मानलं जातं. इतर मूलद्रव्यं म्हणजे ऑक्सिजन किंवा नायट्रोजन वगैरे ताऱ्यांमुळे निर्माण झाले. हायड्रोजनच्या अणूकेंद्रकांचं रुपांतर हेलियममध्ये करण्यामुळे ताऱ्यांना त्यांची उर्जा मिळते. तारा कित्येक हजार अब्ज वर्षे प्रकाशाची आणि उर्जेची निर्मिती करीत राहतो. तारे जन्माला येतात तसाच त्यांचा मृत्यूही होतो. अवकाशात एखाद्या ताऱ्याचा जन्म होण्यासाठी कित्येक अब्ज वर्षे लागतात. ताऱ्यांचे आयुष्यही कित्येक अब्ज वर्षांचे असते. आपला सूर्य सुमारे ४.५ अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झाला आणि त्याचा अंत अजून सुमारे ५.५ अब्ज वर्षांनी होईल. ताऱ्याच्या अंतर्भागात असलेल्या हायड्रोजन वायूच्या प्रमाणावर त्याचं आस्तित्व अवलंबून असतं. हायड्रोजनपासून हेलियम तयार होणे त्याची उर्जा अवकाशात फेकली जाणे हे सलुरू आहे तोवर तारा जीवित असतो. त्याच्या अंतर्भागातील हायड्रोजन कमी कमी होतो तसा त्याचा प्रकाश अंधूक होत जातो. अखेर हायड्रोजन पूर्णपणे संपून जातो आणि ता–याचा अंत होतो. तोच ताऱ्याचा मृत्यू. त्याजागी न दिसणारे काळे टिंब उरते तेच कृष्णविवर. कृष्णविवर म्हणजेच ब्लॅकहोल ही ताऱ्याची अंतिम स्थिती आहे.

## जग रेडिओ जॉकींचं



रेडिओ जॉकी म्हणजे आर जे होण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आकर्षक आणि स्पष्ट आवाज,लोकांशी संवाद साधण्याची कला आणि हजरजबाबीपणा. या क्षेत्रात करिअर करायचं असल्यास किमान १२ वी उत्तीर्ण असणं आवश्यक आहे. त्यानंतर कोणत्याही विषयात पदवी घेता येते. मात्र मीडियामध्ये करिअर करायचं असेल तर मास कम्युनिकेशन, जरनॅलिझम किंवा मीडिया स्टडीज यामध्ये पदवी किंवा डिप्लोमा केल्यास जास्त संधी मिळतात. यासाठी विशेष अभ्यासक्रम जसे की डिप्लोमा इन रेडिओ जॉकींग किंवा ३ ते ६ महिन्यांचे सर्टिफिकेट कोर्सेस, डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन किंवा बी. ए. इन मास मीडिया करता येतात. भारतात झेवियर इंस्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन, मुंबई , इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, दिल्ली, रेडिओ सिटी स्कूल ऑफ ब्रॉडकास्टिंग, जामिया मिलिया इस्लामिया दिल्ली आणि एफ टी आय आय, पुणे अशा संस्थांमध्ये प्रशिक्षण घेता येते. याशिवाय अनेक प्रायव्हेट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट्स आणि ऑनलाइन कोर्सेस देखील उपलब्ध आहेत. सुरुवातीला कॉलेज फेस्ट, स्टेज अँकरींग किंवा इव्हेंट होस्टिंग करून अनुभव घ्या. तसेच स्वतःचे पॉडकास्ट, युट्यूब किंवा इंस्टा रील्स बनवण्याचा प्रयत्न करून पाहा. रेडिओ चॅनलमध्ये इंटर्नशिप करून व्यावसायिक अनुभव घेतल्यास पुढे रेडिओ जॉकी म्हणून करिअरची सुरुवात सहज करता येते.

वेगळ्या वाटा

## लक्झेंबर्ग युरोपचे हृदय

लक्झेंबर्ग हा पश्चिम युरोपमधील एक लहान पण अत्यंत महत्त्वाचा देश आहे. या देशाची राजधानी लक्झेंबर्ग शहर असून येथे ग्रँड ड्यूक हा राज्यप्रमुख असतो. सध्या ग्रँड ड्यूक हेन्री हे राज्यप्रमुख आहेत. लक्झेंबर्ग हे संविधानिक राजेशाही पद्धतीवर चालते. देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ फक्त २५८६ चौ. कि.मी. आहे. पण आर्थिक व राजकीय महत्त्वामुळे या देशाला जागतिक नकाशावर विशेष स्थान आहे. जगभरातील मोठ्या कंपन्यांची मुख्यालये किंवा युरोपियन ऑफिसेस लक्झेंबर्गमध्ये आहेत कारण इथे चांगल्या करसवलती मिळतात आणि इथली बँकिंग प्रणाली सुरक्षित आहे. लोखंड व पोलाद उद्योग हा लक्झेंबर्गचा पूर्वीचा मुख्य व्यवसाय होता. परंतु आता बँकिंग, वित्तीय सेवा, गुंतवणूक, विमा,माहिती तंत्रज्ञान हा लक्झेंबर्गच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आध–ारआहे. पर्यटनातूनही या देशाला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते.



सफर देशांची

या देशाची अधिकृत भाषा तीन आहेत. लक्झेंबर्गिश, फ्रेंच आणि जर्मन. शिक्षण व प्रशासकीय कामकाजात सर्व भाषांचा वापर होतो. लोकसंख्या अंदाजे ६.८ लाख आहे. त्यात परदेशी नागरिकांची संख्या जास्त आहे. इथली आरोग्यसेवा, सार्वजनिक सुविधा आणि राहणीमान अत्यंत उच्च दर्जाचे आहे.

जगातील सर्वांत श्रीमंत व विकसित देशांमध्ये लक्झेंबर्गचा समावेश आहे. युरोपियन युनियनच्या अनेक महत्त्वाच्या संस्था इथे आहेत, त्यामुळे लक्झेंबर्गला ‌‌‌युरोपचे हृदय‌ म्हटले जाते. लक्झेंबर्ग शहरातील प्राचीन किल्ले आणि किल्ल्याभोवतीची वास्तुकला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट आहे.

## पिलांसाठी पक्षी गातो ‘अंगाई’

निसर्गाने प्रत्येक सजीवाला जगण्यासाठी आणि संकटांचा सामना करण्यासाठी अद्भुत युक्त्या दिल्या आहेत. ऑस्ट्रेलियन झेब्रा फिंच पक्ष्यांबाबत नुकताच समोर आलेला शोध त्याचे रंजक उदाहरण आहे. ऑस्ट्रेलियाच्या उष्ण आणि रखरखीत जंगलांत राहणारे हे पक्षी तापमान वाढल्यावर एक वेगळा, जलद आवाज काढतात. या आवाजाला ‌हीट कॉल्स‌ म्हटले जाते. विशेष म्हणजे, हे आवाज स्वतःसाठी नव्हे, तर अजून अंड्यात असलेल्या पिलांसाठी असतात. अंड्याच्या कवचातून हे आवाज पिलांपर्यंत पोहोचल्यावर त्यांच्या मेंदूत काही जनुकीय बदल होतात. त्यामुळे बाहेर पडण्यापूर्वीच पिल्लांना कडक उन्हाळ्याचा सामना करण्याची तयारी होते. जणू हे गाणे पिलांसाठी हवामानाच्या अंदाजाचे काम करते.



अजब–गजब

या प्रक्रियेचे रहस्य समजून घेण्यासाठी डीकिन विद्यापीठाच्या पर्यावरणतज्ज्ञ माइलेन मॅरिएट्टी आणि क्लेमसन विद्यापीठाच्या म ज्ञातंतूशास्त्रज्ञ ज्युलिया जॉर्ज यांनी संशोधन केले. त्यांनी झेब्रा फिंचच्या अंड्यांवर ‌हीट कॉल्स‌च्या ध्वनिमुद्रणाचे प्रयोग केले. या आवाजाचा पिलांच्या मेंदूतील हायपोथॅलॅमसवर परिणाम होत असल्याचे दिसले. हा भाग शरीराचे तापमान आणि चयापचय नियंत्रित करतो. आवाजामुळे रक्तवाहिन्यांच्या आकुंचनाशी संबंधित जनुकांच्या कार्यात बदल होतात. त्यामुळे कडक उन्हातही पिलांच्या मेंदूचे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. या बदलांमुळे उष्णतेच्या धक्क्यापासून पिलांचे संरक्षण होते. विशेष म्हणजे, अंड्यात असताना मिळालेल्या या ‌संगीतमय शिकवणी‌चा परिणाम त्यांच्या आयुष्यभर राहतो आणि मोठे झाल्यावर ते अधिक उष्ण ठिकाणी घरटे बांधण्यास पसंती देतात.

निसर्गातील अशी ध्वनी–प्रेरित अनुकूलता केवळ झेब्रा फिंचपुरती मर्यादित नाही. पिवळ्या पायांचे सीगल पक्षी शिकारीचा धोका जाणवल्यास अंड्यातील पिलांना इश–ारा देतात. त्यामुळे जन्मानंतर ती अधिक सावध राहतात. झेब्रा फिंचवरील संशोधनातून बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सजीवांच्या शरीरात किती अद्भुत यंत्रणा असतात, हे स्पष्ट होते. वाढत्या जागतिक तापमानाच्या पार्श्वभूमीवर निसर्गाची ही ‘संगीतमय तयारी’ खरोखरच अचंबित करणारी आहे.

## सियाचिनविषयी...

तुम्ही ग्लेशियर्सबद्दल ऐकलं आहे का? ग्लेशियर्स म्हणजे हिमनदी. आपल्या देशात सियाचिन हे ग्लेशियर आहे. सियाचिनमध्ये आपले सैनिक अहोरात्र पहारा देत असतात. इथलं तापमान खूप कमी असतं. मात्र अशा वातावरणातही आपले सैनिक डोळ्यात तेल घालून आपल्या सीमांचं रक्षण करतात. हिमालयातल्या पूर्व काराकोरम पर्वतरांगांमध्ये सियाचिन वसलं आहे. सियाचिन ही जगातली सर्वात उंचावरची युद्धभूमी आहे. सियाचिनवर पाकिस्तानचा डोळा आहे. त्यामुळे आपल्या सैनिकांना हुडहुडी भरवणाऱ्या थंडीतही तिथे रहावं लागतं. सियाचिन परिसरातलं तापमान उणे साठ अंश सेल्सियसच्या खालीही जाऊ शकतं. आपल्याला थंडी वाजू लागल्यावर आपण लगेच स्वेटर घालतो. आपल्याला थोडी थंडीही सहन होत नाही. पण सैनिक देशासाठी लढत असतात. इतकंच नाही, तर इथे ऑक्सिजनचं प्रमाणही कमी असतं. या भागात फक्त दहा टक्के ऑक्सिजन असल्यामुळे सैनिकांपुढे मोठं आव्हान असतं. सियाचिनमध्ये भारताचे तीन हजार सैनिक नेहमी तैनात असतात. प्रत्येक सैनिक साधारण तीन महिने या भागात रहतो. प्रतिकूल तापमानामुळे कोणीही तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ सियाचिनमध्ये राहू शकत नाही. तिथे एक बादली पाणी गरम करण्यासाठी सुमारे तीन तास लागतात. पाणी पिण्यासाठी सैनिकांना बर्फ स्टोव्हवर वितळून घ्यावा लागतो. मशिन गन्स जाम होऊन नयेत म्हणून उकळत्या पाण्यात बुडवून ठेवल्या जातात!

गंमत–जंमत



## १५८ वर्षांनी ‘उमलले’ फूल

भारताच्या निसर्गरम्य आणि जैवविविधतेने नटलेल्या ईशान्येकडील राज्यांतून एक अत्यंत रोमांचक आणि ऐतिहासिक बातमी समोर आली आहे. तब्बल १५८ वर्षे वैज्ञानिक जगतापासून पूर्णपणे लपून राहिलेले एक अत्यंत दुर्मिळ जांभळ्या रंगाचे हिमालयीन फूल अरुणाचल प्रदेशमध्ये पुन्हा शोधून काढण्यात आले आहे. 'ओरिक्स' या प्रतिष्ठित वैज्ञानिक जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, शास्त्रज्ञांच्या एका संघाने अरुणाचलमधील दुर्गम चुना व्हॅलीच्या नजीक सुमारे ३,६०० मीटर उंचीवरील खडकाळ आणि गवताळ भूप्रदेशात या दुर्मीळ वनस्पतीचा शोध घेतला आहे. शेवटचे १८६८ मध्ये या वनस्पतीची वैज्ञानिक नोंद झाली होती, त्यानंतर ती कधीही नजरेला पडली नव्हती. त्यामुळे दीडशे वर्षां हून अधिक काळानंतर झालेला हा शोध भारतीय वनस्पतीशास्त्राच्या इतिहासात एक सुवर्णपान जोडणारा ठरला आहे.



या दुर्मिळ फलाचे पुन्हा प्रगट होणे हे केवळ एका वनस्पतीचा शोध नसून, तो पूर्व हिमालयाच्या अफाट आणि अद्याप (असंशोधित) जैवविविधतेचा एक उत्तम पुरावा आहे. शास्त्रज्ञांच्या मते, हे फूल लुप्त किंवा नष्ट झाले नव्हते, तर मानवी वस्त्यांपासून दूर, अत्यंत खडतर भूप्रदेश आणि मर्यादित मोहिमांमुळे ते दशकानुदशके कागदावर नोंदवले गेले नव्हते. हिमालयातील दुर्गम खिंडी, दऱ्या आणि अद्भूत निसर्गसौंदर्य अजूनही कितीतरी रहस्ये आपल्या पोटात लपवून बसले आहेत, याचीच ही साक्ष आहे. या वनस्पतीचे पुनरागमन जागतिक पातळीवरील संवर्धन शास्त्रज्ञांसाठी एक मोठी आशा ठरली असून, यामुळे हिमालयातील संवेदनशील परिसंस्थेचे जतन करण्यासाठी नवीन ऊर्जा मिळाली आहे.

जाणून घ्या

या ऐतिहासिक शोधामुळे भारतीय वनस्पती विश्वात एक नवा उत्साह संचारला असून, भविष्यात अशाच अनेक हरवलेल्या प्रजाती शोधण्यासाठीच्या संशोधन मोहिमांना वेग येणार आहे. अरुणाचल प्रदेशच्या या दुर्गम भागात झालेल्या शोधाने पुन्हा एकदा सिद्ध केले की, आपली वसुंधरा निसर्गाच्या अशा कितीतरी लपलेल्या खजिनांनी समृद्ध आहे. केवळ वैज्ञानिक दृढनिश्चय आणि सातत्यपूर्ण क्षेत्रीय सर्वेक्षणांमुळे हे शक्य झाले आहे. आपल्या निसर्गाचा हा अमूल्य ठेवा आणि देशातील दुर्मिळ वन्यसंपत्ती पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा मोलाचा संदेश या घटनेतून मिळतो.

## धुके... जिवंत परिसंस्था!

धुके म्हटले की अनेकांना निस्तेज आणि काळोखी सकाळ आठवते, ज्यामध्ये हरवून गेल्यासारखे वाटते. मात्र, एका नवीन अभ्यासानुसार, जमिनीवर उतरणारे किंवा कमी उंचीवर तयार होणारे धुके हे केवळ पाण्याचे बाष्प नसून, ते हवेत फिरणारे सूक्ष्मजीवांचे एक छोटेखानी आणि जिवंत घर आहे. तापमानातील बदल आणि कोरडेपणाचे मोठे संकट असतानाही, धुके या जिवांना जगण्यासाठी आवश्यक असलेली आर्द्रता, पोषक घटक आणि पोषक वातावरण पुरवते. एरवी हवेत जगणे कठीण असणाऱ्या जीवांना या धुक्क्यांच्या थेंबांमध्ये एक तात्पुरते पण हवेशीर हॅबिटॅट मिळते. थि थुओंग थुओंग काओ नावाच्या रसायनशास्त्रज्ञाने आणि तिच्या संशोधन पथकाने हे सिद्ध करून दाखवले आहे की, या धुक्क्यांच्या थेंबांमध्ये सूक्ष्मजीव केवळ जगतातच असे नाही, तर ते तिथे वेगाने वाढतात आणि आपली संख्याही वाढवतात.

या संशोधनासाठी संशोधकांच्या पथकाने पेनसिल्व्हेनियाच्या एका भागात दोन वर्षे संशोधन करून धुक्याचे तब्बल ३२ वेगवेगळे नमुने गोळा केले. त्यांनी प्रामुख्याने रात्रीच्या वेळी जमिनीच्या थंडाव्यामुळे तयार होणाऱ्या 'रेडिएशन फॉग'चा अभ्यास केला, कारण हे धुके दुसरीकडून वाहून येत नाही तर जागे–वरच तयार होते, ज्यामुळे तिथले सूक्ष्मजीव स्थानिक असल्याचे स्पष्ट होते. जेव्हा या गोळा केलेल्या पाण्याचे सूक्ष्मदर्शकाखाली परीक्षण करण्यात आले, तेव्हा असे दिसून आले की धुक्क्याच्या थेंबांमधील जीवांची घनता ही तलाव किंवा महासागरातील पाण्याच्या एवढीच प्रचंड होती. विशेष म्हणजे, या सूक्ष्मजीवांचे अनुवंशिक नमुने तपासून पाहिल्यावर त्यात तब्बल १८८ प्रकारचे अद्वितीय जिवाणू आढळले. हे जिवाणू हवेच्या सामान्य थरांमधील जिवाणूंपेक्षा पूर्णपणे वेगळे होते.



निसर्गज्ञान

या संपूर्ण संशोधनातील सर्वात आश्चर्यकारक आणि महत्त्वाची बाब म्हणजे यामध्ये 'मेथिलोबॅक्टेरियम' नावाचा जिवाणू सर्वाधिक प्रमाणात (सुमारे ५० टक्के) आढळला. गुलाबी रंगाचे दिसणारे हे गोंडस जिवाणू हवेतील फॉर्मल्डिहाइड या अत्यंत विषारी आणि घातक प्रदूषकाचे भक्षण करून जगतात. फॉर्मल्डिहाइड हा मानवी कृतीतून आणि कारखान्यांमधून तसेच सिगारेटच्या धुराबाट बाहेर पडणारा एक विषारी वायू आहे, जो आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असतो. मात्र हे मेथिलोबॅक्टेरियम जिवाणू या विषारी रसायनाला इतर जिवाणूंपेक्षा कैक पटीने वेगाने नष्ट करतात आणि हवेतील प्रदूषण कमी करण्यास मदत करतात. धुके केवळ पाणी आणि सूक्ष्मजीवांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेते असे नाही, तर पर्यावरणातील रसायने आणि प्रदूषण संतुलित ठेवण्यातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, हे यातून सिद्ध झाले आहे.

## बना टी–टेस्टर

तुमच्या घरातही आई–बाबांना, आजी–आजोबांना उठल्या उठल्या चहा लागतो का? भारतात चहाबाजांची कमतरता नाही. दररोज एकापेक्षा अधिक चहा पिणारेही बरेच आहेत. चहाशिवाय अनेकांचा दिवसही सुरू होत नाही. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे चहा उपलब्ध आहेत. या चहाची चव बघून तुम्ही भरपूर पैसे कमवू शकता, हे माहीत आहे का! यासाठी तुम्ही टी सोमिलियर किंवा टी टेस्टर बनायला हवं. या क्षेत्रात करीअर केल्यानंतर चहाच्या वेगवेगळ्या प्रकारांबद्दल तुम्ही माहिती देऊ शकता. तसंच कोणत्या चहासोबत काय खायला हवं हे सुद्धा सांगू शकता. देशातल्या मोठमोठ्या हॉटेल्सना अशा टी टेस्टर्सची गरज असते. तसंच आता कॉफी शॉप्सप्रमाणे टी शॉपही सुरू झाले आहेत. या ठिकाणीसुद्धा तुम्ही काम करू शकता.



कोण होणार?

बॉटनी, फूड सायन्स तसंच हॉर्टिकल्चरचे विद्यार्थी हे क्षेत्र अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात. बिर्ला इन्स्टीट्यूट ऑफ फ्युचरिस्टिक स्टडीज, इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ प्लांटेशन मॅनेजमेंट आणि आसाम ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटीमध्ये या विषयाशी संबंधित अभ्यासक्रम शिकवले जातात. हा अभ्यासक्रम सहा महिने ते एक वर्षापर्यंतचा असतो. आसाम, पश्चिम बंगालमध्ये चहाचे मळे आहेत. चहाची लागवड कशी करायची, रोपट्यांची निवड कशी करायची, याबाबतचे सल्ले तुम्ही देऊ शकता. या क्षेत्रात सुरूवातीला ७ हजार ते ५० हजार रूपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकतं. पुरेशा अनुभवानंतर यात वाढ होते. वेगळा पर्याय म्हणून तुम्ही टी टेस्टींगची वाट निवडू शकता.

### दोस्त हे मस्त

#### प्राण्यांची अजब दुनिया

प्राण्यांच्या जगात बरंच काही घडत असतं. प्राण्यांचं जगही अनोखं आहे. आता हत्तीचंच बघा. हत्तीला उडी मारता येत नाही. उडी मारता न येण–ारा हत्ती हा एकमेव प्राणी आहे. आपल्या आसपास दिसणाऱ्या मुंग्या कधी झोपत नाहीत. शिवाय त्यांना फुफ्फुसही नसतं. ब्लू व्हेलच्या जिभेचं वजन एखाद्या कारएवढं किंवा हत्तीच्या पिल्लाएवढं असतं. गाय आपल्या आयुष्यात जवळपास दोन लाख ग्लास दूध देते.



### खादाडी

#### स्टफ्ड रोटी

उरलेल्या पोळीपासून स्टफ्ड रोटी बनवता येईल. यासाठी दोन ते चार पोळ्या, एक वाटी उकडलेल्या भाज्या, एक बारीक चिरलेली काकडी, बारीक चिरलेले दोन टोमॅटो आणि एक कप किसलेलं चीज असं साहित्य घ्या. आता एक पोळी घ्या. त्यावर उकडलेल्या भाज्या घाला. त्यावर टोमॅटो आणि काकडी घाला. त्यावर चीज घाला. यानंतर पोळी दुमडून घ्या. आता ही पोळी तव्यावर भाजून घ्या. गरमागरम खा.



### स्टडी टिप्स

#### गोडी गणिताची

गणितात चांगले गुण मिळवायचे असतील तर आपल्या आयुष्यातली गणितं सोडवायला सुरूवात करा. आपल्या वाढदिवसापासून सुरुवात करा. वाढदिवसाच्या खर्चाचा हिशेब तुम्हीच मांडा. वाढदिवसाला किती मित्रमैत्रिणी येणार, त्यांच्यासाठी किती वस्तू लागतील, कोणते गेम्स खेळावे लागतील हे सगळं तुम्हीच ठरवा. अशा छोट्या छोट्या गोष्टींमधून तुम्ही गणित शिकत जाल आणि पुढे गणिताची गोडी लागेल.



### योगा टाईम

#### करा उदानमुद्रा योग

ेागासनांमुळे आपलं सर्वांगिण आरोग्य उत्तम राहतं. आपण तंदुरुस्त राहतो. इतकंच नाही, तर आरोग्यविषयक समस्याही दूर होतात. चेहरा तजेलदार दिसण्यासाठी तुम्ही उदानमुद्रा योग करू शकता. मुद्रेमुळे चेहरा खूप छान, उजळ दिसतो. हे आसन करण्यासाठी तुम्हाला पद्मासनात बसावं लागेल.



# निवडक

## अनंत धामणे यांचे निधन

**पुणे :** महाराष्ट्राचे माजी रणजी क्रिकेटपटू अनंत नाना धामणे (वय ८७, रा. शिवाजीनगर) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्र क्रिकेट क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी आणि जावई असा परिवार आहे. अनंत धामणे यांनी १९५९-६० ते १९६३-६४ या कालावधीत महाराष्ट्राच्या रणजी संघाचे प्रतिनिधित्व केले.



आपल्या कारकिर्दीत त्यांनी १० प्रथम श्रेणी सामने खेळले. उजव्या हाताचे आक्रमक फलंदाज आणि प्रभावी मध्यमगती गोलंदाज म्हणून त्यांनी क्रिकेट वर्तुळात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती. मुंबई, गुजरात आणि सौराष्ट्र यांसारख्या बलाढ्य आणि दिग्गज संघांविरुद्ध त्यांनी केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली. व्यावसायिक क्रिकेटमध्ये त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया संघाचे प्रतिनिधित्व केले. भारतीय क्रिकेटचे माजी कर्णधार अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली खेळताना त्यांनी प्रतिष्ठित मोईन-उद-दौला ट्रॉफीमध्ये सहभाग घेतला होता. १९९९ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियातून निवृत्त झाल्यानंतरही त्यांचे क्रिकेटप्रेम कमी झाले नाही आणि ते खेळाशी सातत्याने जोडलेले राहिले. प्रशिक्षक व निवड समिती सदस्य म्हणून योगदान खेळाडू म्हणून निवृत्त झाल्यानंतर धामणे यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अभ्यासू, अनुभवी आणि क्रिकेटला समर्पित असलेले ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व गमावले आहे. क्रिकेट क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुखः व्यक्त केले आहे.

## गीत सेठी बिलियर्ड्समध्ये परतणार

**नवी दिल्ली :** भारतीय क्यू स्पोर्ट्स दिग्गज गीत सेठी ६५ वर्षांच्या वयात स्पर्धात्मक बिलियर्ड्समध्ये पुनरागमन करणार आहेत. ते पुढील महिन्यात १९ ते २२ ऑक्टोबर दरम्यान इंग्लंडमधील ग्रेट



वायर्ली येथे वर्ल्ड बिलियर्ड्स चॅम्पियनशिप खेळतील. सहा वर्षांनंतर वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये त्यांचे हे पुनरागमन असेल. अहमदाबादमध्ये राहणाऱ्या सेठींनी १९७४ मध्ये पहिल्यांदा क्यू हातात घेतला होता. ते २०१८ च्या चॅम्पियनशिपच्या नॉकआउट फेरीपर्यंत पोहोचले होते.

सेठींना वाटते की त्यांचे वय त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत नाही. त्यांनी हसत हसत सांगितले, माझ्या वयाचा दिसत नाही, पण मला माझ्या वयानुसारच जाणवते.सेठींच्या पुनरागमनाची कहाणी या वर्षाच्या सुरुवातीला सुरू झाली. त्यांचे मित्र आणि माजी क्यू खेळाडू अशोक शांडिल्य यांनी त्यांना मुंबईतील दादर येथे झालेल्या क्यू स्पोर्ट्स लीगमध्ये खेळण्यासाठी तयार केले. सेठी म्हणाले, मी त्या स्पर्धेत जास्त सराव न करता भाग घेतला. पण खूप मजा आली. घरी परतल्यावर मी स्वतःलाच म्हणालो, चला, सुरुवात करूया. थोडं खेळूया.जूनमध्ये गुजरातच्या स्पोर्ट्स क्लबमध्ये झालेल्या स्पर्धेने त्यांच्या पुनरागमनाला आणखी एक कारण दिले. ही स्पर्धा मुंबईत खेळल्या गेलेल्या सामन्यासारखीच होती.सेठी म्हणाले, पार्श्वभूमीवर संगीत वाजत असताना खेळणे आणि संपूर्ण क्यू स्पोर्ट्स समुदायाला भेटणे खूप छान वाटले. हे देखील खूप मजेदार होते.क्यू स्पोर्ट्स खेळाडू ते अनुभवी उद्योजक बनलेले सेठी आता पुढील महिन्यात जगाच्या मोठ्या मंचावर परततील.

## विदीने पार केली ८१ किमी नदी

**पेठ :** वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी अवसरी खुर्द-भोरवाडी (ता. आंबेगाव) येथील विदी नंदकुमार भोर हिने ८१ किलोमीटर अंतराची मुर्शिदाबाद नदी जलतरण स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण करून क्रीडा क्षेत्रात बंगालमधील मुर्शिदाबाद येथे रविवारी (दि. ६) पार पडलेल्या या अत्यंत आव्हानात्मक व खडतर स्पर्धेत विदीने मुलींच्या गटात द्वितीय क्रमांक पटकावला. तिने अहिरण घाट ते गोरा बाजार हे तब्बल ८१ किलोमीटरचे अंतर केवळ ११ तास ५९ मिनिटांत पोहून पार केले.मूळची अवसरी खुर्द येथील रहिवासी असलेली विदी सध्या वाशी (नवी मुंबई) येथील फ्र. ॲग्नेल हायस्कूलमध्ये आठवीच्या वर्गात शिकत आहे. एवढे प्रदीर्घ अंतर निर्धारित वेळेत पूर्ण करणारी ती सर्वात कमी वयाची जलतरणपटू ठरली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, गेल्या ३ वर्षांत एकाही महिला जलतरणपटूला निर्धारित वेळेत हे अंतर पूर्ण करता आले नव्हते, तो विक्रम विदीने मोडीत काढला.



# महिला आशिया कप
# भारताची फायनलमध्ये एन्ट्री

### बांगलादेशवर दणदणीत विजय

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

एसीसी महिला आशिया कप २०२६चा उपांत्य फेरीचा सामना भारत आणि बांग्लादेश यांच्यात खेळला गेला. हा सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगला. या सामन्यात बांगलादेश महिला क्रिकेट संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. याचा फायदा घेत, भारताने २० षटकांत ६ विकेट्स गमावून १४९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, बांगलादेशने २० षटकांत ७ विकेट्स गमावून केवळ १०९ धावा केल्या. टीम इंडियाने बांगलादेशला ४० धावांनी पराभूत केले. यासह, भारतीय संघाने आशिया कपच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.




नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. फॉर्मात असलेली सलामीवीर स्मृती मंधाना अवघ्या २ धावांवर बाद झाली. यानंतर, तिसऱ्या क्रमांकाची फलंदाज प्रतीका रावल २४ चेंडूंमध्ये केवळ २० धावाच करू शकली. टीम इंडियाची स्टार सलामीवीर शफाली वर्माने शानदार फलंदाजी करत ४० चेंडूंमध्ये ६४ धावा केल्या. १६० च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना तिने ७ चौकार आणि ३ षटकार ठोकले. कर्णधार हरमनप्रीत कौरने २८ चेंडूंमध्ये केवळ २४ धावा करून तंबूत परतली. विकेटकीपर फलंदाज रिचा घोषने २१ धावा केल्या. शेवटच्या दोन षटकांमध्ये फलंदाजीला आलेल्या दीप्ती शर्मानेे अवघ्या सहा चेंडूंमध्ये १३ धावा करून भारतीय संघाला २० षटकांच्या अखेरीस १४९ धावांपर्यंत पोहोचण्यास मदत केली. बांगलादेशकडून सुलताना खातूनने दोन विकेट्स घेतले. १५० धावांचे लक्ष्य गाठताना बांगलादेश महिला क्रिकेट संघाने चांगली सुरुवात केली. मात्र, श्री चरणीने भारतीय संघाला कमबॅक करून दिले. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी बांग्लादेशला सामन्यात आघाडी घेण्यापासून रोखले. बांगलादेशची सलामीवीर दिलारा अख्तरने २१ धावा केल्या, तर शोभना मोस्तारीने १८ धावांची भर घातली. कर्णधार निगार सुलतानानेही १९ धावा जोडल्या, त्यानंतर शोर्ना अख्तरने नाबाद २२ धावा केल्या. दीप्ती शर्माने ३ विकेट्स घेतले, तर नंदिनी शर्मानेही २ विकेट्स घेतले. श्री चरणी आणि प्रेमा रावत यांनीही प्रत्येकी १ विकेट्स घेतला. बांगलादेश संघ २० षटकांत ७ विकेट्स गमावून केवळ १०९ धावाच करू शकला. यामुळे भारतीय संघाने ४० धावांनी विजय मिळवला. या विजयासह हरमनप्रीत कौरच्या संघाने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

# सबालेंका युएस ओपन फायनलमध्ये

- **पेगुलाचा सरळ सेटमध्ये पराभव**
- **सेरेना-ख्रिस एव्हर्टच्या बरोबरीपासून एक विजय दूर**

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

बेलारूसची महिला टेनिसपटू आर्यना सबालेंका यूएस ओपन महिला एकेरीच्या अंतिम फेरीत पोहोचली आहे. तिने न्यूयॉर्कमधील आर्थर ॲश स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीत अमेरिकन खेळाडू जेसिका पेगुलाचा ७-५, ६-२ असा पराभव केला.



आता शनिवारी विजयासह ती ओपन एरामध्ये सलग तीन यूएस ओपन विजेतेपदे जिंकणाऱ्या खेळाडूंच्या यादीत सामील होईल. सेरेना विल्यम्सने २०१२ ते २०१४ पर्यंत सलग तीन, तर ख्रिस एव्हर्टने १९७५ ते १९७८ पर्यंत सलग चार यूएस ओपन विजेतेपदे जिंकली होती. टेनिसमध्ये ओपन एराची सुरुवात १९६८ पासून मानली जाते. यात व्यावसायिक खेळाडूंनाही ग्रँड स्लॅम स्पर्धांमध्ये खेळण्याची परवानगी मिळाली होती.या विजयासह सबालेंकाची यूएस ओपनमधील सलग विजयाची मालिका १९ सामन्यांची झाली आहे. २०२३ च्या अंतिम फेरीत गॉफकडून पराभूत झाल्यानंतर ती या स्पर्धेत अपराजित आहे. सबालेंकाचा यूएस ओपनमधील हा सलग चौथा अंतिम सामना आहे. ती २०२३ मध्येही विजेतेपदाच्या लढतीपर्यंत पोहोचली होती, पण कोको गॉफकडून हरली होती. त्यानंतर तिने २०२४ आणि २०२५ मध्ये सलग विजेतेपदे जिंकली. आता शनिवारी मिळणारा विजय तिला न्यूयॉर्कमध्ये सलग तीन विजेतेपदे जिंकणारी दुसरी महिला खेळाडू बनवेल, जिने ओपन एरामध्ये ही कामगिरी केली आहे.

## राज्यस्तरीय लेक्रॉस स्पर्धेत
## रिषभ माळी करणार रायगडचे नेतृत्व

**| माणगाव | प्रतिनिधी |**

तळा तालुका येथील वरदायिनी विद्यालय महागाव या शाळेतील इयत्ता आठवीत शिकणारा रिषभ पारस माळी याची रायगड जिल्हा लेक्रॉस असोसिएशन कडून रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नागपूर येथे भरविण्यात आलेल्या स्पर्धेसाठी निवड झालेली आहे

२ सप्टेंबर रोजी नागपूर येथे होणाऱ्या लेक्रॉस स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील एकूण १८ विद्यार्थ्यांची संघात निवड झालेली आहे त्यात ग्रामीण भागातील शाळेतील रिषभ माळी याची देखील निवड झालेली आहे. त्याची निवड होण्यामध्ये



त्याचे क्रीडा मार्गदर्शक संजय गमरे, श्रेयस गमरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे.

रिषभ माळी याची निवड झाल्याबद्दल त्याचे मुख्याध्यापक शिक्षक पालक व विद्यार्थ्यांकडून कौतुक होत आहे व त्याला सर्वांनी नागपूर येथील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत.

# दिल्ली न्यायालयाचा कुस्तीपटू विनेश फोगाटला धक्का

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

१४ सप्टेंबर रोजी दिल्लीत होणाऱ्या वरिष्ठ जागतिक कुस्ती स्पर्धेच्या निवड चाचण्यांमध्ये विनेश फोगाट सहभागी होऊ शकणार नाही. दिल्ली उच्च न्यायालयाने तिला चाचण्यांमध्ये सहभागी होण्यासाठी अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला आहे.






न्यायमूर्ती स्वर्णकांत शर्मा यांनी विनेशची अंतरिम दिलासा मागणारी याचिका फेटाळून लावली. आपल्या आदेशात, न्यायालयाने स्पष्ट केले की, ७ सप्टेंबर, २०२६ च्या परिपत्रकात नमूद केलेले निकष सर्वांना समान रीतीने लागू होतील. जर एखादा खेळाडू नियोजित स्पर्धेत सहभागी झाला नाही, तर तो भारतीय कुस्ती महासंघाने ठरवलेल्या पात्रता श्रेणींमध्ये येत नाही. यामुळे विनेशच्या आंतरराष्ट्रीय कुस्तीमध्ये पुनरागमन करण्याच्या प्रयत्नांना मोठा धक्का बसला आहे.

७ सप्टेंबर रोजी, २०२६ च्या वरिष्ठ जागतिक कुस्ती स्पर्धेच्या चाचण्यांसाठी एक परिपत्रक जारी करण्यात आले होते. नियमांनुसार, निर्धारित स्पर्धांमध्ये पदके जिंकलेले, राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरांमध्ये सहभागी झालेले खेळाडू आणि २०२६ च्या २० विश्व चॅम्पियनशिपसाठी निवड झालेले खेळाडू पात्र आहेत. विनेशने चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळावी म्हणून न्यायालयात धाव घेतली होती. गर्भधारणा, प्रसूती आणि प्रसूतीनंतरच्या आरोग्यात सुधारणा होत असल्यामुळे आपण काही स्पर्धांमध्ये अनुपस्थित होतो, असा युक्तिवाद तिने केला. दिल्ली उच्च न्यायालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे, देशाच्या प्रतिनिधींची निवड निष्पक्ष, एकसमान आणि कामगिरीवर आधारित प्रक्रियेद्वारे केली जाईल, हे सुनिश्चित करणे देशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. न्यायालयाने हेही नमूद केले की, यापूर्वी मे महिन्यात उच्च न्यायालयाच्या एका खंडपीठाने फोगाटला आशियाई खेळांच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली होती. त्या चाचण्यांदरम्यान झालेल्या कथित गैरवर्तनाबाबतची कारणे दाखवा नोटीस अद्याप प्रलंबित आहे.

# शीतल देवीचा ‘सुवर्ण बाण’!

**वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीजमध्ये कझाकस्तानच्या तिरंदाजावर मात; शूट-ऑफमध्ये बाजी मारत पटकावलं गोल्ड**

**| अहमदाबाद | वृत्तसंस्था |**

अहमदाबाद येथे झालेल्या वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीज २०२६ मध्ये भारतीय तिरंदाज शीतल देवीने महिलांच्या कंपाऊंड प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले.





वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीजच्या तिसऱ्या टप्प्यात तिने भारताला एकतर्फी विजय मिळवून दिला. कझाकस्तानच्या आयझादा सेदानविरुद्धच्या रोमांचक शूट-ऑफ सामन्यात शीतलने सेदानने ९ गुण मिळवले तर, १० गुण मिळवून आपला विजय निश्चित केला. भारताने या स्पर्धेत एकूण १५ पदके जिंकली, ज्यात चार सुवर्ण, तीन रौप्य आणि आठ कांस्य पदकांचा समावेश होता.

जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्याशीतलनेकझाकस्तानच्या आयझादा सेदानचा पराभव केला. दोन्ही तिरंदाजांनी त्यांच्या पहिल्या फेरीत अचूक ३० गुण मिळवले आणि दुसऱ्या फेरीनंतर पॉईंट्स ५९-५९ अशी बरोबरीत होती. तिसऱ्या फेरीत, आयझादाने २८ आणि शीतलने २७ गुण मिळवले, ज्यामुळे आयझादाला एका गुणाची आघाडी मिळाली. चौथी फेरी २९-२९ अशी बरोबरीत संपली, त्यामुळे अंतिम फेरीत प्रवेश करताना भारतीय तिरंदाज एका गुणाने मागे होती. दबावाखाली शीतलने उत्कृष्ट कामगिरी करत २९ गुण मिळवले, तर आयझादाने २८ गुण मिळवले. यामुळे पॉईंट्स बरोबरीत आली आणि सामना शूट-ऑफमध्ये गेला. अखेरीस, भारतीय तिरंदाजाने एक रोमांचक विजय मिळवला. सुवर्णपदक पणाला लागलेले असताना, शीतलने अचूक १० गुण मिळवले, तर आयझादाला केवळ ९ गुण मिळवता आले.

यापूर्वी, शीतलने तोमन कुमारसोबत कंपाऊंड मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. या सुवर्णपदकासह त्यांनी या स्पर्धेत दोन पदके जिंकली आहेत. कांस्यपदकाच्या सामन्यात शीतल आणि तोमनने इराकच्या सारा अल हमीद आणि अब्बास काधिम यांचा १५७-१४५ असा पराभव केला. या भारतीय जोडीने पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये प्रत्येकी ३९ आणि शेवटच्या फेरीत अचूक ४० गुण मिळवले आणि चार फेऱ्यांमध्ये केवळ तीन गुण गमावले. पॅरालिम्पिक चॅम्पियन हरविंदर सिंगनेही भारताच्या प्रभावी कामगिरीत महत्त्वाची भूमिका बजावली.

# स्मृती मंधानाच्या निशाण्यावर वर्ल्ड रेकॉर्ड

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

सलामीवीर स्मृती मंधानाला महिला आशिया कपमध्ये इतिहास रचण्याची सुवर्णसंधी आहे. जर मंधानाने बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात ६९ धावा केल्या, तर ती महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावा करणारी खेळाडू बनेल.



स्मृती मंधाना सध्या महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. तिने १७४ सामन्यांमध्ये ३०.६५ च्या सरासरीने ४,६९० धावा केल्या आहेत, ज्यात दोन शतके आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. मंधानाने तिच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत ६३४ चौकार आणि ९५ षटकारही मारले आहेत.

महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावांचा विक्रम सध्या न्यूझीलंडची अनुभवी फलंदाज सुझी बेट्सच्या नावावर आहे. बेट्सने १८६ सामन्यांमध्ये ४,७५८ धावा केल्या आहेत. स्मृती मंधाना आता हा विक्रम मोडण्यापासून फक्त ६९ धावा दूर आहे. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर ४,२४९ धावांसह तिसऱ्या स्थानावर आहे, तर श्रीलंकेची चमारी अथापट्टू ४,०९५ धावांसह चौथ्या स्थानावर आणि न्यूझीलंडची सोफी डिव्हाईन ३,८१७ धावांसह पाचव्या स्थानावर आहे.

### वरिष्ठ गटात बेल्फिन्स टायगर्सची बाजी | नाडगोंडे रेव्हन्सकडून सनबर्ड्सचा पराभव

# पीवायसी कोर्टवर रंगल्या अटीतटीच्या लढती

**| पुणे | प्रतिनिधी |**

पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने आयोजित बाराव्या पीवायसी-ट्रूस्पेस करंडक बॅडमिंटन साखळी स्पर्धेत साखळी फेरीतील लढतींमध्ये बेल्फिन्स टायगर्स आणि नाडगोंडे रेव्हन्स या संघांनी आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. नाडगोंडे रेव्हन्सने स्पर्धेतील तिसरा विजय नोंदवला, तर बेल्फिन्स टायगर्सने दुसऱ्या विजयाची नोंद केली.



पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या बॅडमिंटन कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेतील वरिष्ठ गटाच्या ब गटात बेल्फिन्स टायगर्सने जोग कॉमेट्स संघाचा ५-२ असा सहज पराभव केला. मिहिर विंझे, तन्मय चोभे, इशान लागू, प्रीती सप्रे, कर्णा मेहता, यश मेहेंदळे, अभिषेक ताम्हाणे, तनिश बेलगलकर, निखिल चितळे आणि नेहा लागू यांनी केलेल्या दमदार कामगिरीच्या जोरावर बेल्फिन्स टायगर्सने सामन्यावर वर्चस्व राखत स्पर्धेतील दुसरा विजय मिळवला.

याच गटातील दुसऱ्या सामन्यात हॉक्स संघाने कारा इंटलेक्ट कियाज संघावर ४-३ असा संघर्षपूर्ण विजय मिळवला. हॉक्सच्या विजयात अनिश राणे, कृष्णनील गोरे, अभिजीत खानविलकर, अनुज मेहता, आनंद शहा, सिद्धांत खिंवसरा, जनक वाकणकर आणि राधिका इंगळहळीकर यांनी मोलाची कामगिरी बजावली. दरम्यान, अ गटात नाडगोंडे रेव्हन्सने आपली विजयी मालिका कायम ठेवत वन लिटिल फार्म सनबर्ड्स संघाचा ५-२ असा पराभव केला. प्रतीक धर्माधिकारी, केदार नाडगोंडे, समीर सावला, विश्वास मोकाशी, आशय कश्यप, चिन्मय चिरपुटकर, अविनाश दोशी, पृथ्वी शहा, रिआन करंदीकर आणि सारा नवरे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत नाडगोंडे रेव्हन्सला सलग तिसरा विजय मिळवून दिला.

अ गटातील आणखी एका सामन्यात सेइनुमेरो रॉकेट्सने इम्पेरिअल स्वान्स संघाचा ५-२ असा पराभव करत स्पर्धेतील पहिला विजय नोंदवला. सेइनुमेरो रॉकेट्सकडून अनिकेत सहस्त्रबुद्धे, वरूण साहू, दिप्ती सरदेसाई, समीर जालान, नीलाश केळकर, हेमंत पाळंदे, क्षितिज कोतवाल, वेदांत खटोड, संस्कृती जोशी आणि सोहम जोशी यांनी प्रभावी कामगिरी करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

साखळी फेरीतील या निकालांमुळे नाडगोंडे रेव्हन्स आणि बेल्फिन्स टायगर्स यांनी आपापल्या गटातील आगेकूच मजबूत केली असून, आगामी सामन्यांमध्ये गुणतालिकेतील स्थानासाठी चुरस अधिक रंगण्याची चिन्हे आहेत.

# हर्षित राणा सिरीजमधून बाहेर होण्याची शक्यता

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेट संघात सुरू असलेल्या दुखापती आणि पुनरागमनाच्या लाटेत, स्टार वेगवान गोलंदाज हर्षित राणाबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. दिल्लीचा हा प्रतिभावान वेगवान गोलंदाज अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतून बाहेर पडण्याची शक्यता आहे. हर्षित राणा अद्याप त्याच्या हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही आणि त्याला सामन्यासाठी तंदुरुस्त होण्याकरिता आणखी काही वेळ लागेल.






बीसीसीआयच्या एका सूत्राने परिस्थिती स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, हर्षित राणा त्याच्या हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही. मैदानावर परतण्यापूर्वी त्याला पूर्णपणे बरे होण्यासाठी आणखी काही वेळ लागेल. १ सप्टेंबर रोजी जेव्हा निवड समितीने अफगाणिस्तान मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली, तेव्हा हर्षित राणाचा १५ सदस्यीय संघात समावेश होता, परंतु त्याची उपलब्धता सखोल फिटनेस चाचणीवर अवलंबून होती. २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत हर्षित राणाच्या सहभागाबद्दलचे सस्पेन्स अधिकच गडद झाले आहे.

हर्षित राणाच्या स्पर्धात्मक क्रिकेट कारकिर्दीबद्दल बोलायचे झाल्यास, त्याने आपला शेवटचा सामना ७ जुलै २०२६ रोजी ट्रेंट ब्रिज येथे इंग्लंडविरुद्ध खेळला होता. त्या सामन्यापासून तो दुखापतीमुळे संघाबाहेर आहे. आता, हर्षितच्या संघातून बाहेर पडण्याच्या शक्यतेमुळे, निवड समिती आणि संघ व्यवस्थापन केवळ या मालिकेबद्दलच नव्हे, तर आगामी २०२६ च्या आशियाई खेळांबद्दलही चिंतेत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)